सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

कुशल महाराष्ट्र - रोजगारयुक्त महाराष्ट्र

MAKE IN MAHARASHTRA

MAKE IN INDIA

Industrial Training Institute

## औद्यागिक प्रशिक्षण संस्थेतील
## शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रवेश पद्धती, नियमावली व प्रमाणित कार्य पद्धती







## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
## महाराष्ट्र राज्य

## संचालकांचे मनोगत

राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेतर्गत प्रवेशासाठी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रणाली उपलब्ध करुन देतांना मनस्वी आनंद होत आहे.

शालांत परिक्षा उत्तीर्ण होऊन आपल्या भवितव्याची स्वप्ने पहाणारी ही पिढी जागतिकीकरणानंतर जन्मली आहे. जागतिकीकरण आणि संगणकीकरणामुळे तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे व मानवी व्यवहारातही मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. हे बदल आत्मसात करुन भविष्यातील तांत्रिक बदलांना अनुकुल ठरणारी पिढी घडविण्याचे काम प्रशिक्षण संस्थांना करावयाचे आहे. भविष्यातील स्वप्ने साकार होण्यासाठी भविष्यकाळात रोजगार उपयोगी ठरणारे प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत पारंपारिक शिक्षणाच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. त्याचबरोबर तांत्रिक व्यावसायिक शिक्षण महागडे सुध्दा झाले आहे. अशा परिस्थितीत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील विविध व्यवसायांचे कौशल्य शिकविणारे प्रशिक्षण हे रोजगार व स्वयंरोजगारासाठी वरदानच आहे.

वाढत्या औद्योगिकीकरणामुळे केवळ देशातच नव्हे तर जगभरात विविध स्वरुपातील तंत्रज्ञानाची मोठ्या प्रमाणात गरज आहे. प्रशिक्षित कुशल मनुष्यबळाचा अभाव सर्वत्र जाणवत आहे. उद्योगक्षेत्रातील मनुष्यबळाची वस्तुस्थिती अशी असताना महाराष्ट्रात प्रत्येक तालुक्यात किमान ०१ शासकीय औ.प्र.संस्था (ITI) सुरु करण्यात आलेली आहे. त्यानुसार ३५८ तालुक्यात ४१७ शासकीय औ.प्र.संस्था कार्यरत असून त्यांची एकूण वार्षिक प्रवेश क्षमता जवळपास एक लक्ष आहे. त्यामध्ये आदिवासी भागात आदिवासींसाठी ६१ संस्था, अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या मुलामुलींसाठी ०४ उच्चस्तर संस्था, अल्पसंख्यांकांसाठी स्वतंत्र ०२ संस्था व ४३ शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये स्वतंत्र तुकडया, महिलांसाठी १५ तर २८ आदिवासी आश्रमशाळा औ.प्र.संस्था अशा संस्थांचा समावेश आहे. याच बरोबर राज्यात एकूण ४९१ खाजगी औ.प्र.संस्था कार्यरत असून त्यांची प्रवेश क्षमता साधारणत: ५०००० इतकी आहे.

औ.प्र.संस्थांमध्ये एक व दोन वर्षे कालावधीचे विविध व्यवसाय शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत उपलब्ध आहेत. या व्यवसायांचा अभ्यासक्रम हा उद्योगधंद्यातील तज्ञांनी बनविलेला असून अभ्यासक्रम बनविताना कारखान्यात वापरल्या जाणा-या कौशल्यांचा विचार करुण्यात आला आहे. प्रशिक्षण अधिक प्रभावी व समयोचित होण्यासाठी ऑगस्ट २०१३ सत्रापासून सेमिस्टर पध्दत सुरु झाली आहे. प्रशिक्षण कालावधीत कारखान्यांना भेटी देणे, उद्योगधंद्यातील तज्ञांचे व्याख्यान, कॅम्पस इंटरव्ह्यू आयोजित करणे, प्रशिक्षण संपताच शिकाऊ उमेदवारी, नोकरी मिळवून देण्यासाठी मदत करणे या सारखे उपक्रम राज्यातील सर्वच संस्थांत केले जातात.

युवकास आवश्यक असलेले पायाभूत प्रशिक्षण औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये दिल्यानंतर औद्योगिक आस्थापनेत वापरण्यात येणारी यंत्रसामुग्री व तंत्र यांचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करुन सर्व दृष्टीने पूर्ण कुशल बनावा यासाठी शिकाऊ उमेदवारी योजना अस्तित्वात आली. शिकाऊ उमेदवारांना केंद्र शासनाने मंजूर केलेल्या दरानुसार प्रशिक्षण कालावधीमध्ये विद्यावेतन मिळते. या योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील साधारणत: ११,००० औद्योगिक आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारांच्या एकूण १ लक्ष जागा स्थित करण्यात आलेल्या आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन उत्तीर्ण होणा-या उमेदवारांपेक्षा शिकाऊ उमेदवारीसाठी उपलब्ध जागा अधिक असल्याने प्रत्येक उत्तीर्ण उमेदवारांस संधी उपलब्ध आहे.

औ.प्र.संस्थां मधील प्रशिक्षण पूर्ण केल्यावर उच्च शिक्षण घेऊ इच्छिणा-या उमेदवारांना पदविका अभ्यासक्रमाच्या दुस-या वर्गात थेट प्रवेश दिला जातो. अशा प्रकारे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना रोजगार, स्वयंरोजगार, शिकाऊ उमेदवारी योजनेतर्गत रोजगाराची संधी व उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध आहे.

औ.प्र.संस्थांमधील प्रवेशाची पारंपारिक पध्दत ही प्रचंड वेळखाऊ आणि मोठ्या संख्येने मनुष्यबळ लागणारी अशी होती. ऑगस्ट २०१३ प्रवेश सत्रापासून राज्यात शासकीय औ.प्र.संस्थेतील प्रवेश प्रथमत:च ऑनलाईन करण्यात आले. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमुळे वेळ, पैसा आणि मनुष्यबळ यांची बचत झाली असून त्यामध्ये पारदर्शकपणाही आला आहे. प्रवेश कामासाठी निदेशकांचा वाया जाणारा वेळ आता प्रशिक्षणावर केंद्रीत झाला असून त्याचा उपयोग जून व जुलै सारख्या सर्वात महत्वाच्या महिन्यात प्रशिक्षणासाठी व परिक्षेसाठी मार्गदर्शन करण्यास झाला. तसेच एका तालुक्याचा अर्जदार तालुक्याबाहेरच्या कोणत्या औ.प्र.संस्थांमध्ये कोणत्या व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी पात्र आहे ही माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध झाली व त्यांना पात्रतेप्रमाणे उपलब्ध सर्व व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी प्राधान्यक्रम देवून एकच अर्ज भरता आला. या ऑनलाईन पध्दतीमुळे अर्जदारांना एकाच कालावधीत वेगवेगळया ठिकाणी प्रवेशासाठी उपस्थित राहण्यासारखी संभ्रमाची परिस्थिती राहिली नाही.

२०१३ मध्ये शासकीय औ.प्र.संस्थेतील प्रवेश प्रक्रिया व २०१५ मध्ये खाजगी औ.प्र.संस्थेतील प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. याचा अनुभव व होणारे फायदे लक्षात घेता राज्यातील सर्वच शासकीय व खाजगी औ.प्र.संस्थांमधील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेतर्गंत प्रवेशासाठी केंद्रीय ऑनलाईन पद्धत राबविण्यात येत आहे. प्रवेशोच्छुक उमेदवारांनी व पालकांनी माहिती पुस्तिकेत देण्यात आलेली माहिती, प्रवेश पध्दती व नियम तसेच प्रमाणित कार्यपद्धती यांचा अभ्यास करुन व सद्सद्विवेक बुद्धीने ऑन लाईन प्रवेश अर्ज सादर करावा जेणे करून नंतर अडचणी उद्भवणार नाहीत.

आपल्या उज्ज्वल भवितव्यासाठी संचालनालया तर्फे मन:पुर्वक शुभेच्छा !!

संचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य

## अनुक्रमाणिका



| तपशिल | पान क्र. |
|---|---|
| कौशल्य विकास व उद्योजकता विभागाबाबत संक्षिप्त माहिती | ६ |
| व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाची व याअंतर्गत येणाऱ्या विविध योजनांची संक्षिप्त माहिती | ६ |



### माहिती पुस्तिका भाग – १
### औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रवेशासाठी प्रवेश नियमावली व प्रवेश पध्दती



| तपशिल | पान क्र. |
|---|---|
| १.० **सर्वसामान्य** | १४ |
| १.१ माहितीपुस्तिकेत नमूद संक्षिप्त रुपे | १४ |
| १.२ परिभाषा | १४ |
| १.३ केंद्रीय प्रवेश प्रक्रिया माध्यमातून शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेत सक्षम अधिकाऱ्याची भूमिका | १५ |
| १.४ केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेसाठी जागांची उपलब्धता | १६ |
| १.५ केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेसाठी उपलब्ध जागांचे वाटप | १६ |
| १.५.१ मूळ तालुका पातळीवरील ७० % जागा | १७ |
| १.५.२ तालुकाबाह्य पातळीवरील ३० % जागा | १७ |
| १.५.३ महाराष्ट्र राज्याबाहेरील व अनिवासी भारतीयांकरिता जागा | १७ |
| १.६ औ.प्र.संस्थामधील जागा वाटप आणि आरक्षण | १७ |
| २.० **शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत व्यवसायांच्या प्रवेशाकरिता पात्रता निकष** | १८ |
| ३.० **उमेदवारांचे प्रकार** | १९ |
| ३.१ महाराष्ट्र राज्यातील उमेदवार व मूळ तालुक्यातील उमेदवारांचे प्रकार | १९ |
| ३.२ महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार | २० |
| ३.३ अनिवासी भारतीय उमेदवार | २० |
| ४.० **चालू प्रशिक्षण वर्षामध्ये शिल्प कारागीर प्रशिक्षण योजने अंतर्गत व्यवसायांचा प्रथम वर्ष पुनर्प्रवेश / नवीन प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार** | २० |
| ५.० **आरक्षण** | २० |
| ५.१ महाराष्ट्र राज्याच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र मंडळाकडून जो उमेदवार तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रम घेऊन माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाला आहे अशा उमेदवारांना १०% आरक्षणाची तरतूद | २० |
| ५.२ संरक्षण सेवेतील कर्मचाऱ्यांच्या मुला/मुलींकरिता आरक्षण | २१ |
| ५.३ अपंगत्व असलेल्या उमेदवारांकरिता आरक्षण | २१ |
| ५.४ स्त्री उमेदवाराकरिता आरक्षण | २२ |
| ५.५ क्विन्स मेरी खाजगी औ.प्र.संस्था, पुणे येथे संरक्षण सेवा श्रेणीकरिता आरक्षण | २२ |
| ५.६ मागासवर्गीय उमेदवारांकरिता आरक्षण | २२ |
| ५.७ धार्मिक अल्पसंख्यांकांकरिता आरक्षित जागा | २३ |
| ५.७.१ शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये धार्मिक अल्पसंख्यांक उमेदवारांकरिता आरक्षित तुकडया | २३ |
| ५.७.२ अल्पसंख्यांकांकरिता संस्था म्हणून नोंदविण्यात आलेल्या खाजगी औ.प्र. संस्था | २४ |
| ५.८ अनुसूचित जाती कार्यक्रम (SCP), आदिवासी उपयोजना (TSP) व आदिवासी सार्वत्रिकरण योजनेतर्गत शासकीय औ.प्र.संस्थामध्ये असलेल्या आरक्षणाचा आकृतीबंध | २४ |
| ६.० **विविध प्रकारच्या उमेदवारांकरिता आवश्यक असणारी कागदपत्रे** | २५ |
| ७.० **भाषांतर** | २५ |
| ८.० **गुणवत्तेसाठी गुणाधिक्य** | २५ |
| ९.० **गुणानुक्रमांक देणे** | २५ |
| ९.१ गुणानुक्रम | २५ |
| ९.२ सम गुणवत्ता झाल्यास सापेक्ष गुणवत्ता | २६ |

| तपशिल | पान क्र. |
|---|---|
| ९.३ पूर्व तपासणी / पूर्व मुल्यांकनामुळे गुणातील बदल | २६ |
| **१०.० केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्यांमधील प्रवेशाबाबत नियम** | २६ |
| **११.० जागा वाटपाची तर्क पध्दती** | २७ |
| ११.१ प्रथम टप्पा - सर्व उमेदवारांकरिता | २७ |
| ११.२ टप्पा दुसरा - संबंधित खुल्या/मागासवर्गातील उमेदवार | २७ |
| ११.३ टप्पा तिसरा - विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता | २८ |
| ११.४ टप्पा चौथा - संबंधित मागास प्रवर्ग उमेदवार गटाकरिता | २८ |
| ११.५ टप्पा पाचवा - सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता | २८ |
| ११.६ टप्पा सहावा - अपंग प्रवर्गातील उमेदवारांकरिता | २८ |
| ११.७ टप्पा सातवा - धार्मिक अल्पसंख्यांक उमेदवारांकरिता | २८ |
| ११.८ टप्पा आठवा - राज्यस्तरीय गुणांकानुसार सर्व आरक्षित उमेदवारांकरिता (मूळ तालुका आणि तालुकाबाह्य जागा एकत्रित करुन) | २८ |
| ११.९ टप्पा नववा - सर्व राज्यस्तरीय उमेदवारांकरिता फक्त गुणक्रमांकानुसार (कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाशिवाय) | २९ |
| **१२.० प्रवेश फेरीनुसार जागा वाटपाच्या टप्प्यांची अंमलबजावणी** | २९ |
| **१३.० केंद्रीय प्रवेश पध्दतीचे टप्पे** | ३० |
| १३.१ टप्पा क्र. I - माहिती पुस्तिका | ३० |
| १३.२ टप्पा क्र. II - ऑन लाईन अर्ज भरणे व अर्ज स्विकृती केंद्रावर अर्ज निश्चित करणे | ३० |
| १३.३ टप्पा क्र. III – महाराष्ट्रातील, महाराष्ट्र राज्याबाहेरील आणि अनिवासी भारतीय उमेदवारांची तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे | ३१ |
| १३.४ टप्पा क्र. IV - प्रवेश फेरीसाठी पर्याय देणे | ३२ |
| १३.५ टप्पा क्र. V - जागा वाटप करणे (Allotment of Seat) | ३२ |
| १३.६ टप्पा क्र. VI - संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये व्यक्तीश: हजर राहून केंद्रीय प्रवेश प्रक्रीया फेरीमध्ये प्रवेशाचे निश्चितीकरण करण्याचे नियम | ३२ |
| १३.७ टप्पा क्र. VII - पाचवी प्रवेशफेरी - जिल्हास्तरीय समुपदेशन फेरी | ३३ |
| १३.८ टप्पा क्र. VIII - सहावी प्रवेशफेरी - शासकीय औ.प्र. संस्थांसाठी संस्थास्तरीय समुपदेशन फेरी | ३४ |
| १३.९ टप्पा क्र. IX - संस्था स्तरावरील प्रवेश | ३४ |
| १३.१० टप्पा क्र. X - प्रवेशोत्तर कार्यवाही | ३४ |
| **१४.० मूळ प्रमाणपत्रे ठेवून घेण्याबाबत** | ३५ |
| **१५.० प्रशिक्षण शुल्क, अनामत रक्कम व सवलत बाबत विवरण** | ३५ |
| **१६.० प्रवेश रद्द प्रक्रिया व शुल्क परतावा** | ३७ |
| **१७.० संकीर्ण** | ३७ |
| **१८.० वसतीगृहात राहण्याची सोय** | ३७ |
| **१९.० आचरण आणि शिस्त** | ३७ |
| **२०.० रॅगिंग प्रतिबंधाबाबत कार्यवाही** | ३८ |
| **२१.० हमीपत्र** | ३९ |
| **२२.० प्रशिक्षणार्थ्यांची बदली** | ४० |
| **प्रपत्र** | |
| **प्रपत्र - १: व्यवसाय तपशीलाची यादी आणि पात्रता** | ४१ |
| **प्रपत्र - २: शासकीय आणि खाजगी औ.प्र.संस्थांची यादी** | ४७ |
| **प्रपत्र - ३: प्रवेशाकरिता आवश्यक कागदपत्रांची यादी** | ४८ |
| **प्रपत्र - ४: अर्ज स्वीकृती केंद्राकडून उमेदवारांना विविध सेवा पुरविण्याकरिता आकारलेले शुल्क** | ५१ |
| **प्रपत्र - ५: जिल्हास्तरीय समुपदेशन फेरी राबविणाऱ्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची यादी** | ५२ |
| **प्रपत्र - ६: विविध योजनेअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची यादी** | ५४ |

## माहिती पुस्तिका भाग – २
## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रवेश प्रक्रीयेतील विविध स्तरावर करावयाच्या कार्यवाहीसाठी प्रमाणित कार्यपध्दती


| | तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| १.० | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेशासाठी ऑन लाईन प्रवेश अर्ज सादर करणे व अर्ज निश्चित करण्याच्या कार्यवाहीसाठी प्रमाणित कार्यपध्दती | ५६ |
| २.० | औ.प्र.संस्थेतील प्रवेशासाठी औ.प्र. संस्थानिहाय व व्यवसाय निहाय विकल्प व प्राधान्य सादर करण्याच्या कार्यवाहीसाठी प्रमाणित कार्यपध्दती | ६७ |
| ३.० | प्रवेश अर्ज निश्चित केल्यानंतर अर्ज व/वा प्राथमिक गुणवत्ता यादी बाबत हरकती नोंदविण्यासाठी (Grievance Redressal) अनुसरावयाची प्रमाणित कार्यपध्दती | ७०<br>७१ |
| ४.० | नोंदणीकृत व अर्ज निश्चित केलेल्या उमेदवारांसाठी गुणवत्ता क्रमांक व प्रवेशस्थिती तपासण्यासाठी प्रमाणित कार्यपध्दती | ७१ |
| ५.० | प्रवेश फेरीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांसाठी Online निवडपत्र (Allotment Letter) प्राप्त करण्याची प्रमाणित कार्यपध्दती | ७२ |
| ६.० | प्रवेशनिश्चिती करण्याची प्रमाणित कार्यपध्दती | ७२ |
| ७.० | खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील संस्था स्तरावरील प्रवेश निश्चिती करण्याची प्रमाणित कार्यपध्दती | ७३ |
| ८.० | पाचवी प्रवेशफेरी - जिल्हास्तरीय समुपदेशन फेरीत प्रवेशाकरिता उमेदवारांनी अवलंबविण्याची प्रमाणित कार्यपध्दती | ७३ |
| ९.० | सहावी प्रवेशफेरी - शासकीय औ.प्र. संस्थांसाठी संस्थास्तरीय समुपदेशन फेरीत प्रवेशाकरिता उमेदवारांनी अवलंबविण्याची प्रमाणित कार्यपध्दती | ७३<br>७४ |
| १०.० | प्रवेश रद्द करण्याकरिता उमेदवारांनी अवलंबविण्याची प्रमाणित कार्यपध्दती | |
| ११.० | नोंदणीकृत उमेदवारांसाठी पासवर्ड बदलणे अथवा पुनर्स्थापित (Forgot/ Change/ Reset Password) करण्याच्या कार्यवाहीसाठी प्रमाणित कार्यपध्दती | ७६ |
| १२.० | संक्षिप्त स्वरुपात प्रवेश प्रक्रियेतील टप्पे | |

## कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

सन २०१४ पासून मा. पंतप्रधान यांच्या "मेक इन इंडिया" या संकल्पनेस अनुसरुन "स्कील इंडिया" या नावाने कौशल्य विकास या कार्यक्रमास केंद्र शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले असून, या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय स्तरावर कौशल्य विकास व उद्योजकता या स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना केली आहे. या अनुषंगाने तसेच मा. मुख्यमंत्री यांच्या "मेक इन महाराष्ट्र" या ध्येयास अनुसरुन राज्यात कौशल्य विकास अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी दिनांक १५.०१.२०१५ च्या शासन निर्णयान्वये पूर्वीच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे रुपांतर करुन कौशल्य विकास व उद्योजकता विभाग या स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत एकीकडे बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे हे शासनासमोर सर्वात मोठे आव्हान आहे तर दुसरीकडे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये कुशल मनुष्यबळाची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच मेक इन इंडिया, डिजीटल इंडिया, स्वच्छ भारत, स्मार्ट शहरे, सांसद आदर्श ग्रामयोजना, प्रधानमंत्री जन धन योजना इत्यादी उपक्रमांना राष्ट्रीय प्राधान्य देण्यात आल्याने देखील विविध क्षेत्रातील रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात निर्माण होत आहेत. याशिवाय सध्या राज्यात शासनाचे विविध विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील महामंडळे यांचे मार्फत विविध प्रवर्गातील लाभार्थींना वर नमूद विविध प्रकारच्या रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहेत. तथापि, यामध्ये समन्वयाचा अभाव असून एकसूत्रता नसल्यामुळे या योजनांच्या फलनिष्पत्तीची माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध न होता या योजनांचे नियोजन, कार्यान्वयन, संनियंत्रण, मूल्यमापन इ. बाबींवर खर्च होणाऱ्या साधनांचा अचूक, किफायतशीर व प्रभावी वापर होत नव्हता. ही पार्श्वभूमी लक्षात घेता राज्यातील मनुष्यबळाचे कौशल्य विकसित करुन त्यांना मागणी असलेल्या क्षेत्रात रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्धतेद्वारे परिवार व समाजाचा एक उत्पादक सदस्य म्हणून सन्मानाने आपले भावी आयुष्य समर्थपणे घडविता यावे, तसेच विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे एकात्मिकरित्या नियोजन व अंमलबजावणीतून "मेक इन इंडिया" आणि "मेक इन महाराष्ट्र" यासारख्या संकल्पना साकार करुन आपल्या राज्याच्या अर्थव्यवस्थेचे बळकटीकरण करता यावे, यासाठी कौशल्य विकासासंबंधी सर्व समावेशक अभियान राबविण्याचा शासनाचा मानस होता.

वरील पार्श्वभूमीवर मा.पंतप्रधान यांच्या स्कील इंडिया या संकल्पनेस अनुसरून महाराष्ट्र राज्याने "कुशल महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र" हे ध्येय (Vision) समोर ठेवले असून, राज्यातील युवक-युवतींचे कौशल्य विकासाद्वारे सक्षमीकरण करुन त्यांना अधिक मागणी असलेल्या उद्योग, सेवा व तत्सम क्षेत्रात रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी "प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता विकास अभियान" राबविण्यात येत आहे.

कौशल्य विकास व उद्योजकता विभागाअंतर्गत विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर खालील संस्था कार्यान्वीत आहेत.

- व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय
- महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ
- महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद
- महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी
- कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय
- अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ

## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय

महाराष्ट्र राज्यात सर्व स्तरावर तांत्रिक शिक्षण देण्यांची जबाबदारी एकत्रितरित्या सोपविण्याच्या दृष्टीने १९४८ साली तंत्रशिक्षण संचालनालयाची स्थापना करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर अल्पावधीतच महाराष्ट्र राज्याने औद्योगिक क्षेत्रात मोठी झेप घेतली. औद्योगिक उत्पादनाच्या घटक रचनेत लक्षणीय बदल झाल्यामुळे या औद्योगिक घटकांना निरनिराळया स्तरावर लागणारे तांत्रिक प्रशिक्षित मनुष्यबळ व त्यांच्याकरिता पुनर्प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने राज्यात प्रशिक्षणाच्या सोईमध्ये प्रचंड वेगाने वाढ झाली. या विविध कार्यक्रमांचे संचालन व प्रशासन यांची सर्वांगीण प्रगती होण्याच्या दृष्टीने तंत्र शिक्षण संचालनालयाचे १९८४ साली विभाजन करुन तंत्रशिक्षण संचालनालय व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय अशी दोन संचालनालये निर्माण करण्यात आली. यापैकी व्यवसाय शिक्षणांतर्गत

माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम राबविले जातात व व्यवसाय प्रशिक्षणांतर्गत केंद्रशासन पुरस्कृत शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना व शिकाऊ उमेदवारी योजना या प्रमुख योजना राबविण्यात येतात.

संचालनालयाचे ध्येय:

- औद्योगिक आस्थापनांना लागणाऱ्या कुशल तांत्रिक प्रशिक्षित मुनष्यबळाचा सातत्याने पुरवठा करणे.
- तंत्रज्ञानात कालानुरूप होणारे बदल विचारात घेवून त्यानुसार प्रशिक्षणात सुधारणा करुन प्रशिक्षणाचा दर्जा अद्ययावत ठेवणे.
- व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण समाजातील सर्व स्तरातील घटकांना उपलब्ध करुन देवून उमेदवाराला रोजगार व स्वयंरोजगारासाठी सिध्द करणे.

## व्यवसाय प्रशिक्षणाअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजना

**१. शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेची ठळक वैशिष्ट्ये:**

१.१ राज्यातील एकूण ४१७ शासकीय व ४९१ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधुन एकूण ७९ प्रकारच्या व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते. त्यात अभियांत्रिकी गटातील एक वर्ष कालावधीचे एकूण २३ व्यवसाय अभ्यासक्रम, दोन वर्ष कालावधीचे एकूण ३२ व्यवसाय अभ्यासक्रम, तसेच बिगर अभियांत्रिकी गटात एक वर्ष कालावधीचे २४ व्यवसाय अभ्यासक्रमांचा अंतर्भाव आहे. औ.प्र.संस्थेतील ११ व्यवसाय अभ्यासक्रमात प्रवेशासाठी इयत्ता १० वी अनुत्तीर्ण व ६८ व्यवसाय अभ्यासक्रमात प्रवेशासाठी इयत्ता १० वी उत्तीर्ण अशी शैक्षणिक अर्हता विहीत करण्यात आली आहे. या व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण रोजगार महासंचालनालय, नवी दिल्ली ने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमानुसार दिले जाते. अभ्यासक्रम यशस्वारीत्या पूर्ण करुन परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेवारास रोजगार महासंचालनालय, नवी दिल्ली कडुन राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परीषदेचे (NCVT) अखिल भारतीय व्यवसाय प्रमाणपत्र दिले जाते. सदर प्रमाणपत्रास आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त आहे.

१.२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील व्यवसाय अभ्यासक्रमांमध्ये प्रात्यक्षिक (Practical) भाग ७० टक्के व सैध्दांतिक (Theory) भाग ३० टक्के आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यावर रोजगार व स्वयंरोजगाराबरोबरच उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना पदविका अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्गात थेट प्रवेश दिला जातो.

१.३ राज्यातील सर्व समाजघटकांना व्यवसाय शिक्षणाचा लाभ मिळावा या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या औ.प्र.संस्थांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | औ.प्र.संस्थांचे प्रकार | शासकीय औ.प्र.संस्था |
|---|---|---|
| १ | सर्वसाधारण औ.प्र.संस्था | ३०७ |
| २ | आदिवासी उमेदवारांसाठी | ६१ |
| ३ | फक्त महिलांसाठी | १५ |
| ४ | आदिवासी आश्रमशाळामध्ये औ.प्र.संस्था | २८ |
| ५ | अनु.जाती व नवबौध्द उमेदवारांसाठी | ४ |
| ६ | अल्पसंख्यांक उमेदवारांसाठी | २ |
| ७ | Total | ४१७ |

१.४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत विविध व्यवसाय अभ्याक्रमात प्रशिक्षण देताना सदर प्रशिक्षणासाठी उपलब्ध पायाभुत सुविधांचा महत्तम विनियोग व्हावा व कुशल मनुष्यबळाचे प्रमाण वाढावे म्हणून राज्यात महापालिका क्षेत्रातंर्गत असलेल्या ४१ शासकीय औ.प्र. संस्थेत तीन पाळीत, २३४ शासकीय औ.प्र. संस्थेत दोन पाळीत व १४२ शासकीय औ.प्र. संस्थेत एका पाळीत प्रशिक्षण दिले जाते.

१.५ प्रवेश प्रक्रीयेत पारदर्शकता व प्रवेशोच्छुक उमेदवारांच्या सोईसाठी राज्यातील शासकीय औ.प्र.संस्थांची प्रवेशसत्र ऑगस्ट २०१३ सत्राची तथा शासकीय बरोबरच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची प्रवेशसत्र ऑगस्ट २०१५ पासूनची प्रवेशप्रक्रीया ही केंद्रीय ऑनलाईन प्रवेश पध्दतीने राबविण्यात येत असून याप्रकारे ऑनलाईन स्वरुपात प्रवेश प्रक्रीया राबविणारे महाराष्ट्र हे देशातील प्रथम राज्य ठरले आहे.

१.६ औ.प्र.संस्थेतील प्रवेशासाठी सर्वसाधारण दिनांक ०१ जून पासून प्रवेश अर्ज उपलब्ध करुन देण्यात येत असून प्रवेशाची सर्व कार्यवाही दिनांक ३१ ऑगस्ट पर्यंत पूर्ण होवून दिनांक ०१ सप्टेंबर पासून नियमित प्रशिक्षणास सुरुवात होते. प्रवेशाबाबत तपशिलवार माहिती प्रादेशिक कार्यालय, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय व औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे उपलब्ध असते. प्रवेशाच्या अधिक माहितीसाठी www.admission.dvet.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

१.७ औ.प्र.संस्थेतील सुविधा प्रशिक्षणासाठी अत्याधुनिक यंत्रसामुग्री व उपकरणांसह सुसज्ज कार्यशाळा, प्रात्यक्षिकासाठी हत्यार संच, कच्चामाल, ॲपरन आणि स्टेशनरी, अभ्यासाकरिता ग्रंथालय/पुस्तक पेढी, दररोज ये-जा करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी रेल्वे व

बस मासिक पासकरिता शिफारसपत्र, गरजू विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश, आदिवासी मुला-मुलींकरिता स्वतंत्र वसतिगृह, अपंग विद्यार्थ्यांसाठी नियमाप्रमाणे सुविधा, रोजगार व स्वयंरोजगारासाठी नाव नोंदणी या बाबी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

१.८ प्रशिक्षण शुल्क: शासकीय औ.प्र.संस्थांध्मये प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांसाठी अंत्यत माफक प्रशिक्षण शुल्क आकारण्यात येते. आर्थिकदृष्टया मागासवर्गीय प्रशिक्षणार्थ्यांना (EBC) प्रशिक्षण शुल्कातुन सुट मिळते तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना(उन्नत गटातील प्रशिक्षणार्थी वगळुन) फी माफी देण्यात येते.

१.९ निर्वाहभत्ता: वसतिगृहात राहणाऱ्या व वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या (ST) प्रशिक्षणार्थ्यांना आदिवासी विभागाने मंजूर केल्यानुसार प्रतिमाह अनुक्रमे रु. ६००/- व रु. ५००/- या प्रमाणे निर्वाहभत्ता देण्यात येतो.

१.१० विद्यावेतन: आर्थिकदृष्टया मागास असलेल्या (EBC) प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांच्या ५० टक्के प्रशिक्षणार्थ्यांना प्रतिमाह रु. ४०/- विद्यावेतन मंजूर करण्यात येते. उच्च उत्पन्न गटातील मागासवर्गीय प्रशिक्षणार्थी वगळून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सदरचे विद्यावेतन रु. ६०/- प्रतिमाह या प्रमाणे मंजूर करण्यात येते.

१.११ शिष्यवृत्ती: अनुसूचित जातीच्या (SC) प्रशिक्षणार्थ्यांना तसेच अल्पसंख्यांक समाजातील प्रशिक्षणार्थ्यांना (Minority) मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती नियमाप्रमाणे अनुज्ञेय आहे.

## २. शिकाऊ उमेदवारी योजना (शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१):

२.१ योजनेंची उद्दिष्ट्ये : युवकास आवश्यक असलेले पायाभूत प्रशिक्षण औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये दिल्यानंतर उद्योगात असणाऱ्या प्रक्रियांमध्ये लागणारी यंत्रसामुग्री तसेच नवीन व आधुनिक तंत्रज्ञानानुसार औद्योगिक आस्थापनेत वापरण्यात येणारी यंत्रसामुग्री व तंत्र यांचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करुन सर्व दृष्टीने पूर्ण कुशल बनावा यासाठी शिकाऊ उमेदवारी योजना अस्तित्वात आली.

२.२ योजनेचे स्वरुप : देशातील खाजगी, निमशासकीय व शासकीय उद्योगधंद्याच्या गरजाप्रमाणे प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी केंद्रशासनाने उद्योगधंद्यामध्ये इंजिनिअरींग , केमिकल, प्रिंटिंग, कॅटरींग इत्यादी ३९ गटात वर्गीकरण केले असून २५९ (५१ सेंटर ऑफ एक्सलन्स) व्यवसाय निर्देशित केले आहेत. महाराष्ट्र राज्यात त्यातील एकुण १८१ व्यवसायात प्रशिक्षण देण्यात येते. कालमानाप्रमाणे आवश्यकतेनुसार नवीन व्यवसाय निर्देशित करण्यात येतात व कालबाहय व्यवसाय वगळण्यात येतात. विविध व्यवसाय अभ्यासक्रमात प्रशिक्षण घेतलेले उमेवारांबरोबरच अप्रशिक्षित (Freshers) उमेदवारांची शिकाऊ उमेदवारी योजनेतर्गत निवड करण्यात येते.

२.३ महाराष्ट्र राज्यातील आस्थापनांची माहिती उपलब्ध करुन घेणे: महाराष्ट्र राज्यात विविध विभागाकडून त्यांच्याकडे नोंदी असलेल्या आस्थापनांची माहिती उपलब्ध करुन घेऊन ती संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या प्रादेशिक कार्यालय व संबंधित मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र यांचेकडे सर्वेक्षण/ पुनर्सर्वेक्षण करण्याकरिता पाठविली जाते. संबंधित मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्राचे सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार त्या आस्थापनेत जाऊन शिकाऊ उमेदवारी योजना १९६१ प्रमाणे प्रशिक्षण सुविधा व एकूण कामगारांच्या २.५ ते १० टक्के या प्रमाणात शिकाऊ उमेदवारांची संख्या निश्चित केली जाते. या निश्चित केलेल्या जागांवर भरती करण्याकरिता कार्यालयीन अधिसूचना निर्गमित केली जाते.

२.४ शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत ४६ शासकीय व १५७ अशासकीय मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रामध्ये प्रशिक्षण देण्याची सोय आहे.

२.५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून व्यवसाय परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना या योजने खाली निर्देशित संस्थेतून व्यवसायामध्ये प्रशिाक्षण कालावधीमध्ये सूट मिळते. अशी सूट मिळालेल्या उमेदवारांना मुलभूत प्रशिक्षण घ्यावे लागत नाही. त्यांना आस्थापनेत कार्यशाळा प्रशिक्षण सैध्दांतिक विषयाचे प्रशिक्षण द्यावे लागते. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या शिकाऊ उमेदवारांची परीक्षा केंद्र शासनाच्या राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेकडून दरवर्षी एप्रिल व ऑक्टोबर महिन्यात घेण्यात येते व उत्तीर्ण उमेदवारांना सदर परिषदेकडून प्रमाणपत्र देण्यात येते.

२.६ शिकाऊ उमेदवारांची भरती प्रक्रिया: या योजनेखाली विहीत अर्हता धारक शिकाऊ उमेदवार नेमण्याचे अधिकार व जबाबदारी संबंधित आस्थापनेची आहे. आस्थापनेचे प्रतिनिधी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रत्यक्ष जाऊन मुलाखत / लेखी परिक्षेद्वारे उमेदवारांची निवड करतात. आस्थापना / सेवा योजन कार्यालय जाहिरात किंवा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण विद्यार्थ्यांची यादी मागवून उमेदवारांची निवड करतात. तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण झालेल्या इच्छुक उमेदवारांना शासकीय मुलभुत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रातून मुलाखत पत्र देऊन त्यांना शिकाऊ उमेदवारी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातात. तसेच आस्थापना व शिकाऊ उमेदवार एकाच ठिकाणी येण्याकरिता प्रादेशिक स्तरावर औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये भरती मेळाव्याचे आयोजन केले जाते. सदर भरती मेळाव्यात आस्थापना अधिकारी उमेदवारांची मुलाखत घेऊन त्यांना शिकाऊ उमेदवार म्हणून नियुक्त करतात. सत्र निहाय भरती मेळाव्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रामध्ये दिली जाते, तसेच भरती मेळाव्याचे वेळापत्रक औद्योगिक प्रशिक्षण संस्थाच्या सूचना फलकावर लावले जाते व सर्व आस्थापनांना कळविले जाते.

२.७ शिकाऊ उमेदवारी योजने अंतर्गत शिकाऊ उमेदवार भरतीचा कालावधी: राज्यामध्ये शिकाऊ उमेदवारांची भरती फेब्रुवारी / ऑगस्ट या सत्रात करण्यात येते. फेब्रुवारी सत्रासाठी १६ जानेवारी ते १५ एप्रिल व ऑगस्ट सत्रासाठी १६ जुलै ते १५ ऑक्टोबर या कालावधीत भरती करण्यात येते.

२.८ वय व शारिरिक पात्रता:

| | | | |
|---|---|---|---|
| वय : | १४ वर्षे पूर्ण | वजन : | २५.४ किलो (कमीत कमी) |
| उंची : | १३७ से.मी (किमान) | दृष्टी : | चांगली |

उमेदवाराना शारिरीकदृष्टया पात्र असल्याचे अधिकृत वैद्यकिय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करावे लागते. शारिरीकदृष्टया अपंग उमेदवारांचा ठराविक व्यवसायासाठी वैद्यकिय अधिकाऱ्यांचे शिफारशीनुसार विचार करण्यात येतो.

२.९ शिकाऊ उमेदवारांना मिळणारे विद्यावेतन: शिकाऊ उमेदवारांना केंद्र शासनाने मंजूर केलेल्या दरानुसार प्रशिक्षण कालावधीमध्ये विद्यावेतन मिळते. सद्य:स्थितीत प्रचलित दर खालील प्रमाणे आहेत.
(रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय, नवी दिल्ली यांची अधिसूचना जी.एस.आर. ६८० (अ), दिनांक २२ सप्टेंबर २०१४)

| वर्ष | संबंधित राज्य किंवा संघ राज्य क्षेत्र यांनी अधिसूचनेद्वारे निश्चित केलेल्या अर्ध कुशल मजुरांच्या किमान मजुरीच्या |
|---|---|
| प्रथम वर्ष | ७०% |
| द्वितीय वर्ष | ८०% |
| तृतीय वर्ष | ९०% |
| चतुर्थ वर्ष | ९०% |

२.१० औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून व्यवसाय परीक्षा उत्तीर्ण करणाऱ्या उमेदवारांना शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत प्रशिक्षण कालावधीत अनुज्ञेय असलेली सूट विचारात घेऊन प्रवेश दिला जातो. त्यांची प्रशिक्षणाची सूट लक्षात घेऊन त्यांना त्या अनुषंगाने विद्यावेतन देय असते.

२.११ शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना: ज्या आस्थापनांचा व्यवहार १०० कोटी पेक्षा कमी आहे अशा एम.एस.एम.ई. आस्थापनांतील शिकाऊ उमेदवारांपैकी जास्तीत जास्त १० शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनाच्या ५०% रक्कमेची प्रतिपूर्ती केंद्र शासनामार्फत केली जाते. सदर रक्कम उमेदवाराच्या बँक खात्यामध्ये थेट जमा केली जाते.

२.१२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना रोजगार, स्वयंरोजगार, शिकाऊ उमेदवारी योजनेतर्गत रोजगाराची व उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध असल्याने शिकाऊ उमेदवारी योजनेतर्गत प्रशिक्षित व अप्रशिक्षित उमेदवारांसाठी उपलब्ध असणाऱ्या जागा रिक्त राहत असतात.

## ३. जागतिक बँक योजना:

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधुन दिले जाणारे प्रशिक्षण कारखान्यातील नवीन तंत्रज्ञानाच्या गरजेशी सुसंगत होण्यासाठी व जागतिक दर्जाचे कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी कारखाने / औद्योगिक संघटना यांच्या सहभागाने केंद्रशासनाने सन २००५ या वर्षापासून पुढील पाच वर्षामध्ये देशातील एकूण ५०० औ.प्र.संस्थांचा दर्जा उंचावून त्यांना सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये रुपांतरीत करण्यांची योजना सुरू केली . सदर योजनेत राज्यातील ८७ औ.प्र.संस्थांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. केंद्र व राज्य शासन यांचेमधील सामंजस्य करारानुसार या योजनेसाठी अनुक्रमे ७५% व २५% अर्थसहाय्य प्राप्त होत आहे.

## ४. पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजना:

ज्या संस्थांचा जागतिक बँक प्रकल्पांतर्गत समावेश झालेला नाही, अशा देशातील एकूण १३९६ शासकीय औ.प्र.संस्थांचा दर्जावाढ या योजनेतर्गत करण्यात आला आहे. यात राज्यातील एकूण २५० संस्थांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. या योजनेत सहभागी संस्थांना प्रत्येकी २.५० कोटी रु. एवढी रक्कम व्याजमुक्त कर्ज रुपाने केंद्रशासनाकडुन देण्यात आलेली आहे. सदरहू कर्जाची परतफेड ११ व्या वर्षापासुन ३० व्या वर्षापर्यंत समान २० हप्त्यात करावयाची आहे.

## ५. प्रगत व्यवसाय प्रशिक्षण योजना:

प्रगत व्यवसाय प्रशिक्षण योजना ही नाविन्यपूर्ण, बहुकौशल्यावर आधारीत योजना केंद्र व राज्य सरकारांनी सामाईकरित्या संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय कामगार संघटना व जागतिक बँक यांच्या अर्थसहाय्याने सन १९७७ मध्ये सुरू केली. सदर योजनेतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये औद्योगिक आस्थापनांमध्ये कार्यरत मनुष्यबळांस कौशल्यावर आधारीत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात.

राज्यात अंबरनाथ, नाशिक,औंध-पुणे, अमरावती, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापुर आणि नांदेड या ८ शासकीय औ.प्र.संस्थांच्या आवारात प्रगत व्यवसाय प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आली असून सदर संस्थेत एकूण १४ अल्पमुदतीच्या विविध व्यवसायांमध्ये ८२४० प्रशिक्षण क्षमता उपलब्ध आहे.

**६. हायटेक प्रशिक्षण योजना:**

सदर योजना रोजगार महासंचालनालयामार्फत जागतिक बँक प्रकल्पांतर्गत १९९९ साली उच्च तंत्रज्ञान व बहुकौशल्यावर आधारीत प्रशिक्षणासाठी सुरू करण्यात आली. सदर योजनेतर्गत शासकीय औ.प्र.संस्था, औंध-पुणे येथे इलेक्ट्रॉनिक्स व संगणकक्षेत्रात अल्पमुदतीच्या प्रशिक्षणासाठी हायटेक प्रशिक्षण योजना सुरू करण्यात आली.

**७. वरील प्रमुख प्रशिक्षण योजनांसमवेतच राज्यातील शासकीय औ.प्र.संस्थांमार्फत खालील योजना राबविण्यांत येतात:**

७.१ आर्टिझन टु टेक्नोकॅट प्रशिक्षण योजना
७.२ लोकसेवा केंद्र
७.३ उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना
७.४ मागेल त्याला व्यवसाय प्रशिक्षण योजना
७.५ अल्पसंख्यांकासाठी प्रशिक्षण योजना

**८. सामंजस्य करार (MoU):**

केंद्र शासनाच्या दिनांक २७.०२.२०१४ रोजीच्या अधिसुचनेनुसार कंपनी कायदयाखाली नोंदणीकृत असलेल्या सर्व औद्योगिक आस्थापनांना त्यांच्या वार्षिक उत्पन्नापैकी काही निधी हा Corporate Social Responsibility Policy या अंतर्गत विविध समाजोपयोगी कामांसाठी खर्च करावयाचा असतो त्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे शासन निर्णय क्र. पीपीपी २०१३/प्र.क्र.१०३/१३/व्यशि-५, दिनांक २९ मे, २०१५ अन्वये Corporate Social Responsibility (CSR) अंतर्गत विविध औद्योगिक आस्थापनेबरोबर करण्यात येणाऱ्या सामंजस्य करारास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने आजपर्यंत राज्यातील विविध नामांकीत औद्योगिक आस्थापना जसे Tata Motors, Tata Power, Mahindra & Mahindra, Samsung, Maruti Suzuki, Siemens, Tata Trust, Bosch, Volkswagen, Bharat Forge, Sandvik, Hindustan Aeronautics, Bharat Electronics Ltd., Mazgaon Dock, Loreal, Konkan Railway, Schindler इत्यादीं समवेत सामंजस्य करार केलेले आहेत. सद्य:स्थितीत २७ नामांकीत औद्योगिक आस्थापनांशी सामंजस्य करार करण्यात आलेले असून त्यांच्याव्दारे एकूण रु. ६३.९२ कोटी एवढया निधीचा विनियोग करुन राज्यातील शासकीय औ.प्र. संस्थांतील प्रशिक्षण सुविधांचा दर्जावाढ करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. याअंतर्गत राज्यातील शासकीय औ.प्र. संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना अल्पमुदतीचे प्रशिक्षण देणे, On the Job Training, रोजगाराच्या संधी, निदेशक प्रशिक्षण कार्यक्रम, अद्ययावत यंत्रसामुग्री व उपकरणे उपलब्ध करुन देणे, इतर आवश्यक सोईसुविधा उपलब्ध करुन देणे यासारख्या बाबी प्रथम प्राधान्याने राबविण्यात येत आहेत.

ग्रामीण भागातील प्रशिक्षणार्थ्यांना औद्योगिक आस्थापनेतील तज्ञांचे मार्गदर्शन प्राप्त होण्यासाठी संचालनालय, L&T Ltd व Confederation of Indian Industry यांच्या मार्फत प्रत्येक शनिवारी Video Conferencing च्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतो.

**९. मॉडेल आय.टी.आय:**

राज्यातील शासकीय औ.प्र. संस्थांमार्फत अद्ययावत यंत्रसामुग्री व उपकरणांवर आधारीत प्रशिक्षण देणे व संस्थेत उमेदवारांसाठी आवश्यक त्या सर्व सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी राज्यातील शासकीय औ.प्र.संस्था यात मॉडेल औ.प्र.संस्था म्हणून विकसित करण्याचे योजिले आहे. त्यानुसार प्रथम टप्प्यामध्ये राज्यातील चंद्रपूर व लातूर जिल्हयातील खालील प्रत्येकी ०६ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना “Model ITI” म्हणून विकसित करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

चंद्रपूर जिल्हा: १) चंद्रपूर २) राजूरा ३) मूल ४) नागभीड ५)बल्लारपूर ६)पोंभूर्णा
लातूर जिल्हा : १) लातूर २) लातूर (मु) ३) निलंगा ४) औसा ५) शिरुर-अनंतपाळ ६) देवणी

सदर संस्था “मॉडेल संस्था” म्हणून विकसित करण्यासाठी खालील बाबींचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे

९.१ यंत्रसामुग्री, उपकरणे व हत्यारे यांची १००% त्रुटीपुर्तता करणे
९.२ अद्ययावत वर्गखोल्या, कार्यशाळा व संगणक कक्ष तयार करणे
९.३ नवीन प्रशासकीय इमारत बांधणे / अस्तित्वात असलेल्या इमारतीचे नुतनीकरण करणे.
९.४ ग्रंथालय,वसतिगृह, क्रिडांगण, उपाहारगृह, प्रसाधनगृह, व्हर्च्युअल क्लासरुम, CNC Lab, महिला कक्ष, अभिलेख कक्ष, भांडारकक्ष इत्यादी सुविधांची उपलब्धता सदर संस्थांमध्ये करणे वा सदर सुविधा पूर्व अस्तित्वात असल्यास त्यांचे नूतनीकरण/ दर्जावाढ करणे.
९.५ Pre-Fabricated Structure च्या संकल्पनेवर आधारीत आधुनिक तंत्रज्ञान वापरुन कार्यशाळेची अल्प कालावधीत निर्मिती करणे.
९.६ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या भुखंडास Wall Compound , Wi-Fi Campus, CCTV सुविधा उपलब्ध करुन त्यांचे प्रक्षेपण प्रादेशिक कार्यालय व संचालनालय स्तरावर पाहणे.

९.७ कर्मचारी व प्रशिक्षणार्थी यांची Biometric उपस्थिती घेवून त्याची माहिती प्रादेशिक कार्यालय व संचालनालयास उपलब्ध करुन देणे.

९.८ संस्थेस ISO:२९९९० प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे

९.९ सुरक्षेसंबंधी सर्व उपाययोजना करणे

९.१० स्थानिक औद्योगिक आस्थापनांच्या मदतीने अल्पमुदतीचे व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करणे

९.११ Workshop, Seminars, On the job Training, Employment Engagement यासाठी औद्योगिक आस्थापनांशी सामंजस्य करार करणे

९.१२ Video Conferencing व्दारे प्रशिक्षणार्थ्यांसाठी औद्योगिक आस्थापनांतील तज्ञांचे मार्गदर्शन सत्र आयोजित करणे

९.१३ संस्थांना DGT, नवी दिल्ली कडुन “A” ग्रेड ( ५ Star) प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे

वरील सर्व सुविधांसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या स्तरावर “संस्था विकास आराखडा (Institute Development Plan)” तयार करण्यात आला असून त्याप्रमाणे नियोजन व अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सदर १२ शासकीय औ.प्र. संस्था “मॉडेल आय.टी.आय” म्हणून विकसित करण्यासाठी आवश्यक रु.३० कोटी इतक्या निधीपैकी आर्थिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये रु.१५ कोटी प्राप्त झाले असुन त्याव्दारे दर्जावाढ करावयाची कार्यवाही करण्यात आली आहे.

## १०. महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद

**(Maharashtra State Council of Vocational Training -MSCVT)**

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार यांच्या अखत्यारीत प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांचेमार्फत देशात व्यवसाय अभ्यासक्रम व व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांना राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची (National Council of Vocational Training -NCVT) अनुक्रमे मान्यता व संलग्नता देण्यात येते. याच धर्तीवर राज्यात व्यवसाय अभ्यासक्रम व व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांना अनुक्रमे मान्यता व संलग्नता देण्यासाठी महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची (Maharashtra State Council of Vocational Training - MSCVT) स्थापना करण्यात आली आहे.

शासन निर्णय क्र. आयटीआय-२०१४/प्र.क्र.१४८/व्यशि-३, दि.१८ जानेवारी, २०१७ अन्वये महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची (MSCVT) सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० अंतर्गत दिनांक २९ मार्च, २०१७ रोजी “सोसायटी” म्हणून नोंदणी करण्यात आली आहे.

विविध औद्योगिक आस्थापनांकडून त्यांना आवश्यक तंत्रकुशल बळाच्या उपलब्धतेसाठी नवीन व्यवसाय अभ्यासक्रम (Customized Courses) तयार करुन महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेसाठी प्राप्त होत आहेत. या अभ्यासक्रमांना परिषदेची मान्यता देवून असे अभ्यासक्रम रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीसाठी निश्चितच उपयुक्त ठरतील. तसेच या अभ्यासक्रमांतर्गत प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षण संस्थांना परिषदेची संलग्नता दिल्यास प्रशिक्षणाची गुणवत्ता राखणे व सर्वमान्य प्रमाणपत्र देणे शक्य होईल. परिषदेचे प्रमाणपत्र दिल्यास पात्र प्रशिक्षणार्थ्यांना शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेंतर्गत सामावून घेणे शक्य होईल.

देशात NCVT यांचे शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत दिर्घ मुदतीचे मान्यताप्राप्त व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्यासाठी संलग्नता प्राप्त प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांना “औद्योगिक प्रशिक्षण संस्था (Industrial Training Institute - ITI)” म्हणून संबोधिले जाते. याच धर्तीवर MSCVT यांचे अल्प व दिर्घ मुदतीचे मान्यताप्राप्त अभ्यासक्रम राबविण्यासाठी संलग्नता प्राप्त संस्थांना “व्यवसाय प्रशिक्षण संस्था (Vocational Training Institute- VTI)” म्हणून संबोधिले जाईल. MSCVT अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांची कौशल्य चाचणी ही बाहय चाचणी संस्थांमार्फत घेण्यात येईल. अशा चाचणी घेण्यास इच्छुक संस्थांना देखील MSCVT यांची संलग्नता घेणे अनिवार्य असेल व अशा कौशल्य चाचणी संस्थांना “कौशल्य चाचणी संस्था (Skill Assessment Agency - SAA)” म्हणून संबोधिले जाईल.

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र.कौविउ-२०१७/प्र.क्र.२३७/अभियान-१ दिनांक २६ डिसेंबर, २०१७ अन्वये राज्यातील कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेमार्फत व्यवसाय अभ्यासक्रमांना तसेच व्यवसाय प्रशिक्षण संस्था/ कौशल्य चाचणी संस्थांना संलग्नता देण्याबाबतच्या कार्यपध्दतीस मान्यता देण्यात आली आहे.

## व्यवसाय शिक्षणाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना

**१. माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम:**

१.१ सन १९८६ च्या शैक्षणिक धोरणानुसार माध्यमिक स्तरावर कार्यानुभव आधारीत विषय घेण्यावर भर देण्यात आला होता, जेणकरुन भावी आयुष्यात विद्यार्थी वर्ल्ड ऑफ वर्कसाठी तयार होऊ शकतील. सदर अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना मेकॅनिकल, इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी विषयातील मुलभूत कौशल्ये आत्मसात करता येतात. त्या कौशल्याचा दैनंदिन जीवनात उपयोग करता येतो. आवश्यकतेनुसार सदर कौशल्यांची व्याप्ती वाढविण्यासाठी विद्यार्थी अभियांत्रिकी क्षेत्रातील उच्च शिक्षणाकडे वळू शकतो अथवा आपल्या आवडीप्रमाणे रोजगार / स्वयंरोजगार निवडू शकतो. माध्यमिक स्तरावर कार्यानुभव विषयाऐवजी "तांत्रिक" विषयात उपलब्ध तीन विषयापैकी एक ऐच्छिक विषय म्हणून निवडता येतो.

१.२ इ. ९ वी व १० वीमध्ये पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविला जातो. शासकीय तंत्र माध्यमिक शाळा / केंद्रांच्या १० कि.मी. परिसरातील सहयोगी शाळांमधील इ. ९वी व १०वी स्तरावरील शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आठवडयात १ दिवस पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविला जातो.

१.३ सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांतर्गत खालील अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| V१ : Multi Skill Foundation Course | V२: Mechanical Technology |
| V३: Electrical Technology | V४: Electronics Technology |
| V५: Automobile Service Technician | V६: General Duty Assistant |
| V७: Private Security | V८: Retail Business |

१.४ अभियांत्रिकी चित्रकलेची मुलतत्वे, विद्युत व इलेक्ट्रॉनिक्स विषयातील सर्कीट डायग्राम तसेच संगणकाची मुलभूत तत्वे विद्यार्थ्यांना शिकविण्यात येतात.

१.५ इ. १०वी उत्तीर्ण उमेदवारांना तंत्र निकेतन प्रवेशासाठी १५% जागा राखीव आहेत .इ. ११ वी व्यावसायिक प्रवेशासाठी ४०% जागा राखीव आहेत तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेशासाठी २५% जागा राखीव आहेत.

**२. + २ स्तरावरील द्विलक्षी अभ्यासक्रम:**

२.१ डॉ. कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार + २ स्तरावर व्यवसाय शिक्षणाची जोड देऊन अधिकाधिक विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण द्यावे व रोजगार / स्वयंरोजगार करण्यास प्रवृत्त करावे, जेणेकरुन महाविद्यालयीन शिक्षणाकडे जाणारा लोंढा थांबवावा या उद्देशाने राज्यात शैक्षणिक वर्ष १९७८-७९ पासून शासन निर्णय क्रमांक Education & Youth Service Department Resolution No.VOC/XXXVIII, Dt. ९th August, १९७८ अन्वये द्विलक्षी अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. इ. १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी स्वयंरोजगार करावा व ते शक्य नसल्यास पुढील शिक्षण सुरु ठेवावे असा दुहेरी हेतू या योजनेमध्ये आहे म्हणून या योजनेस द्विलक्षी अभ्यासक्रम असे संबोधण्यात येते.

२.२ तांत्रिक, वाणिज्य, कृषी व मत्स्य अशा चार गटांमधून १३ द्विलक्षी अभ्यासक्रम सन २०१५-२०१६ पासून कार्यरत करण्यात आलेले आहेत.

२.३ इ. ११ वी व १२ वी मध्ये आवश्यक ६ विषयांपैकी एक भाषा व विज्ञान शाखेतील एका विषयात सूट देऊन त्या ऐवजी ३३% व्याप्ती असलेला २०० गुणांचा एक व्यवसाय अभ्यासक्रम शिकविण्यात येतो.

२.४ इ. १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ अंतर्गत निर्देशित अभ्यासक्रमात "व्होकेशनल टेक्निशियन" म्हणून १ वर्षाची शिकाऊ उमेदवारी करण्याची संधी असून प्रशिक्षण काळात प्रति माह रु.१४४०/- दराने विद्यावेतन अनुज्ञेय आहे.

२.५ इ. १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाच्या ठराविक प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना थेट बसण्याची मुभा आहे.

**३. + २ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम:**

३.१ डॉ. कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाने इ.११ वी व इ. १२ वीच्या स्तरावर व्यवसाय शिक्षणाची जोड द्यावी व जास्त विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन रोजगार व स्वयंरोजगार करण्यास प्रवृत्त करावे व महाविद्यालयीन शिक्षणाकडे जाणारा लोंढा थांबवावा या हेतूने ७०% व्याप्ती असेलेले व्यवसाय अभ्यासक्रम राज्यात सन १९८८-८९ पासून शिक्षण व सेवायोजन विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीओसी- १०८८/५१५१८/(७०३)/तांशि-२ ड, दिनांक २८.१०.१९८८ अन्वये सुरु करण्यात आलेले आहेत. या व्यवसाय अभ्यासक्रमांमध्ये ७०% प्रात्यक्षिकांचा व उर्वरित ३०% अभ्यासक्रमात दोन भाषा विषय व एक पायाभूत अभ्यासक्रम (जनरल फाऊंडेशन कोर्स) यांचा समावेश आहे. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून हे व्यवसाय अभ्यासक्रम सुधारीत करण्यात आलेले आहेत.

३.२ तांत्रिक, वाणिज्य, कृषी, मत्स्य, अर्धवैद्यकीय व गृहशास्त्र अशा ६ गटांमधून सुधारीत २० व्यवसाय अभ्यासक्रम सन २०१५-२०१६ पासून सुरु करण्यात आलेले आहेत.

३.३ इ. १२ वीची अंतिम परीक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात येते.प्रशिक्षण कालावधीत कारखान्यात / उद्योगात प्रत्यक्ष कामाच्या जागी ऑन द जॉब ट्रेनिंगची सोय असते.

३.४ इ. १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ अंतर्गत निर्देशित व्यवसायात "व्होकेशनल टेक्निशियन" म्हणून बोट (BOAT) मार्फत १ वर्षाची शिकाऊ उमेदवारी करण्याची संधी असून प्रशिक्षण काळात रु.१४४०/- प्रती माह दराने विद्यावेतन अनुज्ञेय आहे .पदविकेच्या द्वितीय वर्षात थेट प्रवेशासाठी २% जागा आरक्षित आहे.

३.५ काही अभ्यासक्रमांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांशी समकक्षता देण्यात आलेली आहे तसेच D.Ed. प्रवेशास पात्र आहे.

१.० **सर्वसामान्य:**

प्रस्तुत नियम शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेतर्गंत येणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागू राहतील

अ. महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था

ब. महाराष्ट्र राज्यातील सर्व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था

१.१ **माहितीपुस्तिकेत नमूद संक्षिप्त रुपे:**

| | | |
|---|---|---|
| ARC | : | अर्ज स्विकृती केंद्र |
| CAP | : | केंद्रीय प्रवेश प्रक्रीया |
| CBSE | : | केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ |
| CGPA | : | एकूण श्रेणी बिंदुची सरासरी (Comulative Grade Point Average) |
| CTS | : | शिल्पकारागीर प्रशिक्षण योजना |
| DGT | : | प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली |
| DVET | : | व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य |
| GoI | : | भारत सरकार |
| GoM | : | महाराष्ट्र सरकार |
| HT | : | मूळ तालुका |
| HSC | : | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र |
| IMC | : | संस्था व्यवस्थापन समिती |
| ITI | : | औद्योगिक प्रशिक्षण संस्था |
| MSBSHSE | : | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ |
| MSBTE | : | महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई |
| NCVT | : | राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद |
| NRI | : | अनिवासी भारतीय |
| OHT | : | मूळ तालुकाबाहय |
| OMS | : | महाराष्ट्र राज्याबाहेरील |
| PIO | : | मूळ भारतीय नागरिक |
| SCVT | : | राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद |
| SL | : | राज्य पातळी |
| SSC | : | माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र |

१.२ **परिभाषा:**

१.२.१ **औद्योगिक प्रशिक्षण संस्था** म्हणजे शासनामार्फत चालविल्या जाणाऱ्या अथवा शासन मान्यताप्राप्त खाजगी संस्थांव्दारा शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेतर्गत येणाऱ्या व्यवसायांमध्ये प्रशिक्षण देणाऱ्या, राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद अथवा राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची संलग्नता प्राप्त असलेल्या राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र अथवा राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेचे प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या संस्था.

१.२.२ **शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था** म्हणजे महाराष्ट्र शासनातर्फे चालविल्या जाणाऱ्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था.

१.२.३ **खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था** म्हणजे खाजगी व्यवस्थापनामार्फत कायम विनाअनुदानित तत्वावर चालविल्या जाणाऱ्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था

१.२.४ **व्यवसाय/अभ्यासक्रम** म्हणजे प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली किंवा राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत सुचित केलेले व्यवसाय/अभ्यासक्रम. येथे व्यवसाय व अभ्यासक्रम एकाच अर्थाने असुन त्यांची अदलाबदल होवु शकते.

१.२.५ **युनिट** म्हणजे विशिष्ट व्यवसाय अभ्यासक्रमाची तुकडी की ज्यासाठी स्वतंत्र शिल्पनिदेशक नियुक्त केला आहे.

१.२.६ **शिल्पनिदेशक** म्हणजे औ.प्र.संस्थांमध्ये शिक्षण / प्रशिक्षण देणारा कर्मचारी

१.२.७ **प्रशिक्षणार्थी** म्हणजे औ.प्र.संस्थेमध्ये प्रवेशित उमेदवार

१.२.८ **प्रशिक्षण वर्ष** म्हणजे औ.प्र.संस्थेमधुन प्रशिक्षण दिले जाणारा ०१ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट दरम्यानचा कालावधी

१.२.९ **एनसीव्हीटी** व्यवसाय म्हणजे राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची संलग्नता प्राप्त औ. प्र. संस्थेत शिकविले जाणारे व्यवसाय अभ्यासक्रम

१.२.१० **एससीव्हीटी** व्यवसाय म्हणजे राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची संलग्नता प्राप्त औ.प्र.संस्थेत शिकविले जाणारे व्यवसाय अभ्यासक्रम

१.२.११ **मंजूर प्रवेशक्षमता** म्हणजे महासंचालनालय, रोजगार व प्रशिक्षण, नवी दिल्ली यांच्याकडुन मंजूर व्यवसाय तसेच राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेकडुन संलग्नित अभ्यासक्रमनिहाय मंजूर जागांची संख्या किंवा राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेच्या अभ्यासक्रमनिहाय मंजूर जागांची संख्या.

१.२.१२ **सुपरन्युमरी** म्हणजे व्यवसाय अभ्याक्रमांच्या तुकडीमधील मंजूर प्रवेशक्षमतेतील गळती रोखण्यासाठी मंजूर प्रवेशक्षमतेच्या ३०% वा प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांनी निर्धारित केल्याप्रमाणे अधिकचे प्रवेश करण्यास दिलेली परवानगी

१.२.१३ **एकूण प्रवेशक्षमता** म्हणजे एका तुकडीची प्रवेशक्षमता = मंजूर जागा म्हणजे मंजूर प्रवेशक्षमता + सुपरन्युमरी

१.२.१४ **राज्य सरकार** म्हणजे महाराष्ट्र राज्याचे सरकार

१.२.१५ **संचालक** म्हणजे **संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

१.२.१६ **केंद्रीय प्रवेश प्रक्रीया** म्हणजे शासकीय व खाजगी औ.प्र.संस्थांसाठी एकाच ऑनलाईन अर्जाव्दारे करण्यात येणारी केंद्रीय प्रवेश पध्दत

१.२.१७ **संकेतस्थळ** म्हणजे **http://admission.dvet.gov.in**

१.२.१८ **प्रवेशअर्ज स्विकृती केंद्र** म्हणजे औ.प्र.संस्था जेथे उमेदवार ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे, पडताळणी, स्विकृती आणि निश्चिती करु शकतो. सर्व शासकीय व खाजगी औ.प्र.संस्था या औ.प्र.संस्थांच्या प्रवेशप्रकीयेत प्रवेश अर्ज स्विकृती केंद्र असतील

१.२.१९ **उमेदवार** म्हणजे महाराष्ट्र राज्यातील शासकीय तसेच खाजगी औ.प्र.संस्थांमधील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेतर्गत येणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी अर्ज स्विकृती केंद्रावर प्रवेश अर्ज भरुन अर्ज निश्चित करणारा प्रवेशोच्छुक अर्जदार

१.२.२० **इंटर-से-मेरीट** म्हणजे गुणवत्ता क्रमांक

१.२.२१ **सक्षम अधिकारी** म्हणजे माहिती पुस्तिकेत उल्लेख केल्याप्रमाणे प्रवेश अर्ज मागविणारा व प्रवेशप्रकीयेची अंमलबजावणी करण्यासाठी शासनामार्फत नियुक्त अधिकारी. सद्यस्थितीत **संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय** यांना शासनातर्फे सक्षम प्राधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे.

१.२.२२ **सक्षम अधिकाऱ्याचा प्रतिनिधी** म्हणजे प्रवेशप्रकीया सुरळीत पार पाडण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यास मदतनीस म्हणून सक्षम अधिकाऱ्याकडुन नियुक्त अधिकारी

१.२.२३ **अनिवासी भारतीय** म्हणजे भारतीय आयकर कायदा १९६१ च्या कलम ६ मध्ये दिलेल्या व्याख्येनुसार असणारे.

**१.३ केंद्रीय प्रवेश प्रक्रिया माध्यमातून शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेत सक्षम अधिकाऱ्याची भूमिका**

१.३.१ सर्व शासकीय आणि खाजगी औ.प्र.संस्थानी पुढील प्रशिक्षण वर्षाच्या प्रवेशासाठी उपलब्ध व्यवसाय तुकडयांची माहिती संलग्नतेच्या तपशिलासह सक्षम अधिकाऱ्याकडे दिनांक **३१ मार्च** पर्यंत सादर करावीत.

१.३.२ खाजगी औ.प्र.संस्था संस्थास्तरावरील जागा सक्षम अधिकाऱ्याकडे केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या माध्यमातुन, भरण्यासाठी **१५ एप्रिल** पर्यंत हस्तांतरीत करु शकतात

१.३.३ अल्पसंख्याक दर्जा प्राप्त खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी, आपल्या संस्थेतील उपलब्ध जागांपैकी अल्पसंख्यांकासाठी राखीव आरक्षित जागांची कमाल मर्यादा, केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या माध्यमातुन भरण्यासाठी **१५ एप्रिल** पर्यंत सक्षम अधिकाऱ्याकडे सादर करावीत.

१.३.४ सक्षम अधिकारी, सर्व औ.प्र.संस्थांसाठी, औ.प्र.संस्थानिहाय व व्यवसाय अभ्यासक्रमनिहाय प्रवेशक्षमता **१५ एप्रिल** पर्यंत प्रकाशित करतील

१.३.५ सर्व औ.प्र.संस्था पुढील प्रशिक्षण वर्षा साठीची प्रवेशक्षमता तपासतील व काही त्रुटी असल्यास सक्षम अधिकाऱ्यास त्याबाबत **२० एप्रिल** पर्यंत कळवतील.

१.३.६ सक्षम अधिकारी सर्व औ.प्र.संस्थानिहाय व व्यवसाय अभ्यासक्रम निहाय प्रवेशक्षमता **१ मे** पर्यत प्रकाशित करतील.

१.३.७ **३० एप्रिल** रोजी किंवा त्या पूर्वी राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद अथवा राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेकडुन संलग्नता प्राप्त व्यवसायांच्या तुकडयांच्या संस्थानिहाय व व्यवसायनिहाय जागांचा त्यांच्या प्रवेश क्षमतेमध्ये / उपलब्ध जागेमध्ये समावेश केला जाईल व सर्व औ.प्र.संस्थांकरिता **१५ मे** पर्यंत व्यवसायनिहाय अंतिम उपलब्ध

जागा संकेतस्थळावर जाहीर केल्या जातील. उपरोक्त दिनांकानंतर संलग्नता प्राप्त करुन घेणाऱ्या कोणत्याही व्यवसायाची तुकडी प्रवेशप्रक्रीयेसाठी त्या प्रशिक्षण वर्षात ग्राहय धरली जाणार नाही.

१.३.८ औ.प्र.संस्थेतील व्यवसाय अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमतेसह यादी ही प्रवेश पुस्तिकेतील **प्रपत्र-२** म्हणून एक भाग आहे. मात्र, औ.प्र.संस्थेतील सुधारीत व्यवसाय अभ्यासक्रमनिहाय यादी संकेतस्थळावर उपलब्ध असेल. दरम्यान माहितीपुस्तिका अगोदर प्रकाशित झाल्यामुळे सक्षम अधिकारी माहिती पुस्तीकेसोबत प्रपत्र २ स्वतंत्रपणे पुरवतील.

१.३.९ सक्षम अधिकारी ऑनलाइन प्रवेश संकेतस्थळावर उपलब्ध करतील.

१.३.१० सक्षम अधिकारी औ.प्र.संस्थेतील प्रवेश प्रक्रीयेसाठी माहिती पुस्तिका व प्रवेशासाठी व प्रवेशानंतर करावयाच्या कार्यवाहीसाठी प्रमाणित कार्यपध्दती प्रकाशित करतील

१.३.११ सक्षम अधिकारी केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेस अनुसरून मिळालेल्या व्यवसाय निहाय जागेवर प्रवेशासाठी व प्रवेश निश्चित करण्यासाठी उमेदवारास जागा मिळालेल्या शासकीय अथवा खाजगी औ.प्र.संस्थेत जाण्यासाठी मार्गदर्शन करेल.

१.३.१२ ऑनलाईन प्रवेश संकेतस्थळावर सर्व औ.प्र.संस्थांना प्रवेश प्रक्रीया पूर्ण करण्यासाठी Login पुरवेल आणि प्रवेशित उमेदवाराची माहिती प्रशिक्षणासाठी व परीक्षेच्या प्रक्रीयेसाठी अग्रेषित करेल.

१.३.१३ सक्षम अधिकाऱ्याने शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत व्यवसायांतील प्रवेशा संबंधात घेतलेले सर्व निर्णय अंतिम आणि सर्व संबंधितांना बंधनकारक असतील

१.३.१४ केंद्रीय प्रवेश प्रक्रिया ही **सुचकदर्शी** प्रक्रीया असून सक्षम अधिकारी यात सुधारणा करतील किंवा आवश्यकता असल्यास जास्तीत जास्त प्रवेश होण्याची खात्री करण्यासांठी प्रवेश प्रक्रिये दरम्यान प्रवेशासंबंधी काही बदल करुन संबंधित माहिती वृतपत्रातून प्रकाशित करतील आणि प्रवेशाच्या संकेतस्थळावर दृश्य स्वरुपात उपलब्ध करुन देतील.

१.३.१५ शासकीय आणि खाजगी औ.प्र.संस्थांमधील प्रवेशित उमेदवारांकडून प्राप्त तक्रार अर्जाबाबत देखील सक्षम अधिकारी तक्रार निवारण अधिकारी म्हणून काम करतील.

१.३.१६ उमेदवारांना प्रवेशप्रक्रीयेसाठी आवश्यक असणाऱ्या दस्तऐवज/ प्रमाणपत्राची यादी माहे मार्च मध्ये संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे.

## १.४ केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेसाठी जागांची उपलब्धता:

सक्षम अधिकाऱ्यामार्फत केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या माध्यमातून प्रवेशाकरिता उपलब्ध करुन दिलेल्या जागांचा तपशील खालील तक्त्यात दिला आहे.

| अ.क्र. | संस्था | केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेकरिता सक्षम अधिकाऱ्याकडे उपलब्ध जागा (एकूण प्रवेशक्षमतेच्या प्रत्येक तुकडीसाठी उपलब्ध जागा (टक्केवारीत)) | संस्था स्तरावरील प्रवेशासाठी संस्थेत उपलब्ध जागा (एकुण प्रवेशक्षमतेच्या प्रत्येक तुकडीसाठी उपलब्ध जागा (टक्केवारीत) |
|---|---|---|---|
| १. | सर्व शासकीय औ.प्र.संस्था | १००% | ०% |
| २. | सर्व खाजगी औ.प्र.संस्था | ८०% | २०% |

## १.५ केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेसाठी उपलब्ध जागांचे वाटप:

प्रवेश अधिकाऱ्याकडून प्रवेशाकरिता उपलब्ध जागांचे वाटप खाली नमूद केलेल्या तपशीलाप्रमाणे होईल.

| जागा वाटप | प्रवेशाकरिता उपलब्ध जागा |
|---|---|
| मूळ तालुका पातळीवर ७०% जागा (Home Taluka Level) | सर्वसामान्य प्रवेश पध्दतीमध्ये नियम क्र.१.४ नुसार दिलेल्या जागांपैकी ७०% जागा हया उमेदवाराने ज्या तालुक्यामधुन माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली आहे त्याच तालुक्यामधील औ.प्र.संस्थेत प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. |
| तालुकाबाह्य पातळीवर ३०% जागा (Outside Home Taluka Level) | सर्वसामान्य प्रवेश पध्दतीमध्ये नियम क्र.१.४ नुसार दिलेल्या जागांपैकी ३०% जागा हया महाराष्ट्र राज्यातील उमेदवाराने ज्या तालुक्यामधुन माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली आहे त्या तालुक्याव्यतिरिक्त इतर तालुक्यातील औ.प्र.संस्थांमध्ये प्रवेशासाठी आरक्षित ठेवण्यांत आल्या आहेत.<br>राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमधील ज्या उमेदवाराने अशा तालुक्याबाहेरील ३०% जागांकरिता पर्याय दिला आहे, त्यांना प्रवेश देण्यात येईल. ३०% जागांपैकी वरील प्रमाणे प्रवेश देवून रिक्त असलेल्या जागा, ७०% जागांकरिता पर्याय दिलेल्या उमेदवारांना पुढील फेरीत प्रवेशाकरिता उपलब्ध होतील. |

१.५.१ **मूळ तालुका पातळीवरील ७०% जागा:**
उमेदवाराने माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) ज्या ठिकाणावरुन दिलेली आहे त्यावर तालुका स्तरावरील ७०% जागांबाबत उमेदवाराची पात्रता ठरविली जाते.
**उदाहरणार्थ:** उमेदवाराने धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातून माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) दिलेली असेल तर संबंधित उमेदवार शिरपुर तालुक्यातील सर्व औ.प्र.संस्थांतील उपलब्ध जागांचा ७०% जागांकरिता पात्र असेल. मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हयातील उमेदवाराने कोणत्याही एका तालुक्यातुन माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) दिलेली असेल तर उमेदवार मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हयातील सर्व औ.प्र.संस्थांमधील उपलब्ध जागांच्या ७०% जागाकरिता पात्र असेल. वरील दोन्ही जिल्यांमधील प्रवेशास अर्ज करणाऱ्या उमेदवारांचा मूळ तालुका म्हणून मुंबई तालुका ग्राहय धरण्यात येईल.

१.५.२ **तालुकाबाह्य पातळीवरील ३०% जागा:**
तालुकाबाह्य पातळीवरील ३०% जागांबाबत, उमेदवाराने ज्या शाळेतून माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) दिलेली आहे त्यावरुन उमेदवाराची पात्रता ठरविली जाईल.
**उदाहरणार्थ:** उमेदवाराने माध्यमिक शालांत परीक्षा धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातून दिलेली असेल तर संबंधित उमेदवार शिरपुर तालुका सोडून इतर सर्व तालुक्यामधील सर्व औ.प्र.संस्थांतील उपलब्ध जागांच्या ३०% जागांकरिता तो पात्र असेल.

१.५.३ **महाराष्ट्र राज्याबाहेरील व अनिवासी भारतीयांकरिता जागा:**
महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औ.प्र.संस्थांमधील गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांना प्रवेश दिल्यानंतर काही जागा रिक्त राहत असल्यास, अशा जागा महाराष्ट्र राज्याव्यतिरिक्त इतर राज्यातील पात्र उमेदवारांना आणि त्यानंतर अनिवासी भारतीय पात्र उमेदवारांना खाली नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रवेशास देण्यात येतील.

१.५.३.१ महाराष्ट्र राज्याबाहेरील व अनिवासी भारतीय अशा सर्व उमेदवारांना खुल्या प्रवर्गात ग्राहय धरण्यात येईल व त्यांना **नियम क्र. २.०** मध्ये नमूद केल्याप्रमाणे पात्रता धारण करणे आवश्यक आहे.
१.५.३.२ महाराष्ट्र राज्याबाहेरील आणि अनिवासी भारतीय उमेदवारांना अनुक्रमे त्यांच्या गुणवत्ता क्रमानुसार प्रवेश दिला जाईल.
१.५.३.३ महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांमधून जागा भरल्यानंतर, सक्षम अधिकारी या श्रेणी मधील उमेदवारांमधून ४थ्या फेरीमध्ये जागा वाटप करतील.
१.५.३.४ प्रथम राज्याबाहेरील उमेदवारांमधून जागा भरण्यात येतील, त्यानंतर जागा रिक्त राहिल्यास अनिवासी भारतीय उमेदवारांमधून जागा भरण्यात येतील.
१.५.३.५ नियमित वेळापत्रकाप्रमाणे महाराष्ट्र राज्याबाहेरील आणि अनिवासी भारतीय उमेदवारांना केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेत नोंद करावी लागेल आणि वेळापत्रकामध्ये दिल्याप्रमाणे ४ थ्या फेरीसाठी पर्याय सादर करावे लागतील.
१.५.३.६ महाराष्ट्र राज्याबाहेरील व अनिवासी भारतीय उमेदवार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेरीसाठी पात्र नाहीत.

१.६ **औ.प्र. संस्थामधील जागा वाटप आणि आरक्षण:**
केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेनुसार प्रवेशाकरिता उपलब्ध असलेल्या जागांची आणि संस्था स्तरावर उपलब्ध असलेल्या जागांची सर्व प्रकारच्या संस्थांमधील वर्गवारी खाली दर्शविल्याप्रमाणे आहे.

| अ. क्र. | संस्थेचे प्रकार | सक्षम अधिकाऱ्याकडे उपलब्ध जागा (एकूण प्रवेशक्षमतेच्या टक्केवारीत) | | | संस्था पातळी वरील जागा @ (एकूण प्रवेशक्षमतेच्या टक्केवारीत) |
|---|---|---|---|---|---|
| | | मूळ तालुका पातळीवरील जागा | तालुकाबाह्य पातळीवरील जागा | राज्यपातळीवरील जागा | |
| १. | शासकीय औ. प्र. संस्था - सर्वसामान्य | ७०% | ३०% | ०% | ०% |
| २. | शासकीय औ. प्र. संस्था - महिला | ०% | ०% | १००% - फक्त महिलांसाठी | ०% |

| अ. क्र. | संस्थेचे प्रकार | सक्षम अधिकाऱ्याकडे उपलब्ध जागा (एकूण प्रवेशक्षमतेच्या टक्केवारीत) | | | संस्था पातळी वरील जागा @ (एकूण प्रवेशक्षमतेच्या टक्केवारीत) |
|---|---|---|---|---|---|
| | | मूळ तालुका पातळीवरील जागा | तालुकाबाह्य पातळीवरील जागा | राज्यपातळीवरील जागा | |
| ३. | शासकीय औ. प्र. संस्था - अल्पसंख्यांकाकरिता | अल्पसंख्यांका व्यतिरिक्त उपलब्ध ३०% जागांच्या ७०% | अल्पसंख्यांका व्यतिरिक्त उपलब्ध ३०% जागांच्या ३०% जागा | ७०% - फक्त अल्पसंख्याकाकरिता | ०% |
| ४. | शासकीय औ. प्र. संस्था - अनुसूचित जाती करिता (SCP) | अनुसूचित जाती व्यतिरिक्त उपलब्ध २०% जागांच्या ७०% | अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उपलब्ध २०% जागांच्या ३०% जागा | ८०% - फक्त अनु. जातीकरिता | ०% |
| ५. | शासकीय औ. प्र. संस्था - अनुसूचित जमाती करिता (TSP) | अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उपलब्ध २५% जागांच्या ७०% | अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उपलब्ध २५% जागांच्या ३०% जागा | ७५% फक्त अनुसूचित जमातीकरिता | ०% |
| ६. | शासकीय औ. प्र. संस्था - सार्वत्रिकरण | अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उपलब्ध ००% जागांच्या ७०% | अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उपलब्ध ००% जागांच्या ३०% जागा | १००% फक्त अनुसूचित जमातीकरिता | ०% |
| ७. | खाजगी औ. प्र. संस्था - सर्वसामान्य | एकूण प्रवेश क्षमतेच्या उपलब्ध ८०% जागेच्या ७०% | एकूण प्रवेश क्षमतेच्या उपलब्ध ८०%जागेच्या ३०% जागा | ०% | एकूण प्रवेक्षमतेच्या २०% |
| ८. | खाजगी औ.प्र. संस्था - अल्पसंख्यांकाकरिता # | केंद्रीय प्रवेश पध्दतीतील उपलब्ध जागांच्या ७०% जागा * | केंद्रीय प्रवेश पध्दतीतील उपलब्ध जागांच्या ३०% जागा* | किमान मर्यादा ५०% फक्त विशेष अल्पसंख्यांकासाठी | कमाल मर्यादा २०% |

\# ज्या खाजगी औ.प्र.संस्थांची अल्पसंख्यांक संस्था म्हणून नोंद आहे अशा संस्था सक्षम अधिकाऱ्यांना केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेतील उपलब्ध जागांमध्ये अल्पसंख्यांक उमेदवारांना असलेल्या आरक्षणाच्या कमाल मर्यादेबाबत १५ एप्रिल पुर्वी कळवतील.

* केंद्रीय प्रवेश पध्दतीतील जागा = एकूण प्रवेशक्षमता - (राज्य स्तरावर विशिष्ट अल्पसंख्यांकाकरिता असलेल्या जागा + संस्था पातळीवरील जागा) केंद्रीय प्रवेश पध्दतीत जागा हया एकूण प्रवेशक्षमतेच्या १००% पेक्षा जास्त असू नयेत.

@ खाजगी औ.प्र.संस्था, संस्था पातळीवरील जागा केंद्रीय प्रवेश पध्दतीव्दारे भरण्यासाठी सक्षम अधिकाऱ्याकडे देऊ शकतात. तथापि, अशी विनंती १५ एप्रिल पूर्वी करण्यात यावी.

## २.० **शिल्प कारागीर प्रशिक्षण योजने अंतर्गत व्यवसायांच्या प्रवेशाकरिता पात्रता निकष:**

२.१ उमेदवार भारतीय नागरिक असावा

२.२ उमेदवाराने वयाची १४ वर्षे पूर्ण केलेली असावी. मेकॅनिक रिपेरींग ॲण्ड मेंटेनन्स ऑफ लाईट ॲण्ड हेवी मोटार व्हेईकल, ड्रायव्हर कम मेकॅनिक, लाईट मोटर व्हेहिकल या व्यवसायांकरिता ३१ जुलै रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षे पूर्ण असले पाहिजे.

२.३ कोणत्याही व्यवसायाच्या प्रवेशाकरिता कमाल वयोमर्यादेची अट नाही.

२.४ व्यवसायनिहाय पात्रतेसाठी उमेदवाराने **प्रपत्र - १** चा संदर्भ घ्यावा.

२.५ राष्ट्रीय मुक्त शाळेतील विज्ञान व गणित हा विषय नसलेले उमेदवार व अपंग शाळेतील उमेदवार अभियांत्रिकी व्यवसायासाठी पात्र नाहीत. अभियांत्रिकी व बिगर अभियांत्रिकी व्यवसायाच्या वर्गवारीसाठी **प्रपत्र - १** चा संदर्भ घ्यावा.

२.६ उमेदवाराचे निकालपत्र श्रेणीस्वरुपात (Grade System) असल्यास, अशा उमेदवारांनी श्रेणी व गुण यांची समकक्षता असलेले संबंधित मंडळाचे अधिकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२.७ उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ किंवा केंद्रीय परीक्षा मंडळा व्यतिरिक्त अन्य मंडळाकडुन उत्तीर्ण झाला असेल तर त्याने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाकडून (MSBSHSE) तसे समकक्षता प्रमाणपत्र आणावे.

२.८ अनिवासी भारतीय उमेदवारांनीही महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाचे (MSBSHSE) असे समकक्षता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

## ३.० उमेदवारांचे प्रकार:

### ३.१ महाराष्ट्र राज्यातील उमेदवार व मूळ तालुक्यातील उमेदवारांचे प्रकार:

सक्षम अधिकाऱ्याच्या अखत्यारीतील महाराष्ट्र राज्यातील जागांवर प्रवेशाकरिता उमेदवारास खालील तक्यांमधील एकातरी पात्रतेच्या निकषाची पुर्तता करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे प्रकार | तालुका स्तरावरील ७०% जागांकरिता उमेदवाराचे पात्रता व तालुकाक्षेत्र निकष | मूळ तालुका |
|---|---|---|---|
| १. | **प्रकार - अ**<br>महाराष्ट्र राज्यातील उमेदवार<br>**Type - A**<br>Maharashtra State Candidates | उमेदवार महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली असावी<br>आणि<br>उमेदवाराचे आई अथवा वडील महाराष्ट्र राज्याचे अधिवास असणारे असावेत. | उमेदवाराचा मूळ तालुका म्हणजे उमेदवाराने माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा (SSC) परीक्षा जेथुन दिलेली असेल ते ठिकाण ज्या तालुका क्षेत्रात येते तो तालुका. |
| २. | **प्रकार - ब**<br>महाराष्ट्रात अधिवास असणारे उमेदवार<br>**Type - B**<br>Maharashtra Domiciled Candidates | "प्रकार — अ" ची पुर्तता करीत नसल्यास<br>आणि<br>उमेदवाराचे आई अथवा वडील महाराष्ट्र राज्याचे अधिवास असणारे असावेत. | उमेदवाराचा मूळ तालुका म्हणजे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र देणारे प्राधिकरण महाराष्ट्र राज्यातील ज्या तालुका क्षेत्रात येते तो तालुका. |
| ३. | **प्रकार - क**<br>केंद्र शासन अथवा केंद्र शासनाच्या उपक्रमामधील कर्मचाऱ्याचा मुलगा / मुलगी<br>**Type - C**<br>Sons and Daughters of Central Govt./ Govt. of India Undertaking Employee | “प्रकार — ब” ची पुर्तता करीत नसल्यास<br>आणि<br>अर्ज भरण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी ज्या उमेदवाराचे आई/वडील केंद्र शासनाचे / केंद्रशासनाच्या उपक्रमामधील कर्मचारी असून ज्यांची नियुक्ती महाराष्ट्र राज्यात झाली आहे आणि जे पदावर रुजु झाले आहेत. | उमेदवाराचा मूळ तालुका म्हणजे महाराष्ट्र राज्यातील ज्या तालुक्याच्या कार्यकक्षेत उमेदवाराचे आई / वडील हे केंद्र शासनाचे / केंद्रशासनाच्या उपक्रमामधील कर्मचारी असून त्यांची नियुक्ती झालेली आहे व ते रुजू झालेले आहेत असा तालुका. |
| ४. | **प्रकार - ड**<br>महाराष्ट्र राज्य शासन अथवा महाराष्ट्र राज्य शासनाच्या उपक्रमामधील कर्मचाऱ्याचा मुलगा / मुलगी<br>**Type - D**<br>Sons and Daughters of Maharashtra State Govt./ Maharashtra State Govt. Undertaking Employee | “प्रकार — क” प्रमाणे पूर्तता करीत नसल्यास<br>आणि<br>उमेदवाराचे आई/ वडील हे महाराष्ट्र राज्य शासन/ महाराष्ट्र राज्य शासनाच्या उपक्रमामधील कर्मचारी आहेत. | उमेदवाराचा मूळ तालुका म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या कार्यकक्षेत उमेदवाराच्या आई / वडीलांची नियुक्ती महाराष्ट्र राज्य शासन / महा. राज्य शासनाच्या उपक्रमामधील कार्यालयात / मुख्यालयात झाली असेल असा तालुका |

| अ. क्र. | उमेदवाराचे प्रकार | तालुका स्तरावरील ७०% जागांकरिता उमेदवाराचे पात्रता व तालुकाक्षेत्र निकष | मूळ तालुका |
|---|---|---|---|
| ५ | **प्रकार - इ**<br>महाराष्ट्र राज्यातील उमेदवार महा. राज्य शासन/ महा.राज्य शासनाच्या उपक्रमामधील / केंद्र शासन / केंद्र शासनाच्या उपक्रमामधील कर्मचारी ज्यांची बदली दुसऱ्या तालुक्यात झालेली आहे अशा उमेदवाराची आई / वडील यांची नियुक्ती झालेल्या तालुक्यात जाण्याची इच्छा आहे.<br>**Type - E**<br>Maharashtra State Candidate, Sons & Daughters of Maharashtra State Govt. / Maharashtra State Govt. Undertaking / Central Govt./ Govt. of India Undertaking Employee who is transferred to a place in another District and the Candidate intends to shift to the District where the Father/Mother is posted | महाराष्ट्र राज्यातील मान्यता प्राप्त शाळेतून इ.८ वी, ९ वी व १० वी परीक्षा दिलेले उमेदवार<br>आणि<br>ज्या तालुक्यातून उमेदवाराने माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली आहे तेथून दुसऱ्या तालुक्यात उमेदवाराचे आई / वडील जे महा. राज्य शासन/ महा.राज्य शासनाच्या उपक्रमामधील/ केंद्र शासन/ केंद्र शासनाच्या उपक्रमामधील कर्मचारी असून त्यांची अर्ज स्वीकृतीच्या अंतिम मुदतीपूर्वी बदली झालेली आहे व ते रुजू झालेले आहेत असा तालुका. | उमेदवाराचा मूळ तालुका म्हणजे महाराष्ट्र राज्यातील ज्या तालुक्याच्या कार्यकक्षेत उमेदवाराच्या पालकांची नियुक्ती झालेली आहे की जे राज्य शासन/ महा. राज्य शासनाच्या उपक्रमामधील,/ केंद्र शासन/ केंद्र शासनाच्या उपक्रमामधील कर्मचारी.<br><br>**टीप:** प्रकार - इ चा पर्याय निवडणारा उमेदवार प्रकार अ ची संधी गमावेल. जर एखाद्या उमेदवाराने प्रकार अ आणि इ दोन्हीकरिता अर्ज केला असेल तर त्याचा/ तिचा प्रकार इ वर हक्क राहून त्यानुसार अर्जाचा मूळ तालुक्याच्या गुणवत्ता यादीनुसार विचार केला जाईल. |

३.२ **महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार:**

महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार भारतीय नागरिक असला पाहिजे जो की नियम ३.१ मधील अनुक्रमे १,२,३,४ आणि ५ म्हणजेच प्रकार अ, ब ,क, ड आणि इ ची पुर्तता करीत नाही आणि जे देशातील महाराष्ट्र राज्याबाहेरील इतर संस्था अथवा शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली आहेत.

३.३ **अनिवासी भारतीय उमेदवार:**

आयकर कायदा १९६१ मधील विभाग ६ मध्ये नमूद केलेल्या परिभाषेप्रमाणे असणारे उमेदवार.

४.० **चालू प्रशिक्षण वर्षामध्ये शिल्प कारागीर प्रशिक्षण योजने अंतर्गत व्यवसायांचा प्रथम वर्ष पुनर्प्रवेश / नवीन प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार:**

ज्या उमेदवाराने मागील प्रशिक्षण वर्षात औ.प्र.संस्थामधून कोणत्याही अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेला असेल, तो उमेदवार चालु वर्षात प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी पात्र आहे. तथापि त्यांना मागील प्रशिक्षण वर्षात पास झालेल्या कोणत्याही विषयात सवलत देण्यात येणार नाही. अशा उमेदवारांना सक्षम अधिकाऱ्याने सूचित केलेल्या नमुन्याप्रमाणे पुढील प्रवेशासाठी पुर्वी प्रवेश घेतलेल्या संस्थेचे ना - हरकत प्रमाणपत्र सादर करावे लागेल. **अशा पुनर्प्रवेश घेतलेले उमेदवार कोणत्याही प्रकारची शासकीय शिष्यवृत्ती/ निर्वाहभत्ता वा इतर सुविधेसाठी पात्र राहणार नाहीत तसेच अशा उमेदवारांना प्रशिक्षण शुल्कात कोणतीही सवलत दिली जाणार नाही.**

५.० **आरक्षण:**

सक्षम अधिकरणाच्या कक्षेमध्ये सामान्य प्रवेश पध्दती अंतर्गत उपलब्ध जागांकरिता विविध प्रकारच्या आरक्षणाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

५.१ **महाराष्ट्र राज्याच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र मंडळाकडून जो उमेदवार तांत्रिक वा व्यावसायिक अभ्यासक्रम घेऊन माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाला आहे अशा उमेदवारांना १०% आरक्षणाची तरतूद.**

५.१.१ व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, यांनी सूचित केलेले तांत्रिक वा व्यावसायिक विषय घेऊन माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा (SSC) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना नियम १.४ मध्ये सूचित केलेल्या

केंद्रीय प्रवेश पध्दतीत उपलब्ध असलेल्या जागा अंतर्गत सर्व अभियांत्रिकी व बिगर अभियांत्रिकी व्यवसायांसाठी उपलब्ध असलेल्या जागांपैकी १०% जागा आरक्षित जागा म्हणून उपलब्ध आहेत.

५.१.२ अशा आरक्षित जागांमध्ये मागासवर्गीय व महिला श्रेणी उमेदवारांकरिता नियमानुसार आरक्षण असेल.

५.२ **संरक्षण सेवेतील कर्मचारी वा कर्मचाऱ्यांच्या मुला/ मुलींकरिता आरक्षण:**

५.२.१ संरक्षण सेवेत कार्यरत असलेल्या अथवा संरक्षण सेवेतील माजी कर्मचारी / कर्मचाऱ्यांच्या पाल्यांकरिता नियम १.४ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे केंद्रीय प्रवेश पध्दती अंतर्गत प्रत्येक औ.प्र.संस्थेमध्ये १% जागा त्याची कमाल १० जागेच्या मर्यादेपर्यंत खाली नमूद केलेल्या तक्त्यातील निवडश्रेणीसाठी उतरत्या प्राधान्य क्रमाने आरक्षित असतील.

| अ.क्र. | संरक्षण श्रेणी | तपशील |
|---|---|---|
| १. | **डी - १ (D - 1)** | युध्दात वीर मरण प्राप्त झालेल्या संरक्षण सेवेतील कर्मचारी / अधिकारी यांचे पाल्य |
| २. | **डी - २ (D - 2)** | युध्दात अपंगत्व प्राप्त झालेला माजी सैनिक |
| ३ | **डी - ३ (D - 3)** | युध्दात अपंगत्व प्राप्त झालेले संरक्षण सेवेतील कर्मचारी / अधिकारी यांचे पाल्य |
| ४. | **डी - ४ (D - 4)** | किमान ५ वर्षे सेवा झालेला माजी सैनिक |
| ५. | **डी - ५ (D - 5)** | महाराष्ट्र राज्यात अधिवास असलेल्या माजी सैनिकांचे पाल्य |
| ६. | **डी - ६ (D - 6)** | महाराष्ट्र राज्यात अधिवास असलेले व सेवेत असलेल्या सैनिकांचे पाल्य |
| ७. | **डी - ७ (D - 7)** | महाराष्ट्र राज्यात बदली झालेली आहे परंतु महाराष्ट्र राज्याचे अधिवास नसणारे संरक्षण सेवेतील कर्मचाऱ्यांचे / अधिकाऱ्यांचे पाल्य |
| ८. | **डी - ८ (D - 8)** | संरक्षण सेवेतील कार्यरत कर्मचारी की जे महाराष्ट्र राज्यातील अधिवास नसणारे, परंतु मुलांच्या शिक्षणाच्या कारणास्तव लगतपूर्वीच्या कार्यालयांतर्गत कुटुंब निवासस्थान ताब्यात ठेवण्याच्या तरतुदीनुसार यांचे कुटुंब महाराष्ट्र राज्यात रहात आहे असा पाल्य, परंतु अशा उमेदवाराने महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली पाहिजे. |

५.२.२ सर्व संरक्षण श्रेणी उमेदवारांचा गुणवत्तेनुसार एकत्रितरित्या विचार करुन संरक्षण सेवेतील कर्मचाऱ्यांच्या पात्रता धारक मुलांकरिता ह्या १% जागा (कमाल १०% जागेच्या मर्यादेत) देण्यात येतील. हया जागा राज्य स्तरावरील जागा म्हणून उपलब्ध असतील.

५.२.३ जर दोन उमेदवारांची गुणवत्ता समान असेल तर संरक्षण श्रेणीसाठी वर नमूद केल्याप्रमाणे प्राधान्यक्रम राहील

५.२.४ भारतीय संरक्षण सेवेत कार्यरत आहेत / होते अशा नागरी कर्मचाऱ्यांच्या मुलांकरिता ही संरक्षण श्रेणी आरक्षणाची तरतूद लागू नाही.

५.३ **अपंगत्व असलेल्या उमेदवारांकरिता आरक्षण:**

५.३.१ कलम ३९ मधील समान संधीच्या, हक्क संरक्षण व संपूर्ण सहभाग अधिनियम १९९५ प्रमाणे नियम १.४ मध्ये विहीत केलेल्या केंद्रीय प्रवेश पध्दती अंतर्गत उपलब्ध जागांच्या ३% जागा प्रत्येक औ.प्र.संस्थामध्ये अपंग उमेदवारांना आरक्षित असतील.

५.३.२ खाली दिलेल्या प्रकाराप्रमाणे हे आरक्षण अपंग उमेदवारांना लागू होईल.

| अ.क्र. | अपंगत्वाचे प्रकार | तपशील |
|---|---|---|
| १. | **PWD - 1** | अंध/अल्पदृष्टी असलेले उमेदवार |
| २. | **PWD - 2** | बोलणे आणि श्रवणदोष असलेले उमेदवार (मूक बधीर) |
| ३. | **PWD - 3** | ऑर्थोपेडिक विकार,अपंगत्व, वाचन करण्यात किंवा वाचायला शिकण्यात अडचण येणे, Dyslexia, Dyscalculia, Dysgraphica, Spactic असणारे उमेदवार |

५.३.३ शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेतील व्यवसायांचे प्रशिक्षण हे प्रात्यक्षिकाभिमुख असल्यामुळे अपंग वर्गातील उमेदवारांकरिता व्यवसायानुरुप पात्रता **प्रपत्र - १** मध्ये दिलेली आहे.

५.३.४ अपंग उमेदवारांना त्यांच्या शारिरीक अंपगत्वाच्या प्रकारानुसार पात्र असलेल्या व तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादी प्रमाणे ३% जागा आरक्षित ठेवण्यात येतील. मूळ जिल्ह्यासाठी असणाऱ्या जागांसाठीच या जागांचे वाटप

होईल. प्रत्येक अपंग वर्गवारीला १% देणे आवश्यक आहे (सर्वसामान्य अपंगांसाठी राखीव असणाऱ्या जागांसाठी एकच गुणवत्ता यादी नुसार प्रवेश समर्थनीय नाही)

५.३.५ अपंग उमेदवाराला शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेतर्गंत व्यवसायाला प्रवेश मिळाल्यानंतर प्रशिक्षण कार्यक्रमात कोणतीही सूट/ अधिक सुविधा दिल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

५.३.६ अपंग उमेदवाराला शैक्षणिक पात्रतेत सूट मिळणार नाही.

५.३.७ अपंगाच्या आरक्षणाच्या दाव्यासाठी सादर केलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्रात अपंगत्व कायम स्वरुपी असून त्याचे प्रमाण ४०% पेक्षा जास्त आहे असा स्पष्ट उल्लेख असला पाहिजे.

५.३.८ अपंगाच्या आरक्षणाकरिता फक्त वैद्यकीय मंडळाकडून दिलेले प्रमाणपत्र विचारात घेतले जाईल.

**५.४ स्त्री उमेदवाराकरिता आरक्षण:**

५.४.१ प्रत्येक औ.प्र.संस्थामध्ये नियम १.४ मध्ये विहीत केलेल्या केंद्रीय प्रवेश पध्दती अंतर्गत उपलब्ध जागांपैकी ३०% जागा महिला उमेदवारांसाठी आरक्षित असतील.

५.४.२ हे आरक्षण सर्वसामान्य, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती / भटक्या जमाती-अ, भटक्या जाती-ब, भटक्या जाती-क, भटक्या जाती-ड आणि इतर मागासवर्गासाठी लागू राहील.

५.४.३ केंद्रीय प्रवेश पध्दती अंतर्गत येणाऱ्या मूळ तालुक्यात ७०% जागा आणि तालुकाबाह्य ३०% जागा या दोन्ही जागांमध्ये महिला उमेदवारांसाठी जागा आरक्षण उपलब्ध आहेत.

५.४.४ संरक्षण, अपंग आणि विशेष मागासवर्ग या श्रेणी मध्ये महिला उमेदवारांना आरक्षण लागू राहणार नाही.

५.४.५ खाजगी औ.प्र.संस्थामध्ये अल्पसंख्यांक उमेदवारांसाठी आरक्षित जागामध्ये महिला उमेदवारांना आरक्षण नसेल.

**५.५ क्विन्स मेरी खाजगी औ.प्र.संस्था, पुणे येथे संरक्षण सेवा श्रेणीकरिता आरक्षण:**

५.५.१ क्विन्स मेरी खाजगी औ.प्र.संस्था, पुणेसाठी एकूण प्रवेशक्षमतेपैकी १०० टक्के जागा संरक्षण सेवा श्रेणीतील उमेदवारांसाठी आरक्षित राहतील.

५.५.२ क्विन्स मेरी खाजगी औ.प्र.संस्था, पुणेसाठी एकुण प्रवेशक्षमतेतील संरक्षण सेवा श्रेणीतील उमेदवारांसाठी १०० टक्के जागा संस्था पातळीवर भरल्या जातील.

**५.६ मागासवर्गीय उमेदवारांकरिता आरक्षण:**

५.६.१ महाराष्ट्र राज्यातील विविध मागासवर्गीय उमेदवारांसाठी नियम १.४ मध्ये विहीत केल्याप्रमाणे केंद्रीय प्रवेश पध्दती अंतर्गत, उपलब्ध जागांचा तपशील खाली नमूद केलेल्या तक्त्यात दिला आहे. मागासवर्गीय उमेदवार ज्या प्रकारात मोडतात त्याबाबतचा दावा त्यांनी अर्ज करतेवेळी करावा.

**अर्ज करते वेळेस उमेदवाराने मागासवर्गीय असल्याचा दावा केला नाही आणि त्यानंतर प्रवेशाच्या वेळेस आवश्यक ती कागदपत्रे सादर करुन आरक्षणावर हक्क सांगितल्यास असा दावा विचारात घेतला जाणार नाही.**

| अ.क्र. | आरक्षणाची वर्गवारी | आरक्षणाची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (SC) | १३.०० |
| २ | अनुसूचित जमाती (ST) | ७.०० |
| ३ | विमुक्त जाती / भटक्या जमाती-अ (VJ/DT) | ३.०० |
| ४ | भटक्या जमाती - ब (NT-B) | २.५० |
| ५ | भटक्या जमाती -क (NT-C) | ३.५० |
| ६ | भटक्या जमाती -ड (NT-D) | २.०० |
| ७ | इतर मागासवर्ग (OBC) | १९.०० |
| | एकूण आरक्षण * | **५०.००** |
| | सामान्य | **५०.०** |
| | एकूण | **१००.००** |

* वरील आरक्षणामध्ये प्रवेश प्रक्रीयेच्या वेळेस प्रचलित शासन निर्यणानुसार बदल संभवतो

५.६.२ खाजगी अल्पसंख्यांक औ.प्र.संस्थामध्ये मागासवर्ग उमेदवारांकरिता आरक्षण उपलब्ध राहणार नाही.

५.६.३ सक्षम प्राधिकाऱ्याच्या कक्षेत येणाऱ्या व महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांना उपलब्ध असलेल्या जागांपैकी वाटपाच्या दुसऱ्या फेरीच्या अंतिम टप्प्यात जागा रिक्त असल्यास २ टक्के पर्यंतचे आरक्षण विशेष मागासप्रवर्गातील (विमाप्र) उमेदवारांना देण्यात येईल. या जागा वाटप प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीमध्ये घेण्यात आल्या असून त्यासाठी वाटप प्रक्रिया सुरु होण्याच्या आधीपासून वेगळया जागा राखून ठेवण्यात आलेल्या नाहीत. सर्वसाधारण प्रवेश प्रक्रियेमध्ये विशेष मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांकरिता एकूण उपलब्ध असलेल्या जागांपैकी २ टक्के पेक्षा अधिक राखीव जागा असणार नाहीत आणि एकूण आरक्षण ५० टक्क्याहून अधिक असणार नाही याची खबरदारी घेण्यात येईल.

५.६.४ गुणवत्तेच्या आधारे एखाद्या मागास प्रवर्गातील उमेदवाराची खुल्या प्रवर्गातील जागेसाठी निवड झाल्यास सदर उमेदवारास प्रवेश निश्चिती साठी मागास प्रवर्गातील उमेदवारासाठी लागू असलेले दस्तऐवज / प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक राहणार नाही. मात्र उमेदवारांनी मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी लागू असलेले दस्तऐवज / प्रमाणपत्र सादर केल्यास संबंधित उमेदवार मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी लागू असलेले सर्व प्रकारचे शासकीय सवलती / भत्ते मिळण्यासाठी पात्र ठरतील.

५.६.५ महाराष्ट्र राज्याबाहेरील व अनिवासी भारतीय उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील उमेदवार समजण्यात येईल आणि आरक्षणाचा दावा करण्यास ते पात्र असणार नाहीत.

**५.७ धार्मिक अल्पसंख्यांकाकरिता आरक्षित जागा:**

**५.७.१ शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये धार्मिक अल्पसंख्यांक उमेदवारांकरिता आरक्षित तुकडया:**

५.७.१.१ शासकीय औ.प्र.संस्थेमधील निवडक तुकडयांमध्ये ७० टक्के जागा मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन धर्मातील विद्यार्थ्यांकरिता आणि ३० टक्के जागा खुल्या व मागासवर्ग श्रेणीमधील उमेदवारांकरिता राखून ठेवलेल्या आहेत.

५.७.१.२ प्रत्येक अभ्यासक्रमाकरिता वर नमूद केलेल्या धार्मिक अल्पसंख्यांक उमेदवाराकरिता ७० टक्के जागा राखून ठेवण्यात येतील (त्यापैकी प्रत्येक अल्पसंख्यांक गटामध्ये ३० टक्के जागा महिलांकरिता राखून ठेवण्यात येतील) व ३० टक्के जागा सर्व अन्य खुल्या आणि मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता उपलब्ध असतील आणि वरील नियम क्र. ५.६.१ यामध्ये नमूद केलेल्या सर्वसामान्य आरक्षणाच्या आकृतिबंधाप्रमाणे भरण्यात येतील.

| अ. क्र. | धार्मिक अल्पसंख्यांक गट | धार्मिक अल्पसंख्याकाकरिता राखीव असलेल्या ७० टक्के जागांमधील वितरीत करावयाची टक्केवारी |
|---|---|---|
| १. | मुस्लिम | ५४.०० |
| २. | बौध्द | ३१.०० |
| ३. | ख्रिश्चन | ०६.०० |
| ४. | शीख | ०१.०० |
| ५. | जैन | ०७.०० |
| ६ | पारशी | ०१.०० |
| | एकूण | १००.०० |

५.७.१.३ विहीत आरक्षणाच्या पुरेशा प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध नसल्यास अशा जागा संबंधित धार्मिक अल्पसंख्यांक गटातील पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

५.७.१.४ विशिष्ट अल्पसंख्यांक धार्मिक गटामध्ये पुरेसे उमेदवार उपलब्ध नसल्यास आणि उपलब्ध जागा भरल्या न गेल्यास अशा रिक्त जागा अन्य धार्मिक अल्पसंख्यांक गटामधून गुणवत्तेच्या आधारे भरण्यात येतील.

५.७.१.५ अल्पसंख्यांक उमेदवारांना बिगर अल्पसंख्यांक औ.प्र.संस्था/व्यवसाय / तुकडी यामध्ये आरक्षण उपलब्ध असणार नाही. बिगर अल्पसंख्यांक औ.प्र. संस्था/ व्यवसायांच्या तुकडीसाठी अल्पसंख्यांक उमेदवारांना त्यांच्या प्रवर्गानुसार वा खुल्या प्रवर्गातील उमेदवार समजण्यात येईल.

५.७.१.६ शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये उमेदवाराच्या धर्माची स्पष्ट नोंद असणे आवश्यक आहे. शाळा सोडण्याच्या दाखल्यात उमेदवाराच्या धर्माची स्पष्ट नोंद नसल्यास अशा उमेदवाराला त्याच्या धर्माच्या पुष्ठ्यर्थ इतर संबंधित दस्तऐवजाचे पुरावे सादर करावे लागतील.

५.७.१.७ अल्पसंख्यांक उमेदवारांसाठी राखीव जागांवर प्रवेशासाठी फक्त महाराष्ट्र राज्याचे अधिवास असलेले अल्पसंख्यांक उमेदवार पात्र असतील. अशा उमेदवारांनी महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र अथवा

उमेदवाराची आई अथवा वडील महाराष्ट्र राज्याचे अधिवास असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधन कारक आहे.

५.७.१.८ वरील नियमांमध्ये अल्पसंख्यांक विकास विभाग वा शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांप्रमाणे आवश्यक ते बदल करण्यात येतील.

५.७.२ **अल्पसंख्यांकांकरिता संस्था म्हणून नोंदविण्यात आलेल्या खाजगी औ.प्र. संस्था:**

५.७.२.१ संबंधित अल्पसंख्यांक प्रवर्गातील उमेदवाराकरिता अशा खाजगी औ.प्र.संस्थेमध्ये किमान ५१ टक्के जागा राखीव असतील.

५.७.२.२ अशा खाजगी औ.प्र.संस्थांनी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेकरिता उपलब्ध असलेल्या जागांपैकी अल्पसंख्यांक प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल राखीव आरक्षणाची टक्केवारी १५ एप्रिल पूर्वी सक्षम अधिकाऱ्यांना कळविणे आवश्यक आहे.

५.७.२.३ अशा खाजगी औ.प्र.संस्था, संस्था पातळीवर एकूण उपलब्ध जागांच्या जास्तीत जास्त २० टक्के जागांवर प्रवेश देवू शकतात.

५.७.२.४ अल्पसंख्यांक उमेदवारांना बिगर अल्पसंख्यांक औ.प्र.संस्था/व्यवसाय /तुकडी यामध्ये आरक्षण उपलब्ध असणार नाही. बिगर अल्पसंख्यांक औ.प्र. संस्था/ व्यवसाय तुकडीसाठी अल्पसंख्यांक उमेदवारांना त्यांच्या प्रवर्गानुसार वा खुल्या प्रवर्गातील उमेदवार समजण्यात येईल.

५.७.२.५ शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये उमेदवाराच्या धर्माची स्पष्ट नोंद असणे आवश्यक आहे. शाळा सोडण्याच्या दाखल्यात उमेदवाराच्या धर्माची स्पष्ट नोंद नसल्यास अशा उमेदवाराला त्याच्या धर्माच्या पुष्ठ्यर्थ इतर संबंधित दस्तऐवजाचे पुरावे सादर करावे लागतील.

५.७.२.६ वरील नियमांमध्ये अल्पसंख्यांक विकास विभाग वा शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांप्रमाणे आवश्यक ते बदल करण्यात येतील.

## ५.८ अनुसूचित जाती कार्यक्रम (SCP), आदिवासी उपयोजना (TSP) व आदिवासी सार्वत्रिकरण योजनेतर्गत शासकीय औ.प्र.संस्थामध्ये असलेला आरक्षणाचा आकृतीबंध

| अ. क्र. | प्रवर्ग | तुकडीनिहाय आरक्षणाचा आकृतीबंध | | |
|---|---|---|---|---|
| | | **शासकीय औ.प्र.संस्था - अनुसूचित जाती कार्यक्रम** | **शासकीय औ.प्र.संस्था - आदिवासी उपयोजना** | **शास. औ.प्र.संस्था - सार्वत्रिकरण** |
| **ज्याप्रवर्गासाठी योजना अस्तित्वात आहे त्या प्रवर्गाकरिता एकूण जागांच्या आरक्षित जागा** | | | | |
| १. | अनुसूचित जाती | ८०.०० | ०.०० | ०.०० |
| २. | अनुसूचित जमाती | ०.०० | ७५.०० | १००.०० |
| ३. | सर्वसाधारण | २०.०० | २५.०० | ०.०० |
| **४.** | **एकूण** | **१००.००** | **१००.००** | **१००.००** |
| **ज्याप्रवर्गासाठी योजना अस्तित्वात आहे त्या प्रवर्गाकरिता एकूण जागांच्या आरक्षित जागांव्यतिरिक्त सर्वसाधारण आरक्षण आकृतिबंधाप्रमाणे भरावयाच्या जागांच्या तपशिल** | | | | |
| १. | अनुसूचित जाती (SC) | ०.०० | १३.०० | ०.०० |
| २. | अनुसूचित जमाती (ST) | ७.०० | ०.०० | ०.०० |
| ३. | विमुक्त जाती / भटक्या जमाती-अ (VJ/DT/ NT - A) | ३.०० | ३.०० | ०.०० |
| ४. | भटक्या जमाती - ब (NT - B) | २.५० | २.५० | ०.०० |
| ५ | भटक्या जमाती - क (NT - C) | ३.५० | ३.५० | ०.०० |
| ६ | भटक्या जमाती - ड (NT - D) | २.०० | २.०० | ०.०० |
| ७ | इतर मागासवर्ग (OBC) | १९.०० | १९.०० | ०.०० |
| ८ | सामान्य/ खुला (General/ Open) | ६३.०० | ५७.०० | ०.०० |
| **९** | **एकूण (Total)** | **१००.००** | **१००.००** | **०.००** |

६.० **विविध प्रकारच्या उमेदवारांकरिता आवश्यक असणारे कागदपत्र:**

६.१ अर्ज स्वीकृती केंद्रामध्ये ऑनलाईन भरण्यात येणाऱ्या अर्जाच्या वेळेस आणि अर्ज निश्चितीच्या वेळेस वेगवेगळया उमेदवाराने जसे अ,ब,क,ड व इ ही सादर कराव्या लागणाऱ्या मूळ कागदपत्रांची यादी **प्रपत्र - ३** मध्ये दिलेली आहेत.

६.२ अर्ज स्वीकृती केंद्रावर अर्ज निश्चितीसाठी व अर्जातील दाव्याच्या पृष्टयार्थ उमेदवारांना आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती दाखविणे आवश्यक आहे. उमेदवाराने अर्ज स्वीकृती केंद्रावर मूळ प्रतीच्या छायाप्रतींचा (झेरॉक्स) एक संच, ऑनलाईन भरलेल्या प्रवेशअर्जाची प्रिंट आऊट व आवश्यक ते अर्ज शुल्क जमा करावे.

६.३ उमेदवाराने प्रवेश निश्चितीच्या वेळी निवड झालेल्या औ.प्र.संस्थेमध्ये सर्व मूळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

६.४ उमेदवारास शाळा सोडल्याचा मूळ दाखला (अंतिम प्रवेशित शाळा/महाविद्यालय), पात्र परिक्षेची गुणपत्रिका, सर्व आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रतींचा (झेरॉक्स) एक सत्यप्रतीत केलेला संच आणि पासपोर्ट आकाराचे २ रंगीत छायाचित्रे प्रवेश निश्चितीच्या वेळेस निवड झालेल्या औ.प्र.संस्थेमध्ये सादर करावी लागतील.

७.० **भाषांतर:**

एखाद्या उमेदवाराने मराठी, हिंदी अथवा इंग्रजी भाषेत नसलेले कोणतेही प्रमाणपत्र सादर केल्यास त्याची अधिकृत मराठी, हिंदी अथवा इंग्रजी भाषेत भाषांतर केलेली आणि राजपत्रित अधिकाऱ्याने साक्षांकीत केलेली प्रत अर्ज स्वीकृती केंद्रावर अर्ज निश्चितीसाठी तसेच निवड झालेल्या औ.प्र.संस्थेत प्रवेशनिश्चितीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

८.० **गुणवत्तेसाठी गुणाधिक्य:**

अंतिम गुणवत्ता ठरविण्याकरिता उमेदवारांना खालील प्रकारे काही व्यवसायांना अतिरिक्त गुणांचा लाभ देण्यात येईल. तथापि सदर अतिरिक्त गुणांची मर्यादा ५० गुण एवढी असेल

| अ.क्र. | पात्रतेचे वर्णन | गुण |
|---|---|---|
| ८.१ | इंटरमिडीएट चित्रकला परिक्षा उत्तीर्ण उमेदवार | १० |
| ८.२ | एन.सी.सी./एम.सी.सी./स्काऊट गाईड/सिव्हील डिफेन्स सर्व्हीस यामध्ये सहभाग घेतलेले उमेदवार | १० |
| ८.३ | विविध स्तरावर क्रिडा प्रकारांमध्ये सहभाग घेतलेला उमेदवार | |
| | ८.३.१ जिल्हा स्तरीय स्पर्धा | १० |
| | ८.३.२ राज्य स्तरीय स्पर्धा | १५ |
| | ८.३.३ राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा | २५ |
| ८.४ | शासन मान्यताप्राप्त महाराष्ट्रातील बोल्स्टर स्कूलमधून उत्तीर्ण झालेले उमेदवार | २० |
| ८.५ | शासनमान्य अशासकीय संस्थांच्या महाराष्ट्रातील अनाथ आश्रमात वास्तव्यास असलेले उमेदवार | २० |
| ८.६ | २०११ च्या जनगणनेमध्ये ग्रामीण भाग म्हणून नमूद करण्यात आलेल्या भागातून उमेदवाराने माध्यमिक शालांन्त परीक्षा (SSC) दिलेली असल्यास | १० |

वर उल्लेखिल्या प्रमाणे गुणाधिक्यासाठी पुराव्यादाखल सादर करावयाची कागदपत्रे **प्रपत्र - ३** मध्ये दिल्यानुसार आहेत.

९.० **गुणानुक्रमांक देणे:**

९.१ **गुणानुक्रम:**

नियम क्र. २.० नुसार महाराष्ट्र राज्यातील ज्या पात्र उमेदवारांची शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेतर्गंत येणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केंद्रीय प्रवेश पध्दती मधून नेमून दिलेल्या शेवटच्या तारखेपर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करुन निश्चित केलेला आहे अशा प्रत्येक उमेदवाराला खाली नमूद केलेल्या निकषानुसार तात्पुरता गुणानुक्रम (Provisional Merit Number) देण्यात येईल.

९.१.१ माध्यमिक शालांत परिक्षा (इयत्ता १०वी) अथवा समतुल्य पात्रता परिक्षा यामध्ये प्राप्त एकत्रित गुण हे गुणवत्ता ठरविण्यासाठी पायाभूत गुण मानण्यात येतील.

९.१.२ नियम क्र.८ मध्ये नमूद केल्यानुसार कोणत्याही प्रकरणी, अतिरिक्त मिळालेले गुणाधिक्य एकूण गुणांमध्ये मिळविण्यात येतील.

९.१.३ अशा प्रकारे तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांची गुणवत्ता यादी पुढील बाबी दर्शविल.

९.१.३.१ राज्यस्तरीय सर्वसाधारण गुणवत्ताक्रमांक

९.१.३.२ राज्यस्तरीय प्रवर्गांतर्गत गुणवत्ता क्रमांक ( लागू असल्याप्रमाणे )

९.१.३.३ मूळ तालुका सर्वसाधारण गुणानुक्रमांक

९.१.३.४ मूळ तालुका प्रवर्गांतर्गत गुणानुक्रमांक (लागू असेल त्याप्रमाणे )

९.१.४ राज्याबाहेरील व अनिवासी भारतीय उमेदवारांची अशाप्रकारे तयार केलेली गुणवत्ता यादी राज्यस्तरीय सर्वसाधारण गुणवत्ताक्रमांक दर्शविल.

९.१.५ गुणवत्ता क्रम देण्यात आल्यामुळे कोणत्याही जागेवरील प्रवेशाची हमी दिली असे होत नाही.

९.२ **सम गुणवत्ता झाल्यास सापेक्ष गुणवत्ता:**

उमेदवारांची गुणवत्ता एकसारखी आल्यास, म्हणजेच उमेदवारांचे माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परिक्षेतील (SSC) एकत्रित गुण अधिक अतिरिक्त बाहय गुणाधिक्य मिळून होणारे एकूण गुण हे समान असल्यास उमेदवारांतील परस्पर गुणवत्तेचे पुढे नमूद केल्याप्रमाणे पुनर्मुल्यमापन करण्यात येईल.

९.२.१ ज्या उमेदवाराने माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (SSC) परिक्षेत सर्वाधिक गुण मिळविले असतील त्याला प्रथम प्राधान्य राहील.

९.२.२ ज्या उमेदवारांने माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (SSC) परिक्षेत व्यावसायिक / तांत्रिक विषयात अधिक गुण मिळविले असतील, त्यास द्वितीय प्राधान्य राहील.

९.२.३ ज्या उमेदवाराने माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (SSC) परिक्षेत गणित विषयात अधिक गुण मिळविले असतील, त्यास तृतीय प्राधान्य राहील.

९.२.४ ज्या उमेदवारास माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (SSC) परिक्षेत विज्ञान विषयात अधिक गुण मिळविले असतीलत्यास चतुर्थ प्राधान्य देण्यात येईल.

९.२.५ उमेदवाराच्या जन्म तारखेला पाचवे प्राधान्य दिले जाईल (वय जास्त असलेल्या उमेदवाराला प्राधान्य)

९.३ **पूर्व तपासणी / पूर्व मुल्यांकनामुळे गुणातील बदल:**

९.३.१ पूर्वतपासणी / पूर्व मुल्यांकनामुळे पात्र परिक्षेच्या गुणांमध्ये बदल झाल्यास आणि असा बदल महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने अथवा समतुल्य संस्थेने यथोचितरित्या प्रमाणित केल्यास ही बाब तात्काळ अर्ज स्वीकृती केंद्र अधिकाऱ्यांना कळविण्यात यावी.

९.३.२ तथापि अशा बदलाची बाब ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या आणि निश्चित करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी कळविण्यात आली असेल तरच विचारात घेण्यात येईल.

१०.० **केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्यांमधील प्रवेशाबाबत नियम:**

| प्रवेश फेरी | शेरा |
|---|---|
| **प्रथम प्रवेश फेरी** | उमेदवाराने सादर केलेल्या पसंतीक्रमाच्या प्रथम विकल्पानुसार जागा मिळाल्यास उमेदवाराला प्रवेश निश्चित करावा लागेल. अशा उमेदवाराने प्रवेश निश्चित केला अथवा केला नाही तरीही त्यास केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या पुढील प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही.<br>ज्या उमेदवारांना विकल्प क्र.२ ते १०० मधुन जागा वाटप झाली आहे त्यांची इच्छा असेल तर ते प्रवेश निश्चित करु शकतात परंतु असे प्रवेश निश्चित केलेले उमेदवार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पुढील फेऱ्यांमध्ये म्हणजे फेरी २ ते ५ मध्ये सहभागी होवू शकणार नाहीत. |
| **द्वितीय प्रवेश फेरी** | उमेदवाराने सादर केलेल्या पसंतीक्रमाच्या पहिल्या तीन विकल्पांपैकी पैकी कोणत्याही एका विकल्पानुसार जागा मिळाल्यास प्रवेश निश्चित करावा लागेल. अशा उमेदवाराने प्रवेश निश्चित केला अथवा केला नाही तरीही त्यास केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या पुढील प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही.<br>ज्या उमेदवारांना विकल्प क्र.४ ते १०० मधुन जागा वाटप झाली आहे त्यांची इच्छा असेल तर ते प्रवेश निश्चित करु शकतात परंतु असे प्रवेश निश्चित केलेले उमेदवार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पुढील फेऱ्यांमध्ये म्हणजे फेरी ३ ते ५ मध्ये सहभागी होवू शकणार नाहीत. |
| **तृतीय प्रवेश फेरी** | उमेदवाराने सादर केलेल्या पसंती क्रमाच्या पहिल्या पाच विकल्पांपैकी एका विकल्पानुसार जागा मिळाल्यास प्रवेश निश्चित करावा लागेल. अशा उमेदवाराने प्रवेश निश्चित केला अथवा केला नाही तरीही त्यास केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पुढील प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही.<br>ज्या उमेदवारांना विकल्प क्र.६ ते १०० मधून जागा वाटप झाली आहे त्यांची इच्छा असेल तर ते प्रवेश निश्चित करु शकतात. परंतु असे प्रवेश निश्चित केलेले उमेदवार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पुढील फेऱ्यांमध्ये म्हणजे फेरी ४ ते ५ मध्ये सहभागी होवू शकणार नाहीत. |

| प्रवेश फेरी | शेरा |
|---|---|
| **चतुर्थ प्रवेश फेरी** | उमेदवाराने सादर केलेल्या पसंतीक्रमाच्या कुठल्याही एका विकल्पांपैकी जागा मिळाल्यास प्रवेश निश्चित करावा लागेल अशा उमेदवाराने प्रवेश निश्चित केला अथवा केला नाही तरीही त्याला केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या पुढील प्रवेश फेरीमध्ये म्हणजेच पाचव्या फेरीमध्ये सहभाग घेता येणार नाही. |
| **पाचवी प्रवेश फेरी** | या फेरीमध्ये उपलब्ध सर्व जागा हया सर्वसाधारण जागा म्हणून समजल्या जातील. पाचव्या केंद्रीय प्रवेश प्रक्रिया फेरीमध्ये (समुपदेशन प्रवेश फेरी) सहभागी होण्यास महाराष्ट्र राज्यातील नोंदणीकृत उमेदवारांमधून ज्या उमेदवारांना प्रवेशफेरी १ ते ४ यामध्ये जागा देण्यात आलेली नाही/अनिवार्य विकल्पाशिवाय इतर विकल्पांपैकी जागा मिळाली परंतु प्रवेश निश्चित केले नाही असे उमेदवार पात्र असतील. परंतु प्रवेश फेरी १ ते ४ यामध्ये प्रवेश निश्चित केले असतील/अनिवार्य विकल्पापैकी जागा मिळाली परंतु प्रवेश निश्चित केले नाहीत असे उमेदवार पात्र नाहीत. |

११.० **जागा वाटपाची तर्क पध्दती:**

सक्षम अधिकाऱ्याच्या अधिकारातंर्गत येणाऱ्या मूळ तालुक्यातील जागा आणि अन्य तालुक्यातील उमेदवारांसाठी राज्यस्तरीय जागा वाटप करण्याची तर्कपध्दती.

११.१ **टप्पा प्रथम - सर्व उमेदवारांकरिता:**

११.१.१ सर्व प्रवर्गांमधील म्हणजेच तांत्रिक/अतांत्रिक/खुला/ राखीव/पुरुष/महिला उमेदवारांना गुणवत्तेनुसार जागा वाटप करण्यात येईल.

११.१.२ मागासवर्गीय उमेदवारांना त्यांच्या गुणवत्तेच्या आधारे प्रथम खुल्या प्रवर्गामध्ये व खुल्या प्रवर्गातील जागा गुणवत्तेच्या आधारे उपलब्ध नसल्यास राखीव प्रवर्गामध्ये जागा वाटप करण्यात येईल.

११.१.३ विशेष मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांचा त्यांच्या गुणवत्तेच्या आधारे प्रथम खुल्या प्रवर्गातील जागा वाटपासाठी विचार करण्यात येईल. गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गात जागा उपलब्ध नसल्यास ज्या विशेष मागासवर्गीय उमेदवारांचा (SBC) मूळ प्रवर्ग इतर मागासवर्ग असा आहे त्यांना त्यांच्या मूळ प्रवर्गातील राखीव जागांवर गुणत्तेनुसार जागा वाटपाचा विचार करण्यात येईल.

११.१.४ अपंग प्रवर्गातील उमेदवारांना त्यांच्या गुणत्तेच्या आधारे त्यांना प्रथम राखीव असलेल्या जागांसाठी गुणवत्तेनुसार विचारात घेण्यात येईल तदनंतर अपंग उमेदवारांसाठी राखीव जागा उपलब्ध नसल्यास, त्यांना गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातील जागांसाठी विचारात घेण्यात येईल.

११.१.५ संरक्षण प्रवर्गातील उमेदवारांना जागा वाटपासाठी त्यांना प्रथम राखीव असलेल्या जागांसाठी गुणवत्तेनुसार विचारात घेण्यात येईल तदनंतर संरक्षण प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखीव जागा उपलब्ध नसल्यास त्यांना गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गात विचारात घेण्यात येईल.

११.१.६ महिला उमेदवारांकरिता जागेची उपलब्धता पुढे नमूद केलेल्या पध्दतीनुसार तपासण्यात येईल:

११.१.६.१ खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता राखीव जागा

११.१.६.२ खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारण जागा

११.१.६.३ लागू असलेल्या संबंधित जाती प्रवर्गातील महिलांकरिता राखीव जागा

११.१.६.४ लागू असलेल्या संबंधित जाती प्रवर्गातील सर्वसामान्य जागा

११.१.७ तांत्रिक वा व्यावसायिक विषय घेऊन माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा (SSC) उत्तीर्ण झालेले उमेदवार (तांत्रिक उमेदवार) करिता जागांची उपलब्धता खाली नमूद केल्याप्रमाणे तपासली जाईल.

११.१.७.१ तांत्रिक विषय घेतलेल्या खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता

११.१.७.२ तांत्रिक विषय घेतलेल्या संबंधित आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांकरिता

११.१.७.३ खुल्या प्रवर्गातील सामान्य उमेदवारांकरिता (तांत्रिक आणि अतांत्रिक उमेदवार) उपलब्ध जागा

११.१.७.४ संबंधित आरक्षित प्रवर्गासाठीसामान्य उमेदवारांकरिता (तांत्रिक आणि अतांत्रिक उमेदवार) उपलब्ध जागा.

११.२ **टप्पा दुसरा - संबंधित खुल्या / मागासवर्गातील उमेदवार:**

११.२.१ या टप्प्यात सर्व खुल्या आणि मागासवर्गातील उमेदवारांचा जागा वाटपाकरिता विचार केला जाईल.

११.२.२ निर्धारीत केलेल्या टक्केवारीप्रमाणे, जर खुल्या / मागास प्रवर्गांमधुन तांत्रिक विषय घेतलेल्या महिला उमेदवार आवश्यक त्या प्रमाणात मिळाले नाहीत तर अशा प्रकारे रिक्त असलेल्या जागा संबंधित खुल्या /आरक्षित प्रवर्गातील तांत्रिक विषय घेतलेल्या सर्व पुरुष वा महिला उमेदवारांमधून भरल्या जातील.

११.२.३ निर्धारीत केलेल्या टक्केवारीप्रमाणे जर महिला खुल्या/मागास प्रवर्गातून मिळाल्या नाहीत तर उर्वरित रिक्त जागा संबंधित खुल्या/आरक्षित प्रवर्गातील पुरुष वा महिला उमेदवारांमधून भरल्या जातील.

११.२.४ तांत्रिक विषय घेतलेल्या उमेदवारांसाठी आरक्षित जागांतून निर्धारीत केलेल्या टक्केवारीप्रमाणे जर खुल्या आणि मागास प्रवर्गातून आवश्यक उमेदवार मिळाले नाहीत तर, अशा रिक्त जागा संबंधित खुल्या/ आरक्षित प्रवर्गामधून तांत्रिक विषय घेतलेले/ तांत्रिक विषय न घेतलेल्या उमेदवारांमधून भरल्या जातील.

**११.३ टप्पा तिसरा - विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता :**

टप्पा २ पूर्ण झाल्यानंतर जर वर नमूद करण्यात आलेल्या मागास प्रवर्गांमधील एखादया प्रवर्गांमधील आरक्षणाच्या आवश्यक त्या टक्केवारीच्या प्रमाणात जर उमेदवार मिळत नसेल तर अशा रिक्त राहणाऱ्या जागा विशेष मागास प्रवर्गातील (SBC) उमेदवारांमधून (स्त्री व पुरुष एकत्रितरीत्या) केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेनुसार सक्षम अधिकाऱ्याच्या कार्यकक्षेत महाराष्ट्रामधील उमेदवारांमधून कमाल २% च्या मर्यादेपर्यंत त्यांच्या संबंधित गुणवत्तेनुसार भरण्यासाठी विचार केला जाईल. हा टप्पा फक्त मूळ तालुक्यातील जागांसाठी असेल.

**११.४ टप्पा चौथा - संबंधित मागास प्रवर्ग उमेदवार गटाकरिता:**

११.४.१ या टप्प्यात सर्व मागास प्रवर्ग उमेदवार गटांचा जागा वाटपाकरिता खाली नमूद केल्याप्रमाणे विचार केला जाईल.

११.४.१.१ **गट - १**

११.४.१.१.१ अनुसूचित जाती (SC)

११.४.१.१.२ अनुसूचित जमाती (ST)

११.४.१.२ **गट- २**

११.४.१.२.१ विमुक्त जाती आणि भटक्या जमाती (VJ/DT, NT-A)

११.४.१.२.२ भटक्या जमाती (NT -B)

११.४.१.३ **गट -३**

११.४.१.३.१ भटक्या जमाती २ (NT -C)

११.४.१.३.२ भटक्या जमाती ३ (NT-D)

११.४.१.३.३ इतर मागासवर्ग (OBC)

११.४.२ तिसरा टप्पा पूर्ण झाल्यानंतर ऊर्वरित रिक्त जागांकरिता वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित प्रवर्गांच्या गटातील उमेदवारांच्या गुणांकानुसार विचार केला जाईल.

**११.५ टप्पा पाचवा - सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता:**

चौथा टप्पा पूर्ण झाल्यानंतर मागासवर्गीय उमेदवारांसाठी आरक्षित असलेल्या रिक्त जागांकरिता गुणांकानुसार सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांचा एकत्रितरित्या जागा वाटपासाठी विचार केला जाईल.

**११.६ टप्पा सहावा - अपंग प्रवर्गातील उमेदवारांकरिता:**

पाचवा टप्पा पूर्ण झाल्यानंतर राहिलेल्या रिक्त जागांसाठी उमेदवाराच्या अपंगत्वाच्या गुणांकानुसार अपंग प्रवर्गातील (PWD-1, PWD-2 व PWD-3 एकत्रित) उमेदवारांचा जागा वाटपासाठी विचार केला जाईल.

**११.७ टप्पा सातवा - धार्मिक अल्पसंख्यांक उमेदवारांकरिता:**

६ वा टप्पा पूर्ण झाल्यानंतर रिक्त जागांसाठी इतर अल्पसंख्याक गटामधून त्यांच्या गुणांकानुसार उमेदवारांचा विचार केला जाईल. जर पुरेसे स्त्री उमेदवार उपलब्ध नसतील तर अशा जागा संबंधित धार्मिक अल्पसंख्यांक पुरुष उमेदवारांना दिल्या जातील.

**११.८ टप्पा आठवा - राज्यस्तरीय गुणांकानुसार सर्व आरक्षित उमेदवारांकरिता (मूळ जिल्हा आणि जिल्हाबाह्य जागा एकत्रित करुन):**

मूळ तालुका व तालुकाबाह्य संदर्भ न घेता (खुला/आरक्षित) पात्र उमेदवारांकरिता, फक्त त्यांच्या गुणांकानुसार रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश दिले जातील. सातवा टप्पा पूर्ण झाल्यानंतर रिक्त जागांवर टप्पा १,२,४ व ५ च्या तुकडीनुसार मूळ तालुका व तालुकाबाहय याचा संदर्भ न घेता फक्त गुणवत्तेनुसार जागा वाटपाचा विचार करण्यात येईल.

**११.९ टप्पा नववा - सर्व राज्यस्तरीय उमेदवारांकरिता फक्त गुणक्रमांकानुसार (कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाशिवाय):**

११.९.१ आठवा टप्पा पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी सर्व उमेदवारांचा म्हणजेच खुला/आरक्षित/पुरुष/स्त्री त्यांच्या गुणांकानुसार जागा वाटपाकरिता विचार करण्यात येईल.

११.९.२ वरील टप्प्याकरिता जागेचे बंधन लागू होणार नाही, म्हणजेच उर्वरित रिक्त जागा सामान्य जागा म्हणून समजण्यात येतील आणि उमेदवाराच्या प्रवर्गाचा कोणताही संदर्भ न घेता (खुला/आरक्षित) किंवा रिक्त जागा ज्या संवर्गाशी संबंधित आहे (जसे-मागासवर्गीय, अपंग) यांचा संदर्भ न घेता मूळ तालुका आणि तालुकाबाहय उमेदवारांकरिता असलेल्या रिक्त जागांचे फक्त गुणांकानुसार वाटप केले जाईल.

११.९.३ मूळ तालुका, तालुकाबाह्य, मागासवर्ग, अपंग इ. अथवा उमेदवाराच्या कोणत्याही प्रवर्गाचा व खुला /आरक्षित या बाबींचा संदर्भ न घेता पात्र उमेदवारांना त्यांच्या गुणानुक्रमाचा आधार घेवून सर्व पात्र उमेदवारांकरिता जागा वाटपाचा विचार केला जाईल.

११.९.४ वरील सर्व बाबींची पूर्तता केल्यानंतर जागा रिक्त राहिल्यास महाराष्ट्र राज्याबाहेरील पात्र उमेदवारांच्या गुणवत्तेनुसार त्यांचा जागा वाटपाकरिता विचार केला जाईल. महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवारांना जागा वाटप केल्यानंतरही, जागा रिक्त राहिल्यास, अनिवासी भारतीय रहिवासी उमेदवारांना त्यांच्या गुणवत्तेनुसार जागा वाटप केले जाईल.

**१२.० प्रवेश फेरीनुसार जागा वाटपाच्या टप्प्यांची अंमलबजावणी:**

केंद्रीय प्रवेश पध्दती अंतर्गत, तालुकाबाह्य उमेदवारांकरिता ३० टक्के जागा आणि मूळ तालुक्याकरिता ७० टक्के जागांचे वाटपासाठी खाली नमूद केलेल्या नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

१२.१ केंद्रीय प्रवेश पध्दतीतील पहिल्या फेरीकरिता, टप्पा १ ते ३ मधील नियमांप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल. काही कारणास्तव जागा भरल्या न गेल्यास अशा उपलब्ध रिक्त जागा केंद्रीय प्रवेश पध्दतीतील दुसऱ्या फेरीमध्ये वाटपास उपलब्ध राहतील.

१२.२ केंद्रीय प्रवेश पध्दतीतील दुसऱ्या फेरीकरिता टप्पा १ ते ७ मधील नियमांप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल. काही कारणास्तव जागा भरल्या न गेल्यास अशा उपलब्ध रिक्त जागा केंद्रीय प्रवेश पध्दतीतील तिसऱ्या फेरीमध्ये वाटपास उपलब्ध राहतील.

१२.३ केंद्रीय प्रवेश पध्दतीतील तिसऱ्या फेरीकरिता टप्पा १ ते ९ मधील नियमांप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल. काही कारणास्तव जागा भरल्या न गेल्यास अशा उपलब्ध रिक्त जागा केंद्रीय प्रवेश पध्दतीतील चौथ्या फेरीमध्ये वाटपास उपलब्ध राहतील.

१२.४ केंद्रीय प्रवेश पध्दतीतील चौथ्या फेरीकरिता, फक्त टप्पा ९ मधील नियमांप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल. टप्पा ९ ची अंमलबजावणी केल्यानंतरही जागा भरल्या न गेल्यास अशा उपलब्ध रिक्त जागा प्रथम महाराष्ट्र राज्याबाहेरील पात्र आणि तदनंतर अनिवासी भारतीय उमेदवारांना देवू केल्या जातील. यानंतरही भरल्या न गेल्यास अशा उपलब्ध रिक्त जागा, केंद्रीय प्रवेश पध्दतीतील पाचव्या फेरीकरिता वाटपास उपलब्ध असतील (समुपदेशन फेरी)

१२.५ केंद्रीय प्रवेश पध्दतीतील पाचव्या फेरीमधील म्हणजेच समुपदेशन फेरीमधील सर्व रिक्त जागा ह्या सामान्य जागा म्हणून समजण्यात येतील आणि राज्य स्तरावरील समुपदेशन केंद्रात म्हणजेच जिल्हास्तरीय शासकीय औ.प्र.संस्थेत उपस्थित असलेल्या उमेदवारांमधून त्यांच्या गुणानुक्रमांकानुसार जागा वाटप केले जाईल.

१२.६ खाजगी औ.प्र.संस्थामधील केंद्रीय प्रवेश पध्दतीतील पाचव्या फेरीनंतर उपलब्ध रिक्त जागा संस्था पातळीवर खाजगी औ.प्र. संस्थांमार्फत प्रवेशाच्या अंतिम दिनांकापूर्वी भरल्या जातील.

**१२.७ सर्वसामान्य सूचना:**

१२.७.१ केंद्रीय प्रवेश पध्दतीमधील प्रथम, द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ फेरीमध्ये, तालुका स्तरावरील गुणवत्ता यादीतील आणि महाराष्ट्र राज्यातील गुणवत्ता यादीतील गुणांकानुसार मूळ तालुक्यातील आणि तालुकाबाह्य जागांकरिता जागा वाटपाची कार्यवाही केली जाईल.

१२.७.२ केंद्रीय प्रवेश पध्दतीतील प्रथम, द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ फेऱ्यांसाठी त्याच वेळेस उपलब्ध असलेल्या आणि उमेदवाराने भरलेल्या विकल्पांच्या पसंतीक्रमांकानुसार व त्याच्या गुणवत्तेनुसार उमेदवाराला जागा वाटप केले जाईल.

१२.७.३ जर उमेदवार एखादया ठराविक टप्प्यामध्ये जागा मिळणेस पात्र असेल तर त्या उमेदवाराचा जरी पुर्वीच्या टप्प्यांमध्ये त्याला जागा दिली असेल, परंतु प्रवेश निश्चित केले नसेल अथवा त्याला जागा दिली नसेल तरीही त्याचा या टप्प्यांत जागा वाटपात विचार करण्यात येईल.

१२.७.४ सर्व टप्प्यामधील जागा वाटपाकरिता सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना (विशेष मागासप्रवर्ग त्यांच्या मूळ प्रवर्गासह) विचारात घेतले जातील (जरी त्यांना यापूर्वीच्या टप्प्यांमध्ये प्रवेशासाठी जागा दिली असेल (परंतु प्रवेश निश्चित केला नसेल) अथवा नसेल तरीही)

१२.७.५ अनुक्रमाने भरलेल्या पसंतीक्रमानुसार पर्यायामधून प्रथम उपलब्ध पर्यायास प्रवेश मिळाल्यास तीच अंतिम प्रवेशित जागा म्हणून धरण्यात येईल.

१२.७.६ जागा वाटप **http://admission.dvet.gov.in** या संकेतस्थळावर दर्शविले जाईल. जागा वाटप केलेल्या यादीमधून उमेदवाराला देऊ केलेल्या जागा फक्त तात्पुरत्या स्वरुपात असतील.

१२.७.७ संकेत स्थळावर जागा वाटपाचे पत्र (Allotment Letter) उपलब्ध असेल आणि संबंधित उमेदवाराने त्या पत्राची Print Out प्रवेशासाठी नेमून दिलेल्या संस्थेत प्रवेश निश्चिती वेळी जमा करावी. अर्ज स्वीकृती केंद्र संबंधित उमेदवाराला जागा वाटपाच्या प्रतींची प्रिंट आऊट घेण्यास मदत करेल.

१२.७.८ वर नमूद केलेल्या टप्प्याकरिता सारासार विचार करता, प्रत्यक्ष प्रवेश जागा वाटपाकरिता संगणक Software व्दारे अंमलबजावणी केली जाईल.

१२.७.९ ज्या उमेदवाराला प्रवेश देऊ केला आहे त्याने आपला प्रवेश देऊ केलेल्या संस्थेत स्वत: प्रवेश निश्चितीसाठी आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करुन व आवश्यक ते शुल्क भरुन यासाठी नेमून दिलेल्या तारखेपूर्वी निश्चित करावा. याकरिता उमेदवारास वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही.

१२.७.१० कागदपत्रांची छाननी व शुल्क अदा केल्यानंतर संबंधित संस्थेत प्रवेशाची निश्चिती ऑनलाईन करण्यात येईल.

## १३.० केंद्रीय प्रवेश पध्दतीचे टप्पे:

### १३.१ टप्पा क्र. I - माहिती पुस्तिका:

१३.१.१ माहिती पुस्तिका (मराठी भाषेमधील) - राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दि. १ जून पासून ते प्रवेशाच्या शेवटच्या तारखेपर्यंत उपलब्ध करुन देण्यात येईल. सर्व इच्छुक उमेदवार प्रवेश माहिती पुस्तिका जवळच्या अर्ज स्विकृती केंद्रामधून रु. ५०/- भरुन विकत घेऊ शकतात.

१३.१.२ प्रादेशिक कार्यालय निहाय शासकीय आणि खाजगी औ.प्र.संस्थांची यादी व प्रवेशासाठी उपलब्ध व्यवसाय निहाय जागांचा तपशिल http://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

१३.१.३ इंग्रजी भाषेतील माहिती पुस्तिका **http://admission.dvet.gov.in** या संकेत स्थळावर ब्राऊजिंग,डाऊन लोडिंग व प्रिंटींगकरिता दि. १० जून पासून ते प्रवेशाच्या शेवटच्या दिवसापर्यंत नि:शुल्क उपलब्ध करुन देण्यात येईल.

१३.१.४ माहिती पुस्तिकेमधील माहिती ही सूचकदर्शी आहे. उमेदवाराने अद्ययावत माहितीकरिता संकेत स्थळावर उपलब्ध माहितीशी सत्यता पडताळून पहावी.

१३.१.५ **मराठी व इंग्रजी माहितीपुस्तिकेतील कोणत्याही माहितीमध्ये तफावत असल्यास वरील संकेतस्थळार उपलब्ध माहिती पुस्तिकेतील माहिती अंतिम समजण्यांत यावी.**

### १३.२ टप्पा क्र. II - ऑन लाईन अर्ज भरणे व अर्ज स्विकृती केंद्रावर अर्ज निश्चित करणे:

१३.२.१ **सर्व इच्छुक उमेदवारांनी प्रवेशाच्या प्रथम फेरीकरिता http://admission.dvet.gov.in या संकेत स्थळावर विहीत वेळापत्रका नुसार नोंदणी करणे व प्रथम फेरीसाठी विकल्पांच्या पसंती क्रमासह ऑन लाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.**

१३.२.२ ऑन लाईन अर्ज कुठल्याही स्त्रोतामधून भरता येईल. अर्ज स्विकृती केंद्रे ही सुविधा उमेदवाराकडून प्रपत्र -४ मध्ये नमूद शुल्क आकारुन उपलब्ध करुन देतील.

१३.२.३ सर्व आवश्यक माहिती भरल्यानंतर उमेदवारांचे प्रवेश खाते (Admission Account) त्यांचा नोंदणीक्रमांक (Registration Number) हाच User ID म्हणून तयार होईल. उमेदवारास पुढील प्रवेश प्रक्रियेकरिता या खात्यामध्ये त्याचा नोंदणी क्रमांक व पासवर्ड चा उपयोग करुन प्रवेश ऑन लाईन (Login) करावा लागेल.

१३.२.४ राज्याबाहेरील व अनिवासी भारतीय उमेदवारांनासुध्दा विहीत कालावधीमध्येच नोंदणी करणे आवश्यक राहील. परंतु त्यांचा विचार प्रवेशाच्या ४ थ्या फेरीमध्येच होणार असल्यामुळे त्यांना विहीत वेळापत्रकानुसार ४ थ्या फेरीसाठी विकल्प सादर करावे लागतील.

१३.२.५ उमेदवारांनी अर्जाचे प्रिंटआऊट घेऊन सर्व माहिती बरोबर व पूर्ण भरली आहे याची पडताळणी करावी.

१३.२.६ नोंदणीकृत उमेदवाराने दस्तऐवजांच्या तपासणीकरिता, अर्जाचे शुल्क भरणेकरिता व अर्ज निश्चितीकरणासाठी कुठल्याही शासकीय अथवा खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस भेट द्यावी.

१३.२.७ संपूर्ण प्रवेश प्रक्रियेमध्ये सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था अर्ज स्विकृती केंद्र असतील.

१३.२.८ उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या पुष्ठ्यर्थ सर्व मूळ दस्तऐवज, लागू असलेले अर्जशुल्क, व अर्जाची प्रिंटआऊट संबंधित अर्ज स्विकृती केंद्रामध्ये जमा करावेत.

१३.२.९ उमेदवाराने प्रपत्र-३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व आवश्यक कागदपत्रांच्या, सत्यप्रतींचा एक संच तसेच प्रवेशअर्ज शुल्क रोखीने सादर करावे.

१३.२.१० अर्ज स्विकृती केंद्रामधील अधिकारी भरलेल्या ऑन लाईन अर्जाच्या प्रिंटआऊट वरुन व उमेदवारांने दिलेल्या मूळ दस्तवेजावरुन काळजीपूर्वक छाननी करुन तपासणी करेल. तपासणीनंतर अर्ज निश्चितीकरण करुन उमेदवारास पावतीवजा पोच (Receipt - cum - Acknowledgement) देईल.

१३.२.११ फक्त निश्चित केलेल्या अर्जांचाच सर्व प्रवेश फेऱ्यांकरिता प्रवेशासाठी विचार करण्यात येईल. निश्चित न केलेले अर्ज प्राप्तच झाले नाहीत असे मानण्यात येईल.

१३.२.१२ उमेदवाराने फक्त एकच ऑन लाइन अर्ज भरुन सादर करावा जो की केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेमार्फत शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेतर्गंत येणाऱ्या कुठल्याही व्यवसायाच्या शासकीय अथवा खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रवेशाकरिता उपलब्ध होणाऱ्या जागेकरिता भरता येईल.

१३.२.१३ उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज भरल्यास / निश्चित केल्यास त्यास नक्कल समजण्यात येईल आणि असे अर्ज उमेदवाराशी कुठल्याही प्रकारे संपर्क न साधता रद्द करण्यात येतील व अशा उमेदवारांना केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेमध्ये प्रवेशास प्रतिबंध करण्यात येईल.

१३.२.१४ ज्या उमेदवारांची खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये संस्था स्तरावरील जागांवर प्रवेश घेण्याची इच्छा आहे त्यांनाही वरील संकेत स्थळावर नोंदणी करावी लागेल व ज्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घ्यावयाचा आहे त्या संस्थेत उमेदवाराने व्यक्तीश: हजर राहून "**टप्पा क्र. VI - संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये व्यक्तीश: हजर राहून केंद्रीय प्रवेश प्रक्रीया फेरीमध्ये प्रवेशाचे निश्चितीकरण करण्यांचे नियम**" मध्ये विशद केल्यानुसार प्रवेश प्रक्रीया पूर्ण करावी.

<u>**केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पहिल्या दिवसापासून ते प्रवेशाच्या अंतिम दिनांकापर्यंत खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये संस्था स्तरावरील जागांवर उमेदवारांना प्रवेश घेता येतील.**</u>

१३.२.१५ **अर्जशुल्क**

१३.२.१५.१ प्रवेशअर्ज शुल्क अर्ज स्विकृती केंद्रात ऑन लाईन अर्ज निश्चित करताना रोखीमध्ये भरावे.

१३.२.१५.२ अर्जाचे शुल्क अर्ज स्विकृती केंद्रामध्ये भरल्याशिवाय अर्जाचे निश्चितीकरण करण्यात येणार नाही.

१३.२.१५.३ सर्व निश्चित न केलेले अर्ज प्राप्तच झाले नाहीत असे समजण्यात येईल.

१३.२.१५.४ **अर्ज शुल्क:**

| **अ.क्र.** | **उमेदवाराचा प्रकार** | **प्रवेशअर्ज शुल्क** |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय उमेदवार | रु. १००/- |
| २ | सर्व सामान्य उमेदवार | रु. १५०/- |
| ३ | महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार | रु. ३००/- |
| ४ | अनिवासी भारतीय उमेदवार | रु. ५००/- |

१३.२.१५.५ या शुल्कामध्ये मूळ कागदपत्रे तपासणी, ऑन लाईन अर्ज निश्चित करणे आणि अर्ज निश्चितीकरणाच्या पावती वजा पोचच्या (Receipt - cum - Acknowledgement) २ प्रती प्रिंटआऊट घेणे समाविष्ट आहे.

१३.२.१५.६ ऑन लाईन अर्ज भरणे, प्रिंट आऊट काढणे, गुणवत्ता क्रमांक शोधणे / जागा वाटपाची यादी शोधणे इत्यादी सेवा अर्ज स्विकृती केंद्रामार्फत उमेदवारांना देण्यात येवू शकतात. तथापि या सेवा पुरविल्याबद्यल प्रपत्र -४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित अर्ज स्विकृती केंद्र शुल्क आकारु शकतात.

**१३.३ टप्पा क्र. III - महाराष्ट्रातील महाराष्ट्र राज्याबाहेरील आणि अनिवासी भारतीय उमेदवारांची तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे:**

१३.३.१ महाराष्ट्र राज्यातील / महाराष्ट्र राज्याबाहेरील आणि अनिवासी भारतीय उमेदवारांची नियम क्र. ९.१ नुसार गुणवत्ता क्रमांक दर्शविणारी तात्पुरती गुणवत्ता यादी दिलेल्या वेळापत्रकानुसार सर्व अर्ज स्विकृती केंद्रावर व ऑन लाईन पध्दतीने प्रसिध्द करण्यात येईल.

१३.३.२ तात्पुरता गुणवत्ता क्रमांक / यादीमध्ये काही आक्षेप असल्यास तशी तक्रार विहित अर्जामध्ये (Grievance form) विहीत वेळापत्रकानुसार अर्ज स्विकृती केंद्रावर नोंदवावा. उमेदवाराने तक्रारीमधील केलेल्या दाव्याच्या पुष्ठ्यर्थ आवश्यक दस्तावेज सादर करावेत.

१३.३.३ अर्ज स्विकृती केंद्रे त्यांच्या Login मधून निश्चित झालेल्या उमेदवाराच्या प्रोफाईल मध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करतील.

१३.३.४ सर्व पात्र उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी विहीत वेळापत्रकानुसार सर्व अर्ज स्विकृती केंद्रावर व ऑनलाईनरीत्या प्रसिध्द करण्यात येईल.

१३.३.५ उमेदवारास त्यांच्या Loginव्दारे प्रवेशाची स्थिती, जागा वाटप, सूचना, पुढील प्रवेश फेरी करिताची पात्रता जाणून घेता येईल.

**टिप:** उमदेवारास गुणवत्ता क्रमांक हा त्यांच्या संबंधित पात्रतेनुसार प्राप्त झालेला असतो व त्यामुळे त्याची कोणत्याही व्यवसायात प्रवेशाची हमी देता येत नाही.

### १३.४ टप्पा क्र. IV - प्रवेश फेरीसाठी पर्याय देणे:

१३.४.१ **उमेदवारांनी http://admission.dvet.gov.in या संकेत स्थळावर ऑन लाईन प्रवेश अर्ज करतानाच प्रथम फेरीसाठी औ.प्र.संस्था व व्यवसायनिहाय विकल्प व पसंतीक्रम सादर करावे लागतील.**

१३.४.२ सर्व पात्र उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल

१३.४.३ उमेदवारास पुढील प्रवेश फेरींकरिता त्याच्या प्रवेश खात्यामध्ये Login करुनच दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या फेरीकरिता विहीत वेळापत्रकानुसार नव्याने विकल्प द्यावे लागतील.

१३.४.४ महाराष्ट्र राज्याबाहेरील आणि अनिवासी भारतीय उमेदवारांना चौथ्या प्रवेश फेरीसाठी चौथ्याफेरीमध्ये द्यावयाचे विकल्प सादर करावयाच्या विहीत वेळापत्रकानुसार द्यावे लागतील.

१३.४.५ प्रथम, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या प्रवेश फेरीमध्ये नव्याने विकल्प दिल्यानंतर उमेदवारांना कुठल्याही अर्ज स्विकृती केंद्रामध्ये जाऊन अर्ज निश्चितीकरणाची व कुठल्याही प्रकारचे शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

१३.४.६ संबंधित फेरीमध्ये विकल्प बदलण्यासाठी दिलेल्या विहीत वेळापत्रकानुसार उमेदवार त्याला वाटेल तितक्या वेळेस त्याच्या Login मधून विकल्प बदलवू शकतो.

१३.४.७ **जर उमेदवारास जागा मिळाली नाही व त्याने दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या प्रवेश फेरीकरिता नव्याने विकल्प सादर केले नाही तर उमेदवाराने पूर्वीच्या प्रवेश फेरीमध्ये सादर केलेले विकल्प पुढील प्रवेश फेरीमध्ये विचारात घेण्यात येतील.**

१३.४.८ पाचवी व सहावी प्रवेश फेरी म्हणजे समुपदेशन फेरीमध्ये उमेदवारांना त्यांच्या गुणवत्तेनुसार बोलाविण्यात येईल व त्याच्या मागणीनुसार व उपलब्धतेनुसार जागा देण्यात येईल.

### १३.५ टप्पा क्र. V - जागा वाटप करणे (Allotment of Seat):

१३.५.१ पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या फेरीमध्ये नियम क्र. ११, १२ व १३ नुसार जागा देण्यात येतील.

१३.५.२ जागा वाटपाची यादी विहीत वेळापत्रकानुसार सर्व अर्ज स्विकृती केंद्रावर व ऑन लाईन प्रसिध्द करण्यात येईल.

१३.५.३ जागा मिळालेल्या उमेदवारास जागा मिळाल्याचे पत्र (Allotment Letter) त्याच्या प्रवेश खात्यामध्ये तसेच सर्व अर्ज स्विकृती केंद्रामध्ये उपलब्ध राहील.

### १३.६ टप्पा क्र. VI - संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये व्यक्तीश: हजर राहून केंद्रीय प्रवेश प्रक्रीया फेरीमध्ये प्रवेशाचे निश्चितीकरण करण्याचे नियम:

१३.६.१ जागा मिळालेल्या उमेदवाराने जागा मिळालेल्या पत्राची (Allotment Letter) प्रिंट आऊट काढावी व जागा मिळालेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत व्यक्तिश: हजर व्हावे.

१३.६.२ सोबतच्या **प्रपत्र-३** मध्ये दिल्यानुसार पात्रतेच्या व आरक्षणानुसार केलेल्या प्रवेश अर्जातील दाव्याच्या पृष्टर्थ उमेदवार सर्व मूळ कागदपत्रे सादर करतील, तसेच सोबत सर्व कागदपत्रांची सत्य प्रतींचा १ संच, २ रंगीत छायाचित्रे (Passport size) आणि प्रशिक्षण शुल्क विहीत कालमर्यादेमध्ये जागा मिळालेल्या औ.प्र.संस्थेमध्ये जमा करेल.

१३.६.३ **प्रपत्र - २** मध्ये औ.प्र.संस्थानिहाय प्रशिक्षण शुल्काचा तपशील देण्यात आला आहे.

१३.६.४ खाजगी औ.प्र.संस्थाकरिता जमा करावयाचे प्रशिक्षण शुल्क खाजगी औ.प्र.संस्थांनी विहीत केलेल्या स्वरुपात (रोख, धनाकर्ष वा धनादेश) भरण्यात यावेत. संबंधित खाजगी औ.प्र.संस्थांच्या परवानगीने प्रशिक्षण शुल्क हप्ते निहाय जमा करता येतील पण शुल्क हप्ते निहाय जमा करण्याचा निर्णय हा संपूर्णत: संबंधित खासगी औ.प्र.संस्थेचा असेल.

१३.६.५ शासकीय औ.प्र.संस्थेकरिता भरावयाचे प्रशिक्षण शुल्क संबंधित शासकीय औ.प्र.संस्थेमध्ये रोखीने एकाच वेळेस जमा करावेत.

१३.६.६ उमेदवाराने प्रवेश अर्जामध्ये केलेल्या दाव्यांच्या पृष्टर्थ त्याने जमा केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची संबंधित औ.प्र.संस्था काळजीपूर्वक छाननी करतील. उमेदवाराचा प्रकार, प्रवर्ग पात्रता इ.च्या दाव्यात अथवा दाव्याच्या पृष्टर्थ सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये काही त्रुटी आढळल्यास त्या संबंधित उमेदवाराच्या नजरेस आणुन देण्यात येतील.

१३.६.७ उमेदवार विहीत वेळापत्रकानुसार नियोजित प्रवेश फेरीकरिता उपलब्ध मुदतीत आवश्यक कागदपत्रे अहवाल सादर करावयाच्या कालमर्यादेमध्ये सादर करु शकतील.

१३.६.८ उमेदवाराने एखादया दुसऱ्या संस्थेत प्रवेश घेतल्यामुळे जर तो प्रवेशाच्या वेळेस मूळ कागदपत्रे सादर करु शकत नसेल तर त्याला अशा संस्थेत विशिष्ट दिनांकास विशिष्ट अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असल्यामुळे त्यांची मूळ कागदपत्रे संस्थेत ठेवण्यात आल्याबाबत त्या संस्थेच्या संस्थांप्रमुखांचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. उमेदवारास अशा संस्थेच्या संस्थाप्रमुखाने प्रमाणपत्राच्या सत्यापन केलेल्या सत्यप्रती सादर कराव्या लागतील. अशा उमेदवारांना प्रशिक्षण शुल्क प्रवेशाच्या वेळेसच तात्काळ भरावे लागेल आणि अशा उमेदवारांना शुल्क जमा केल्याच्या तारखेपासुन ४ कार्यालयीन कामकाजांच्या दिवसांच्या आत कागदपत्रे जमा करण्याची परवानगी देण्यात येईल.

१३.६.९ उमेदवारास प्रवेश विहीत केल्यानंतर संबंधित उमेदवाराचा अंतिम शाळा/महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला व माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा (SSC) गुणपत्रकाची मूळ प्रत संबंधित संस्थेत जमा करुन घेण्यात येईल. एखादया उमेदवाराने संस्थेत अभ्यासक्रमात जर एकदा प्रवेश घेतला तर अशा उमेदवाराने प्रवेश रद्द केल्याशिवाय वा प्रशिक्षण पूर्ण केल्याशिवाय त्याला हा शाळा सोडल्याचा मूळ दाखला व माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षेच्या गुणपत्रकाची मूळ प्रत परत करण्यात येणार नाही. इतर सर्व प्रमाणपत्रे/कागदपत्रे प्रवेशाच्या वेळीच मूळ प्रतीवरुन छाननी करुन उमेदवाराला परत करण्यात येतील.

१३.६.१० जे उमेदवार सर्व बाबी पूर्ण करतील त्यांच्यासाठी संबंधित औ.प्र.संस्था दिलेल्या संकेतस्थळावर प्रवेशनिश्चितीसाठी आवश्यक ती सर्व प्रक्रिया संस्थेच्या Login मधुन पूर्ण करतील.

१३.६.११ प्रवेश निश्चित करण्याची Online प्रक्रिया झाल्यानंतर शेवटी प्रवेश निश्चित झाल्याचे पत्र पोचपावती (Admission Confirmation Slip) म्हणून ऑनलाईन प्रवेश प्रणालीव्दारे तयार केली जाईल.

१३.६.१२ संबंधित औ.प्र.संस्था पोच पावतीच्या दोन प्रतींची प्रिंटआऊट घेतील. यामधील एक प्रत प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह संबंधित प्रवेशित उमेदवाराला देण्यात येईल व दुसरी प्रत संस्थेमध्ये ठेवण्यात येईल.

१३.६.१३ ऑनलाईन प्रवेश निश्चिती करणाची प्रक्रिया राबविणे व त्यानुसार उमेदवारांची माहिती अद्ययावत करण्याची जबाबदारी संबंधित औ.प्र.संस्थेच्या प्राचार्यांची राहील. जर दिलेली ऑनलाईन प्रवेश निश्चिती प्रक्रिया पार पाडण्यास संस्था असमर्थ ठरली तर अशा अहवाल अप्राप्त प्रवेशाकरिताच्या जागा पुढील केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये भरल्या जातील.

१३.६.१४ जर एखादा उमेदवार प्रवेश देवू केलेल्या औ.प्र.संस्थेत प्रवेशाकरिता दिलेल्या मुदतीमध्ये संबंधित औ.प्र.संस्थेमध्ये हजर राहून अहवाल सादर करणार नाही तर अशा उमेदवाराचा त्याला वाटप झालेल्या जागेवरील प्रवेशाचा दावा रद्द होईल.

१३.६.१५ अशा प्रकारे रिक्त राहिलेल्या जागा पुढील केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेशासाठी उपलब्ध केल्या जातील.

**१३.७ टप्पा क्र. VII - पाचवी प्रवेशफेरी - जिल्हास्तरीय समुपदेशन फेरी:**

१३.७.१ चौथ्या प्रवेश फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागा पाचव्या प्रवेश फेरीकरिता उपलब्ध राहतील.

१३.७.२ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (SSC) पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण /अनुत्तीर्ण व अद्याप पर्यंत कोठेही प्रवेश न घेतलेल्या तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेशासाठी अर्ज न केलेल्या उमेदवारांसाठी प्रवेशाची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी ५ व्या प्रवेश फेरीपूर्वी नव्याने अर्ज करण्याची व/ वा अर्जात बदल करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

१३.७.३ पाचव्या प्रवेश फेरीकरिता उपलब्ध जागांचा तपशील http://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येईल.

१३.७.४ औ.प्र.संस्थांमध्ये प्रवेशोच्छुक उमेदवारांनी संबंधित जिल्हयाच्या ठिकाणी असणाऱ्या शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये व्यक्तीश: हजर राहून समुपदेशन फेरीकरिता दिलेल्या वेळापत्रकानुसार नोंदणी करावी.

१३.७.५ जिल्हास्तरीय समुपदेशन फेरी राबविणाऱ्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची यादी प्रपत्र – ५ मध्ये देण्यात येत आहे.

१३.७.६ हजर असलेले व नोंदणी केलेल्या उमेदवारांना गुणवत्तेनुसार क्रमाने समुपदेशनाकरिता बोलाविण्यात येईल.

१३.७.७ प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करण्यात येईल.

१३.७.८ वाटप झालेल्या जागेकरिता प्रवेश घेण्याची प्रक्रिया संबंधित उमेदवाराने "टप्पा क्र. VI - संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये व्यक्तीश: हजर राहून केंद्रीय प्रवेश प्रक्रीया फेरीमध्ये प्रवेशाचे निश्चितीकरण करण्याचे नियम" मध्ये विशद केल्यानुसार वेळापत्रकाप्रमाणे पूर्ण करावी.

**१३.८ टप्पा क्र. VIII - सहावी प्रवेशफेरी - शासकीय औ.प्र. संस्थांसाठी संस्थास्तरीय समुपदेशन फेरी:**

१३.८.१ खाजगी औ.प्र.संस्थातील पाचव्या प्रवेश फेरीच्या समाप्तीनंतर शिल्लक राहिलेल्या जागा संबंधित खाजगी औ.प्र.संस्थाना संस्था स्तरावर भरण्यासाठी उपलब्ध राहतील.

१३.८.२ शासकीय औ.प्र.संस्थातील पाचव्या प्रवेश फेरीच्या समाप्तीनंतर शिल्लक राहिलेल्या जागा संबंधित शासकीय औ.प्र.संस्थाना संस्थास्तरीय समुपदेशन फेरीव्दारे भरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील.

१३.८.३ सहाव्या प्रवेश फेरी करिता उपलब्ध जागांचा तपशील http://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येईल.

१३.८.४ शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये प्रवेशोच्छुक उमेदवारांनी संबंधित शासकीय औ.प्र.संस्थेत व्यक्तीश: हजर राहून समुपदेशन फेरीकरिता दिलेल्या वेळापत्रकानुसार नोंदणी करावी.

१३.८.५ हजर असलेले व नोंदणी केलेल्या उमेदवारांना गुणवत्तेनुसार क्रमाने समुपदेशनाकरिता बोलाविण्यात येईल.

१३.८.६ प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करण्यात येईल.

१३.८.७ **वाटप झालेल्या जागेकरिता प्रवेश घेण्याची प्रक्रिया संबंधित उमेदवाराने "टप्पा क्र. VI - संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये व्यक्तीश: हजर राहून केंद्रीय प्रवेश प्रक्रीया फेरीमध्ये प्रवेशाचे निश्चितीकरण करण्याचे नियम" मध्ये विशद केल्यानुसार त्याच दिवशी पूर्ण करावी.**

**१३.९ टप्पा क्र. IX - संस्था स्तरावरील प्रवेश:**

१३.९.१ मुद्दा क्र. १.४ मध्ये नमूद संस्था स्तरावरील प्रवेशासाठी संस्थेत उपलब्ध जागा व पाचव्या प्रवेश फेरीच्या समाप्तीनंतर शिल्लक राहिलेल्या जागा खाजगी औ.प्र.संस्थाना संस्था स्तरावर भरण्यासाठी उपलब्ध राहतील.

१३.९.२ खाजगी औ.प्र.संस्थामधील संस्था स्तरावरील जागांसाठी प्रवेशोच्छुक उमेदवारांना देखील http://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी लागेल.

१३.९.३ नोंदणीकृत उमेदवारांना ज्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घ्यावयाचा आहे त्या संस्थेत उमेदवाराने व्यक्तीश: हजर राहून "**टप्पा क्र. VI - संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये व्यक्तीश: हजर राहून केंद्रीय प्रवेश प्रक्रीया फेरीमध्ये प्रवेशाचे निश्चितीकरण करण्याचे नियम**" मध्ये विशद केल्यानुसार प्रवेश प्रक्रीया पूर्ण करावी.

१३.९.४ **केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पहिल्या दिवसापासून ते प्रवेशाच्या अंतिम दिनांकापर्यंत खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये संस्था स्तरावरील जागांवर उमेदवारांना प्रवेश घेता येतील.**

**१३.१० टप्पा क्र. X - प्रवेशोत्तर कार्यवाही:**

१३.१०.१ सर्व औ.प्र.संस्थांनी प्रवेशाची प्रक्रिया प्रवेशाच्या वेळापत्रकामध्ये स्पष्ट केल्यानुसार प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक राहील. अंतिम दिनांकानंतर कोणत्याही प्रवेशास व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत मान्यता दिली जाणार नाही.

१३.१०.२ ऑनलाईन प्रवेश निश्चिती प्रक्रिया संकेतस्थळ प्रवेशाच्या अंतिम तारखेस व वेळेस बंद केले जाईल.

१३.१०.३ सर्व शासकीय व खाजगी औ.प्र.संस्थांचे प्राचार्य त्यांच्या संस्थेच्या लॉगइनवरुन "Manage Trainee" या पर्यायावरुन प्रवेशित उमेदवारांना तुकडी व पाळी (Shift) बहाल करतील. तसेच स्वाक्षरी व छायाचित्र "Upload Photo with Signature" या पर्यायावरुन प्रवेशाच्या अंतिम दिनाकापासून १५ दिवसापर्यंत विनाविलंब शुल्क व पुढील १५ दिवसांकरिता विलंब शुल्कासह अपलोड करतील.

१३.१०.४ प्रवेश प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर औ.प्र.संस्थेचे प्राचार्य प्रवेशित उमेदवाराच्या याद्यांचे व वरीलप्रमाणे "Manage Trainee" बाबत कार्यवाहीच्या प्रिंटआऊट घेतील व त्यावर स्वाक्षरी करुन ती प्रत संबंधित प्रादेशिक कार्यालयास सादर करतील. प्रादेशिक सहसंचालक प्रवेशित उमेदवाराने प्रवेश निश्चिती प्रक्रीयेच्या वेळेस पात्रतेच्या अटींची पूर्तता करतात किंवा नाही याच्या दाव्यापृष्ठर्थ सादर केलेल्या दस्ताऐवजांची तपासणी करुन प्रवेशित उमेदवारांच्या यादयांना अंतिम मंजुरी प्रदान करतील.

१३.१०.५ तुकडी/पाळी लागू करणे व स्वाक्षरी व छायाचित्र विहीत मुदतीनंतर अपलोड करण्याकरिता विलंब शुल्क:

| अ.क्र. | तपशील | विलंब शुल्क |
|---|---|---|
| १ | प्रवेशाच्या अंतिम तारखेपासून १५ दिवसांपर्यंत तुकडी व पाळी लागू करणे | रु. ०० |
| २ | प्रवेशाच्या अंतिम तारखेपासून १५ दिवसांपर्यंत स्वाक्षरीत छायाचित्र अपलोड करणे | रु.०० |
| ३ | प्रवेशाच्या अंतिम तारखेपासून १६ वा दिवस ते प्रथम सत्र परीक्षेच्या १५ दिवस अगोदर पर्यंत तुकडी व पाळी लागू करणे | रु. १००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी |
| ४ | प्रवेशाच्या अंतिम तारखेपासून १६ वा दिवस ते प्रथम सत्र परीक्षेच्या १५ दिवस अगोदर पर्यंत स्वाक्षरीत छायाचित्र अपलोड करणे | रु. १००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी |

१३.१०.६ प्रवेशित विद्यार्थ्यांकडून विलंब शुल्क जमा करण्यात येणार नसून विलंब शुल्क संबंधित संस्थेच्या प्रवेश प्रमुखांना भरावे लागेल.

**टिप:**

वर नमूद केंद्रीय प्रवेश प्रक्रीया ही सुचक व मार्गदर्शक आहे. प्रवेशाचे वेळापत्रक, अर्ज करण्याची पध्दती, जागावाटप, प्रवेश निश्चिती करणे व इतर संकीर्ण कार्यवाही इ.चा समावेश असलेली प्रवेशाशी व प्रवेशानंतरच्या कार्यवाहीशी संबंधित प्रमाणित कार्यपध्दती (SOP- Standard Operating Procedure) जाहीर केल्या प्रमाणे प्रवेश प्रक्रीयेच्या १५ दिवस अगोदर संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.

इतर फेऱ्यांमधुन जागा वाटपाची योजना व प्रवेश निश्चिती करण्याचे नियम क्र.१.० ते ४.० याची रचना प्रशिक्षणाची हानी थांबविणे आणि केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेमधील प्रत्येक फेरीच्या व मुख्यत्वे सर्व फेऱ्यांनंतर शिल्लक राहणाऱ्या संचालनालयात उपलब्ध जागांच्या आकडेवारी व वस्तुस्थिती वरुन व संचालनालयाच्या यापुर्वीच्या अनुभवावरुन केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या फेऱ्या औपचारीक व निरुपयोगी न राहता त्यांना अर्थपूर्ण व परिणामकारक करण्यासाठी करण्यात आली आहे.

प्रवेश प्रक्रीयेत पारदर्शकता व सुलभता आणण्याच्या हेतुने, जास्तीत जास्त जागा भरणेकरिता, केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेमधील पूर्वीच्या फेऱ्यांमध्ये जागा वाटप झालेल्या विद्यार्थ्यांनी स्थलांतर केल्यामुळे जागा रिक्त राहू नये म्हणून प्रवेश फेऱ्यांची मांडणी करण्यात आली आहे.

सक्षम अधिकारी आवश्यकता पडल्यास जास्तीत जास्त प्रवेश होतील याची खात्री देण्याकरिता प्रवेश प्रक्रीयेदरम्यान अग्रगण्य वृतपत्रांमध्ये व प्रवेशाच्या संकेतस्थळावर आधीच प्रसिध्द करुन सुधारणा घडवुन आणणारी कार्यवाही करु शकतात.

## १४.० मूळ प्रमाणपत्रे ठेवून घेण्याबाबत:

एखाद्या उमेदवाराला प्रवेश दिल्यानंतर त्यांचा शाळा सोडल्याचा मूळ दाखला व माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (SSC) परीक्षेचे मूळ गुणपत्रक संबंधित संस्थेमध्ये ठेवण्यात यावे जोपर्यंत उमेदवार प्रवेश रद्द करीत नाही वा प्रशिक्षण पूर्ण करीत नाही तोपर्यंत ही मूळ प्रमाणपत्रे प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना परत करण्यात येवू नयेत.

## १५.० प्रशिक्षण शुल्क, अनामत रक्कम व सवलत बाबत विवरण:

१५.१ शासकीय व खाजगी औ.प्र.संस्थांसाठी आकारलेले शुल्क विवरण खालीलप्रमाणे आहे

<table>
<tr><th rowspan="2">अ.क्र.</th><th rowspan="2" colspan="2">तपशील</th><th colspan="5">शासकीय औ.प्र.संस्था</th><th colspan="3">खाजगी औ.प्र.संस्था *</th></tr>
<tr><th>सामान्य श्रेणी</th><th>राखीव श्रेणी</th><th>IMC जागा</th><th>OMS</th><th>NRI</th><th>MS</th><th>OMS</th><th>NRI</th></tr>
<tr><td colspan="11">वार्षिक प्रशिक्षण शुल्क</td></tr>
<tr><td rowspan="3">१</td><td rowspan="3">प्रशिक्षण शुल्क</td><td>मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय</td><td>१२००</td><td>-</td><td>३००००</td><td>४५०००</td><td>६००००</td><td rowspan="7" colspan="3">खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनिहाय एकत्रित शुल्क तपशिल http://admission.dvet.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे</td></tr>
<tr><td>बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय</td><td>१०००</td><td>-</td><td>२५०००</td><td>३७५००</td><td>५००००</td></tr>
<tr><td>बिगर अभियांत्रिकी व्यवसाय</td><td>८००</td><td>-</td><td>२००००</td><td>२००००</td><td>४००००</td></tr>
<tr><td>२</td><td colspan="2">ओळखपत्र शुल्क</td><td>५०</td><td>५०</td><td>५०</td><td>५०</td><td>५०</td></tr>
<tr><td>३</td><td colspan="2">ग्रंथालय शुल्क</td><td>१००</td><td>१००</td><td>१००</td><td>१००</td><td>१००</td></tr>
<tr><td>४</td><td colspan="2">इंटरनेट सुविधा शुल्क</td><td>१००</td><td>१००</td><td>१००</td><td>१००</td><td>१००</td></tr>
<tr><td>५</td><td colspan="2">सांस्कृतिक कार्य शुल्क</td><td>१००</td><td>१००</td><td>१००</td><td>१००</td><td>१००</td></tr>
<tr><td>६</td><td colspan="2">वसतीगृह शुल्क</td><td>१२००</td><td>१२००</td><td>१२००</td><td>६०००</td><td>१२०००</td><td colspan="3">संबंधित औ. प्र. संस्थांनी निश्चित करावे</td></tr>
</table>

| अ. क्र. | तपशील | शासकीय औ.प्र.संस्था | | | | | खाजगी औ.प्र.संस्था * | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सामान्य श्रेणी | राखीव श्रेणी | IMC जागा | OMS | NRI | MS | OMS | NRI |
| | **प्रवेशाच्यावेळी जमा करावयाची अनामत रक्कम** | | | | | | | | |
| ७ | प्रशिक्षण अनामत रक्कम | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० |
| ८ | ग्रंथालय अनामत रक्कम | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |
| ९ | वसतीगृह अनामत रक्कम | १००० | १००० | १००० | १००० | १००० | १००० | १००० | १००० |

* संबंधित प्रशिक्षण वर्षाकरिता खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनिहाय एकत्रित शुल्क तपशिल http://admission.dvet.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. खाजगी औ.प्र.संस्थासाठी आकारावयाचे शुल्क निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा कमी शुल्क आकारु शकतात. उमेदवारांनी संबंधित खाजगी औ.प्र. संस्थांशी विकल्प सादर करण्यापूर्वी व/ वा प्रवेश घेण्यापूर्वी संपर्क करावा.

१५.२ निर्धारीत केलेल्या शुल्कापेक्षा खाजगी औ.प्र.संस्था अधिक शुल्काची मागणी करत असल्यास संबंधित सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय यांच्या कडे तात्काळ तक्रार करावी. तक्रारीचे निराकरण न झाल्यास सक्षम अधिकारी म्हणजेच संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्या कडे तक्रार करावी.

१५.३ शासकीय औ.प्र.संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण शुल्कामध्ये तसेच इतर शुल्कात दिली जाणारी सवलत ही राज्यातील रहिवासी असलेल्या व विहीत पात्रता धारक उमेदवारांना दिली जाईल.

१५.४ शासकीय औ.प्र.संस्थेतील, संस्था व्यवस्थापन समिती मधील तुकडीकरिता, मंजूर प्रवेशक्षमतेच्या (नियम क्र. १.२.१२ अन्वये) ११०%जागांकरिता शासकीय औ.प्र.संस्थेचे शुल्क लागू होईल. प्रशिक्षण वर्ष २०१५-१६ करिता खाजगी औ.प्र.संस्थेस जे मूलभूत शुल्क आकारले आहे, ते संस्था व्यवस्थापन समितीच्या मंजूर उपलब्ध जागांपैकी २०% जागांना लागू होईल. तथापि, संबंधित शासकीय औ.प्र.संस्थांच्या संस्था व्यवस्थापन समिती, वरीलपेक्षा कमी फी आकारु शकतात. जर संस्था व्यवस्थापन समितीने कमी फी घेण्याचा निर्णय ठरविला असेल तर तो निर्णय सक्षम अधिकाऱ्याला प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी कळवावा लागेल.

१५.५ अनामत रक्कम प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणादरम्यान प्रवेश रद्द केल्यास किंवा प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर (काही वजावटी लागू असल्यास) परत केली जाईल.

१५.६ खाजगी औ.प्र.संस्थांचे शुल्क हे संबंधित औ.प्र.संस्थांच्या विहीत अर्जात नमूद केल्याप्रमाणे जमा करण्यात यावे. खाजगी औ.प्र.संस्थांना हप्त्याने शुल्क घेण्याची मुभा/परवानगी आहे. तथापि, यासंबंधीचा निर्णय सर्वतोपरी संबंधित खाजगी औ.प्र.संस्थेचा राहील.

१५.७ **शासकीय औ.प्र.संस्थेचे शुल्क:**

१५.६.१ शासकीय औ.प्र.संस्थेचे शुल्क संबंधित शासकीय औ.प्र.संस्थेत रोखीने जमा करावे. शुल्क अदा केल्यानंतरच प्रवेश निश्चित करण्यात येईल.

१५.६.२ वरीलप्रमाणे शासकीय औ.प्र.संस्थेत प्रशिक्षणार्थ्यांकडुन घेण्यात येणारे प्रशिक्षण शुल्क हे शासन जमा करण्यात येईल. उर्वरीत शुल्क जसे ओळखपत्र शुल्क, ग्रंथालय शुल्क, इंटरनेट सुविधा शुल्क व सांस्कृतिक कार्य शुल्क संबंधित संस्थेच्या स्वीय प्रपंची लेख्यामध्ये जमा करण्यात येईल.

१५.६.३ स्वीय प्रपंची लेख्यामध्ये जमा करण्यात आलेल्या निधीतुन खालील बाबींवर खर्च करण्यात येईल.

| अ.क्र | स्वीय प्रपंची लेख्यामध्ये जमा करण्यात आलेले शुल्क | खर्च करावयाची बाब | खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ओळखपत्र शुल्क | प्रवेशित उमेदवारांना ओळखपत्र देणे | १००% |
| २ | ग्रंथालय शुल्क | अभ्यासक्रमाशी संबंधित पुस्तके/ दृकश्राव्य माध्यम खरेदीसाठी | १००% |
| ३ | इंटरनेट सुविधा शुल्क | इंटरनेट सुविधा पुरविणे | १००% |
| ४ | सांस्कृतिक कार्य शुल्क | सांस्कृतिक कार्य / रोजगार मेळावे आयोजित करणे | १००% |

१५.६.४ वरीलप्रमाणे स्वीय प्रपंची लेख्यामध्ये जमा करण्यात आलेला निधी ज्या उद्दिष्टांसाठी जमा करण्यात आलेला आहे त्याच बाबींवर खर्च करण्यात यावा व याची माहिती संस्थेच्या सूचनाफलकावर प्रतिवर्षी दि.१५ एप्रिल पर्यंत जाहिर करण्यात यावी.

**१६.० प्रवेश रद्द प्रक्रिया व शुल्क परतावा:**

१६.१ प्रवेशित उमेदवार आपला प्रवेश संबंधित औ.प्र.संस्थेस भेट देवून आपले Login ID वापरुन दोन्हीही प्रवेश Online पध्दतीत रद्द करु शकतो. यासाठी संबंधित औ.प्र.संस्था व प्रवेशित उमेदवार दोघांना आपल्या Login ID व्दारे प्रवेश रद्द करावा लागेल.

१६.२ ऑनलाईन प्रवेश प्रणालीच्या माध्यमातूनच प्रवेश रद्द करणे अनिवार्य आहे.

१६.३ प्रवेश रद्द केल्यानंतर प्रणाली ऑनलाईन प्रवेश रद्द केल्याची पावती (Admission Cancellation Note) निर्माण करेल.

१६.४ औ.प्र.संस्था सदर पावतीच्या दोन प्रतीत प्रिंटआऊट घेतील. दोन्ही पावतीवर संबंधित औ.प्र.संस्थेचे प्राचार्य व उमेदवार सही करतील.

१६.५ प्रवेश रद्द केलेल्या पावतीची १ प्रत उमेदवाराला देण्यात येईल व दुसरी प्रत संबंधित औ.प्र. संस्थेकडे राखून ठेवण्यात येईल.

१६.६ एखाद्या उमेदवाराने प्रवेशप्रक्रीयेच्या कुठल्याही टप्प्यावर प्रवेश रद्द केला तर तो त्यानंतरच्या प्रवेशफेरीसाठी अपात्र ठरेल. तथापि, असे उमेदवार खाजगी औ.प्र.संस्थेत संस्थास्तरावरील जागांसाठी प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंत पात्र राहील.

१६.७ शुल्क परतावा हा खालीलप्रमाणे प्रवेश रद्द शुल्क कपात करुन दिले जाईल.

| अ. क्र. | परिस्थिती | शासकीय औ.प्र.संस्थेतील उमेदवारांसाठी परतावा | खाजगी औ.प्र.संस्थेतील उमेदवारांसाठी परतावा |
|---|---|---|---|
| १ | प्रवेश रद्द विनंती अर्ज हा ४ थ्या प्रवेशफेरीच्या प्रवेश निश्चिती करण्याच्या शेवटच्या दिवशी व वेळेपूर्वी प्राप्त झाला असल्यास | पूर्ण शुल्कातून रु. ५००/- वजा करुन ऊर्वरित रक्कम परत करावी. | पूर्ण शुल्कातून रु. १०००/- वजा करुन ऊर्वरित रक्कम परत करावी. |
| २ | प्रवेश रद्द विनंती अर्ज हा प्रवेशाच्या अंतिम दिनांका नंतर प्राप्त झाले असल्यास व सदर जागा ही संबधित औ.प्र.संस्थेने भरली नसल्यास | अनामत रक्कमे शिवाय कुठलाही परतावा नाही. | अनामत रक्कमे शिवाय कुठलाही परतावा नाही. |

**१७.० संकीर्ण:**

१७.१ सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेच्या अभ्यासक्रमासाठी शिक्षणाचे माध्यम हे मराठी आहे.

१७.२ शारिरीक सक्षमता: प्रवेशित उमेदवारांच्या शारिरीक तंदुरुस्ती पडताळणीसाठी संस्था प्रमुखांनी प्रवेशित उमेदवारांची प्रशिक्षणाच्या आवश्यकतेनुसार तपासणी करिता वैद्यकीय तपासणी आयोजित करावी.

**१८.० वसतीगृहात राहण्याची सोय:**

प्रवेशित सर्व उमेदवारांना त्या संस्थेच्या वसतीगृहातील खोल्या मिळतीलच याची शाश्वती नाही. उमेदवाराने देय वसतीगृह शुल्क इत्यादी गोष्टी बाबत संबंधित औ.प्र.संस्थेच्या प्राचार्याकडून खात्री करुन घ्यावी. प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांना व्यक्तीश: वसतीगृहात राहण्याची व्यवस्था उपलब्ध होवू शकते किंवा नाही याकरिता ज्या औ.प्र.संस्थेत ते प्रवेश घेऊ इच्छितात तेथील प्राचार्यांशी संपर्क साधावा.

औ.प्र.संस्थेच्या प्राचार्यांनी शारिरीक अपंगत्व असलेल्या उमेदवारांच्या खोली मिळण्यासाठीच्या अर्जांना प्राथमिकता देवून सहानुभूतीपूर्वक विचार करावा.

**१९.० आचरण आणि शिस्त:**

१९.१ जर उमेदवार प्रवेश अर्जामध्ये परिपूर्ण व बरोबर विधान करण्यास अपयशी ठरत असेल / काही माहिती दडवत असेल / खोटे कागदपत्र जमा करत असेल तर तो / ती प्रवेशास अपात्र ठरेल. अशा उमेदवारांवर संपूर्ण प्रवेश प्रक्रीयेकरिता बंदी घालण्यात येईल. त्यामुळे उमेदवाराने असाच दावा करावा की, तो सिध्द करण्याच्या पुष्ठ्यर्थ संबंधित मूळ दस्तऐवज आहेत.

१९.२ एखादया औ.प्र.संस्थेत प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेताना शासनाने लागू केलेल्या शासनाच्या कायदा व नियमाच्या विरुध्द राष्ट्रविरोधी कृत्य करताना किंवा शिस्तनियमाच्या विरुध्द काही कार्यवाही करताना आढळला तर त्यास संस्थेमधून कुठल्याही सूचनेविना प्राचार्यांमार्फत निलंबित करण्यात येईल व / वा जवळच्या पोलीस ठाण्यास कळविण्यात येईल.

१९.३ प्रशिक्षणार्थ्याने औ.प्र.संस्थेतील सर्व शिस्तविषयी नियमांचे पालन करावे. उमेदवाराने संस्थेने / एनसीव्हीटी / एससीव्हीटी / शासनाने विहीत केलेल्या आचार व शिस्तीच्या नियमांचे उल्लंघन केल्यास, त्याला स्पष्टीकरणाची संधी उपलब्ध करुन दिल्यानंतर संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना या उमेदवारास निलंबित करण्याचा अधिकार आहे.

१९.४ नियमामध्ये असे असले तरी, शासनाने प्रवेशासंबंधी कोणताही धोरणात्मक निर्णय घेतला असल्यास, शासनाने त्या-त्या वेळेस दिलेल्या निर्देशानुसार तो त्या वेळेपासूनच अंमलात येईल. वेळोवेळी त्यामध्ये बदल केल्यास त्यानुसारच नियमांची अंमलबजावणी केली जाईल.

१९.५ जी समस्या वर आली नाही, ती उदभवल्यास त्याबाबत पूर्ण व अंतिम कार्यवाही सक्षम अधिकाऱ्यामार्फत केली जाईल.

१९.६ अर्जामध्ये नमूद केलेली माहिती किंवा प्रवेशाच्यावेळी किंवा प्रवेशानंतर उमेदवाराने प्रवेशाशी संबंधित दिलेली माहिती खोटी किंवा चुकीची आढळल्यास, त्याचा किंवा तिचा प्रवेश रद्द करण्यात येईल, शुल्क जमा केले जाईल व त्याला किंवा तिला औ.प्र.संस्थेतून प्राचार्यांकडून निलंबित केले जाईल.

१९.७ निलंबन आदेशाविरोधातील अपिल मात्र ७ दिवसांच्या आत संचालक (प्रशिक्षण) , व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना पाठविण्यात येईल व ज्यांचा या प्रकरणातील निर्णय अंतिम राहील.

१९.८ उमेदवाराने परिक्षेस बसण्यास पात्र होण्यासाठी प्रत्येक सत्रामध्ये (सेमिस्टरमध्ये) कमीत कमी ८०% उपस्थिती कायम ठेवावी लागेल.

२०.० **रॅगिंग प्रतिबंधाबाबत कार्यवाही:**

**महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंध कायदा-१९९९ जो दि.१५ मे, १९९९ पासुन लागू झाला आहे त्यात खालील रॅगिंग प्रतिबंध बाबी अंतर्भूत आहेत.**

२०.१ कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या आवारात किंवा आवाराबाहेर रॅगिंगला प्रतिबंध करण्यात आला आहे.

२०.२ जो कोणी शैक्षणिक संस्थांच्या आवारात किंवा आवाराबाहेर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या रॅगिंग करेल / भाग घेईल / साथ देईल / प्रसार करत असेल त्यास २ वर्षे कैद आणि/ किंवा दहा हजार रुपयांपर्यंत जाऊ शकतो एवढा दंड आकारण्यात येईल.

२०.३ कुठलाही विद्यार्थी रॅगिंगमध्ये दोषी आढळल्यास त्याची सदर शैक्षणिक संस्थेतून हकालपट्टी केली जाईल व त्यास निलंबित केल्याच्या दिनांकापासुन ५ वर्षांसाठी कुठल्याही शैक्षणिक संस्थेत प्रवेशास प्रतिबंध घालण्यात येईल.

२०.४ जेव्हा एखादा विद्यार्थी किंवा परिस्थितीप्रमाणे पालक अथवा त्याला सांभाळणारे अथवा त्या शैक्षणिक संस्थेतील शिक्षक लिखित स्वरुपात छळवणुकीची तक्रार संस्था प्रमुखाला करेल, तेव्हा संबंधित शैक्षणिक संस्थेचा प्रमुख यापूर्वीच्या तरतूदी अबाधित ठेवून, तक्रार आल्यापासून सात दिवसाच्या आत तक्रारीत उल्लेख केलेल्या बाबींची चौकशी करतील आणि जर प्रथमदर्शनी त्या तक्रारीत सत्यता आढळल्यास गुन्ह्याचे आरोप झालेल्या विद्यार्थ्याला निलंबित करतील आणि त्वरित सदर तक्रार पुढील कार्यवाहीसाठी ज्याठिकाणी शैक्षणिक संस्था आहे त्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या पोलीस स्टेशनमध्ये नोंदवतील. संस्था प्रमुखाकडून केल्या जाणाऱ्या चौकशीमध्ये तक्रारीमध्ये प्रथमदर्शनी तथ्य न आढळल्यास संस्था प्रमुखाकडून तक्रारदाराला लेखी स्वरुपात वस्तुस्थिती कळविली जाईल. या प्रकरणात संस्था प्रमुखांनी घेतलेला निर्णय अंतिम असेल.

२०.५ जर शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने वर २०.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे रॅगिंगसंबंधी आलेल्या तक्रारीसंबंधी दुर्लक्ष केले असल्यास किंवा ते प्रकरण हाताळण्यांत तो अपयशी झाल्याप्रकरणी दोषी आढळल्यास वरील नियम २०.२ प्रमाणे शिक्षेस पात्र धरले जाईल.

२०.६ मा. सर्वोच्च न्यायालयाने वि.अ.याचिका क्रमांक २४२९५/२००६, दि.१६.५.२००७ आणि दिवाणी अपील नं.८८७/२००९, दि.८.५.२००९ यामध्ये दिलेल्या निर्देशानुसार देशातील सर्व उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये सर्व विद्यार्थ्यांचा शारिरीक व मानसिक, निरोगी विकास प्रदान करणेसाठी अथवा एखादी कृती ज्याचा परिणाम खिल्ली उडविणे, नवीन विद्यार्थ्यांशी अथवा कोणत्या विद्यार्थ्यांशी उध्दटपणे वागणे, अथवा हाताळणे, कुठलाही विद्यार्थी किंवा विद्यार्थ्यांकडुन नवीन प्रवेशित विद्यार्थ्याला किंवा इतर कुठल्याही विद्यार्थ्याला दंगलखोर वा बेशिस्त कृत्यांमध्ये गोवणे ज्यामुळे त्रास, दु:ख, शारिरीक व मानसिक क्षती झाली असेल अथवा होईल किंवा नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांमध्ये किंवा इतर कुठल्याही विद्यार्थ्यांमध्ये धास्ती, भीती किंवा काळजी निर्माण होईल किंवा कुठल्याही विद्यार्थ्यांस कुठलेही असे कृत्य करावयास लावणे जो तो सर्वसामान्यरित्या करणार नाही / आणि ज्याचा परिणाम लाजीरवाणी भावना निर्माण होण्यास किंवा यातना होण्यास, किंवा गोंधळ निर्माण होण्यास कारणीभुत होईल ज्याचा परिणाम विपरीत अशा नवीन अथवा कुठल्याही विद्यार्थ्यांच्या शारिरीक अथवा मानसिक स्थितीवर होईल. याचा समावेश असलेल्या रॅगींगला कायद्याने प्रतीबंध करण्यात येईल व ही आपत्ती काढुन टाकण्यात येईल.

२०.७ **रॅगींग या संकल्पनेमध्ये खालील एक किंवा अधिक बाबींचा समावेश होईल:**

२०.७.१ कुठलाही विद्यार्थी किंवा विद्यार्थ्याकडून नवीन प्रवेशित विद्यार्थ्याला लेखी किंवा इतर कुठल्याही विद्यार्थ्याला शाब्दिक बोलणे अथवा एखादी कृती ज्याचा परिणाम खिल्ली उडविणे, नवीन विद्यार्थ्यांशी अथवा कोणत्याही विद्यार्थ्यांशी उदध्टपणे वागणे अथवा हाताळणे

२०.७.२ कुठलाही विद्यार्थी किंवा विद्यार्थ्यांकडून नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांला किंवा इतर कुठल्याही विद्यार्थ्यांला दंगलखोर वा बेशिस्त कृत्यांमध्ये गोवणे ज्यामुळे त्रास, दु:ख, शारिरीक व मानसिक क्षती झाली असेल अथवा होईल किंवा नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांमध्ये किंवा इतर कुठल्याही विद्यार्थ्यांमध्ये धास्ती, भीती किंवा काळजी निर्माण होईल

२०.७.३ कुठल्याही विद्यार्थ्यास कुठलेही असे कृत्य करावयास लावणे जो तो सर्वसामान्यरित्या करणार नाही / आणि ज्याचा परिणाम लाजिरवाणी भावना निर्माण होण्यास किंवा यातना होण्यास, किंवा गोंधळ निर्माण होण्यास कारणीभूत होईल ज्याचा परिणाम विपरीत अशा नवीन अथवा कुठल्याही विद्यार्थ्यांच्या शारिरीक अथवा मानसिक स्थितीवर होईल.

२०.७.४ वरिष्ठ विद्यार्थ्यांकडुन अशी कृती की जी नवीन अथवा कुठल्याही विद्यार्थ्यांच्या नियमित प्रशिक्षणामध्ये बाधा, अडथळा अथवा प्रतिबंध निर्माण करेल.

२०.७.५ नवीन अथवा कुठल्याही विद्यार्थ्यांची सेवा वैयक्तिक अथवा विद्यार्थ्यांच्या गटाचे प्रशिक्षणाच्या कार्यासाठी घेऊन शोषण करेल.

२०.७.६ विद्यार्थ्यांतर्फे नवीन अथवा कुठल्याही विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक किंवा जबरदस्तीने खर्चाचा भार टाकणे.

२०.७.७ शारिरीक शोषणाचे कुठलेही कृत्य ज्यामध्ये लैंगिक शोषण, समलैंगिक शोषण, नग्नता, अश्लील हावभाव, असभ्य कृती करावयास लावणे, शारिरीक इजा पोहचविणे किंवा व्यक्ती अथवा आरोग्यास धोका संभावणारे सर्व प्रकार सामिल आहेत.

२०.७.८ अश्लील शिवीगाळव्दारे, मेलव्दारे,टपालाव्दारे नवीन तथा इतर कुठल्याही विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे फसगत किंवा दुसऱ्याची नक्कल किंवा दुसऱ्याचा अपमान करणारी कुठलीही कृती.

२०.७.९ विकृत आनंद मिळण्याच्या किंवा सामर्थ्य / अधिकार व वरिष्ठपणा दाखविण्याच्या उद्देश असो अथवा नसो अशी विद्यार्थ्यांने केलेली कुठलीही कृती ज्याचा नवीन अथवा इतर कुठलीही की ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक स्थिती व आत्मविश्वासावर परिणाम होईल

**२०.८ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील रॅगींग करणाऱ्या व प्रोत्साहन देण्याच्या विद्यार्थ्यांविरुध्द कार्यवाहीबाबत:**

२०.८.१ रॅगींग करणाऱ्या व्यक्तीस होणारी शिक्षा ही जरब बसविल अशी व कठोर असावी ज्यामुळे अशा प्रकाराची पुनरावृत्ती होण्यास प्रतिबंध लागेल.

२०.८.२ रॅगींग च्या प्रत्येक घटनांची संस्थेच्या अधिकाऱ्यांमार्फत जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंद केली पाहिजे.

२०.८.३ रॅगींगच्या शिक्षेशी संबंधित किंवा रॅगींगच्या प्रत्येक घटनेतील तथ्यावर आधारीत व रॅगींगच्या घटनेचा प्रकार व तीव्रता बघुन संस्थेची रॅगींग विरोधी समिती योग्य निर्णय घेईल.

२०.८.४ घडलेल्या गुन्ह्याचा प्रकार व तीव्रता बघून संस्थास्तरावर दोषी आढळलेल्या विद्यार्थ्यास व्यक्तीस खालीलपैकी एक किंवा एकापेक्षा जास्त एकत्रित शिक्षा होईल.

२०.८.४.१ प्रवेश रद्द करणे

२०.८.४.२ वर्गातील उपस्थितीपासून निलंबित करणे

२०.८.४.३ शिष्यवृत्ती / फेलोशिप/ इतर सवलतीपासून वंचित करणे / रोखून धरणे

२०.८.४.४ परीक्षा व/वा इतर मूल्यांकन प्रक्रीयेतील सहभागास प्रतिबंध करणे

२०.८.४.५ निकाल रोखून धरणे

२०.८.४.६ कोणत्याही विभागीय, राष्ट्रीय, आंतरराष्टीय स्पर्धेचे, युवा उत्सवाचे संस्थेचे प्रतिनिधीत्व करण्यापासून हद्दपार करणे

२०.८.४.७ वसतीगृहातून निलंबित करणे./ हकालपटटी करणे.

२०.८.४.८ संस्थेमधुन ठराविक कालावधीकरिता विद्यार्थ्याला तात्पुरते काढुन टाकणे.

२०.८.४.९ संस्थेमधून हकालपटटी आणि दुसऱ्या कोणत्याही संस्थेत प्रवेशास बंदी घालणे.

२०.८.४.१० सामुहिक शिक्षा: जेव्हा रॅगींग चा गुन्हा करणारा वा प्रोत्साहन देणाऱ्याची ओळख पटणार नाही तेव्हा संस्था संभावित रॅगींग करणाऱ्यांवर सामाजिक दबाव आणण्यास सामुहिक शिक्षा करेल.

**२१.० हमीपत्र:**

सर्व उमेदवार ज्यांनी प्रवेशासाठी Online अर्ज केलेले आहेत ते खालीलप्रमाणे हमीपत्र भरुन देत आाहेत असे समजण्यात येईल.

२१.१ मी प्रवेशाचे सर्व नियम वाचले आणि सदर नियमांचे मला पूर्णपणे आकलन झाले आहे व तदनंतर मी चालू वर्षाच्या प्रवेशाकरिता ऑनलाईन अर्ज भरला आहे.

२१.२ माझ्या ऑनलाईन प्रवेश अर्जात माझ्याकडून दिली गेलेली माहिती ही माझ्या माहितीनुसार व विश्वासाप्रमाणे खरी असून प्रवेश अर्जात दिलेली माहिती किंवा माझ्या प्रवेशाबाबत मी पुरविलेली माहिती नंतर किंवा कुठल्याही वेळेस खोटी किंवा चुकीची सिध्द झाल्यास त्याचवेळेस माझा प्रवेश रद्द होईल व मला प्राचार्यांकडून निलंबित करण्यात येईल. याची मला जाणीव आहे.

२१.३ भारतीय सरकारतर्फे गठीत किंवा वैधानिक परीक्षा मंडळाच्या परीक्षेस बसण्यास मला बंदी घालण्यात आलेली नाही.

२१.४ मला माझ्या अर्जाच्या छाननीच्या वेळेस उपलब्ध व्यवसाय व माझ्या गुणवत्तेच्या क्रमानुसार प्रवेशासाठी जागा मिळणार आहे याची मला जाणीव राहील. मी प्रवेश निश्चितीसाठी निवड झालेल्या औ.प्र.संस्थेत विहीत वेळापत्रकानुसार उपस्थित राहून ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया पूर्ण करेन.

२१.५ मला माहित आहे की कागदपत्रे जमा करण्याच्या शेवटच्या तारखेनंतर माझ्या प्रवेशाशी संबंधित नियमात उल्लेख असल्याशिवाय मला सवलती वा हक्क इ. च्या दाव्याप्रित्यर्थ कागदपत्रे सादर करता येणार नाहीत.

२१.६ प्रवेशासंबंधी मला प्रवेश प्राधिकरण किंवा प्रतिनिधीकडून काहीही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची मला जाणीव आहे. मी हेही जाणून आहे की संस्थेमध्ये मी स्वत: जावून संस्थेतील सूचना फलकावरील वा http://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावरील सूचना पाहणे ही पूर्णपणे माझी जबाबदारी राहील.

२१.७ मला माहित आहे की, NCVT/SCVT च्या परीक्षा प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या परीक्षेसंबंधी परिक्षेस बसण्याच्या संधी, प्रत्येक सेमिस्टरसाठी कमीत कमी उपस्थिती, नकारात्मक गुणपध्दती व असे इतर नियम जे NCVT/SCVT यांनी वेळोवेळी ठरवून दिलेले आहेत त्या नियमांना मी बांधील राहीन.

२१.८ मी हयानुसार मान्य करतो की शासनाकडून लागू करण्यात आलेले नियम, कायदा आणि प्रशासन माझ्यावर बंधनकारक असतील. मी हयानुसार हमी देत आहे की, संस्थेच्या आवारात किंवा आवाराबाहेर कायदा व प्रशासन हातात घेणार नाही तसेच बेशिस्तपणाची कोणतीही वर्तणूक करणार नाही की ज्यामुळे माझ्यावर या नियमातील शिस्तीविषयक शिक्षा होईल.

२१.९ मी वर हमी दिल्याप्रमाणे संस्था/शासन / SCVT/ NCVT यांनी ठरवून दिलेली शिस्त व वर्तणूक बाबतच्या नियमांचे माझ्याकडून उल्लंघन झाल्यास संस्थेच्या प्राचार्यांना मला संस्थेतून निलंबित करण्याचे पूर्ण अधिकार राहतील.

२१.१० प्रत्येक सत्रासाठी सैध्दांतिक व प्रात्यक्षिक परीक्षेसाठी सैध्दांतिक व प्रात्याक्षिक वर्गामध्ये ८० टक्के पेक्षा कमी उपस्थिती असल्यास मला परीक्षेस बसू दिले जाणार नाही या अटीची मला पूर्णपणे जाणीव आहे.

२१.११ NCVT/SCVT यांनी नेमून दिलेल्या विहीत वेळेत गृहपाठ, जॉब, जर्नल्स, चित्रकला इ. सादरीकरण समाधानकारकरित्या करण्यास असमर्थ ठरल्यास परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणारी नाही याची मला पूर्ण जाणीव आहे.

२२.० **प्रशिक्षणार्थ्याची बदली:**

२२.१ संपूर्ण प्रवेश प्रक्रीयेनंतर एखादया व्यवसायात/ तुकडीत ५०% पेक्षा कमी प्रवेश झाल्यास प्रवेशित उमेदवारास त्याच औ.प्र.संस्थेत दुसऱ्या व्यवसाय/अभ्यासक्रमात किंवा इतर औ.प्र.संस्थेत त्याच व्यवसाय अभ्यासक्रमात बदली करुन दिली जाईल. अशी औ.प्र.संस्था प्रथमत: त्याच जिल्ह्यात, त्याच विभागात, त्याच विभागाच्या जवळपासच्या विभागात असली पाहिजे. अशा बदलीकरिता उमेदवाराचे प्राधान्य विचारात घेतले जाईल. अशा प्रकारची बदली शासकीय औ.प्र.संस्थांवर बंधनकारक व खाजगी औ.प्र.संस्थाना ऐच्छिक राहील.

२२.२ प्रथम वर्ष परीक्षेपूर्वी वर उल्लेखिलेल्या नियम २२.१ व्यतिरिक्त बदलीसाठी परवानगी दिली जाणार नाही.

२२.३ उमेदवारास विशिष्ट परिस्थितीत स्पष्ट कारणासहीत बदली हवी असल्यास सक्षम अधिकाऱ्याकडे मागील वर्षाच्या गुणपत्रकासह प्रवेशित औ.प्र.संस्थेचे व बदली करुन घ्यावयाच्या औ.प.संस्थेच्या ना-हरकत प्रमाणपत्र सहीत विनंती अर्ज सादर करावा लागेल.

२२.४ प्रशिक्षणार्थी पूर्वीच्या परीक्षेसाठी बसला व सर्व विषयात उत्तीर्ण झालेला असेल तोच प्रशिक्षणार्थी बदलीकरिता अर्ज करण्यासाठी पात्र असेल.

२२.५ बदलीसाठी मर्यादित जागांकरिता जास्तीचे अर्ज आल्यास सक्षम प्राधिकारी बदलीकरिता दिलेल्या कारणांची तीव्रता पडताळून प्रवेश प्रक्रीयेवेळी उमेदवारांच्या गुणानुक्रमांकानुसार प्राधान्याने ( नियम क्र.९.१.३.१ ) अन्वये प्रवेश देण्याचे ठरवेल.

## प्रपत्र - १
## व्यवसाय तपशीलाची यादी आणि पात्रता

| अ. क्र. | व्यवसायाचे नाव | व्यवसायाचा प्रकार | संलग्नतेचे प्राधिकरण | कालावधी | किमान वयो मर्यादा | प्रवेशासाठी पात्रता | पात्रता परीक्षेतील बंधनकारक विषय | तुकडीनिहाय प्रवेशक्षमता (सुपरन्युमरीसह) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वास्तुशास्त्र सहाय्यक (Architectural Assistant) | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | NCVT | १ वर्ष | १४ | एस.एस.सी. उत्तीर्ण | विज्ञान आणि गणित कमीत कमी प्रत्येकी ४०% सह | २६ |
| २ | अटेन्डंन्ट ऑपरेटर केमिकल प्लान्ट (Attendant Operator Chemical Plant) | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | NCVT | २ वर्षे | १४ | एस.एस.सी. उत्तीर्ण | विज्ञान आणि गणित | २१ |
| ३ | बेकरी ॲण्ड कन्फेक्शनर (Baker & Confectioner) | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | NCVT | १ वर्ष | १४ | एस.एस.सी. उत्तीर्ण | लागू नाही | २६ |
| ४ | बेसिक कॉस्मॉटोलॉजी (Basic Cosmetology (Old Name – Hair & Skin Care)) | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | NCVT | १ वर्ष | १४ | एस.एस.सी. उत्तीर्ण | लागू नाही | २६ |
| ५ | सुतारकाम (Carpenter) | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | NCVT | १ वर्ष | १४ | एस.एस.सी. उत्तीर्ण /अनुत्तीर्ण | लागू नाही | २६ |
| ६ | कॉम्पुटर हार्डवेअर ॲण्ड नेटवर्क मेन्टेनन्स (Computer Hardware & Network Maintenance) | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | NCVT | १ वर्ष | १४ | एस.एस.सी. उत्तीर्ण | विज्ञान आणि गणित | २६ |
| ७ | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रॅमिंग असिस्टंट (Computer Operator and Programming Assistant) | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | NCVT | १ वर्ष | १४ | एस.एस.सी. उत्तीर्ण | लागू नाही | २६ |
| ८ | सुईंग टेक्नोलॉजी (पूर्वीचे नाव – कटिंग ॲण्ड सुईंग) (Sewing Technology (Old Name- Cutting & Sewing)) | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | NCVT | १ वर्ष | १४ | एस.एस.सी. उत्तीर्ण /अनुत्तीर्ण | लागू नाही | २१ |
| ९ | डेंटल लॅबोरेटरी टेक्निशियन (Dental Laboratory Technician) | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | NCVT | २ वर्षे | १४ | एस.एस.सी. उत्तीर्ण | लागू नाही | २१ |
| १० | डेस्कटॉप पब्लिशिंग ऑपरेटर (Desktop Publishing Operator) | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | NCVT | १ वर्ष | १४ | एस.एस.सी. उत्तीर्ण | लागू नाही | २६ |
| ११ | डिजिटल फोटोग्राफर (Digital Photographer) | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | NCVT | १ वर्ष | १४ | एस.एस.सी. उत्तीर्ण | लागू नाही | २१ |
| १२ | ड्राफ्समन सिव्हिल (Draughtsman Civil) | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | NCVT | २ वर्षे | १४ | एस.एस.सी. उत्तीर्ण | विज्ञान आणि गणित | २६ |
| १३ | ड्राफ्समन मेकॅनिकल (Draughtsman Mechanical) | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | NCVT | २ वर्षे | १४ | एस.एस.सी. उत्तीर्ण | विज्ञान आणि गणित | २१ |
| १४ | ड्रेस मेकिंग (Dress Making) | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | NCVT | १ वर्ष | १४ | एस.एस.सी. उत्तीर्ण | लागू नाही | २१ |

| अ. क्र. | व्यवसायाचे नाव | व्यवसायाचा प्रकार | संलग्नतेचे प्राधिकरण | कालावधी | किमान वयो मर्यादा | प्रवेशासाठी पात्रता | पात्रता परीक्षेतील बंधनकारक विषय | तुकडीनिहाय प्रवेशक्षमता (सुपरन्युमरीसह) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | विजतंत्री (Electrician) | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | NCVT | २ वर्षे | १४ | एस.एस.सी. उत्तीर्ण | विज्ञान आणि गणित | २१ |
१.२३.१० इयत्ता १० वी (SSC) अनुत्तीर्ण उमेदवार फक्त त्याच व्यवसायात अर्ज करण्यासाठी पात्र असतील ज्या व्यवसायासाठी प्रवेशाची अर्हता १० वी उत्तीर्ण / अनुत्तीर्ण असेल.

१.२३.११ राष्ट्रीय मुक्त शाळा/ अंधशाळा/ अपंग शाळेतील उमेदवार फक्त बिगर अभियांत्रिकी व्यवसायात अर्ज करण्यासाठी पात्र असतील.

१.२३.१२ जर उमेदवाराने वरील विषयातील यादीतील कोणत्याही विषयाची परिक्षा दिली नसेल तर अशा उमेदवाराने "कमाल गुण " व "प्राप्त गुण" या दोन्ही रकान्यात "० (शून्य)" असे नमूद करावे.

१.२३.१३ उमेदवाराने सादर केलेल्या माहितीच्या आधारे तो ज्या गुणाधिक्यासाठी पात्र होत आहे या बाबत **“Additional Weightage (अतिरिक्त गुणाधिक्य)”** या तकत्यात माहिती दर्शविण्यात येईल. सदर अतिरिक्त गुणांची महत्तम मर्यादा ५० एवढी असेल व हे गुणाधिक्य उमेदवाराच्या एकूण प्राप्त गुणांमध्ये मिळविले जाईल व त्यानुसार एकूण टक्केवारीची गणना करण्यात येईल.

ADDITIONAL WEIGHTAGE

| | |
|---|---|
| Passing intermediate drawing examination | 0 |
| Participation in extra curricular activities | 0 |
| Participation in sports | 25 |
| Bolster school candidate | 0 |
| Orphanage candidate | 0 |
| School in rural area | 0 |
| Total additional weightage | 25 |
| Applicable additional weightage (Maximum Ceiling = 50 Marks) | 25 |
| Total marks and weightage | 578 |

१.२३.१४ प्राप्त गुण अधिक गुणाधिक्य व कमाल गुण या आधारे एकूण टक्केवारीची गणना करण्यात येईल. याच टक्केवारी नुसार उमेदवारास गुणवत्ता क्रमांक बहाल करण्यात येईल.




१.२३.१५ मागील पानावरील माहिती दुरुस्त (Edit) करण्यासाठी "**Previous Page**" या Tab वर क्लिक करावे किंवा या पानावरील माहिती सुरक्षित (Save) करुन पुढील पानावर जाण्यासाठी "**Next Page**" या Tab वर क्लिक करावे

## १.२४ Step 6 – Previous ITI Details:

उमेदवाराने यापूर्वी जर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेतला असल्यास खालील विभागात माहिती सादर करण्यासाठी "**Yes**" पर्याय निवडून पुढील माहिती सादर करावी अन्यथा "**No**" पर्याय निवडावा. मागील पानावरील माहिती दुरुस्त (Edit) करण्यासाठी "**Previous Page**" या Tab वर क्लिक करावे किंवा या पानावरील माहिती सुरक्षित (Save) करुन पुढील पानावर जाण्यासाठी "**Next Page**" या Tab वर क्लिक करावे.




## १.२५ Step 7 – Undertaking by Candidate (उमेदवाराव्दारे हमी):

१.२५.१ उमेदवाराने यापूर्वी सादर केलेल्या माहितीच्या आधारे त्याला मूळ तालुका निवडीसाठी पर्याय खालील रकान्यात उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवाराने उपलब्ध मूळ तालुक्याच्या पर्यायामधून १ मूळ तालुका निवडणे आवश्यक आहे. माहितीपुस्तिका भाग १ मधील मुद्दा क्र. ३.१ चे अवलोकन करावे.




१.२५.२ तालुक्यामधील औ.प्र.संस्थेत प्रवेशासाठी केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेकरिता उपलब्ध जागांच्या ७०% जागा हया त्या उमेदवारांसाठी राखीव असतील ज्या उमेदवारांनी तो तालुका आपला मूळ तालुका घोषित केला आहे. माहितीपुस्तिका भाग १ मधील मुद्दा क्र.१.५ चे अवलोकन करावे.

१.२५.३ उमेदवाराने हमी पत्रावरील सर्व सूचनांचे वाचन करावे व सर्व सूचना मान्य असल्यावर “Accept (स्वीकार करा)” क्लिक करावे.



1. I have read all the rules of admission and on understanding these rules. I have filled this application.
(मी प्रवेशाने सर्व नियम वाचले आहेत आणि हे नियम मला समजलेले असून मी हा अर्ज भरता आहे)

2. The information given by me in this application is true to the best of my knowledge and belief.
(या अर्जात माझ्याकडून देण्यात आलेली माहिती माझ्या ज्ञान आणि श्रद्धेनुसार सत्य आहे)

3. At a later stage, if it is found that I have furnished wrong information or submitted false certificate, I am aware that my admission stands cancelled and fees paid by me will be fortified. I will be subjected to legal and/ or penal action as per provision of the law.
(नंतरच्या टप्प्यात जर असे आढळून आले की मी चुकीची माहिती किंवा खोटे प्रमाणपत्र सादर केले आहे, तर मला याची जाणीव आहे की माझा प्रवेश रद्द होईल आणि मी भरलेली फी शासन जमा होईल. कायद्यान्वा तरतूदीनुसार मी कायदेशीर आणि/ किंवा दंडात्मक कारवाईस पात्र राहीन.)

Accept (स्वीकार करा)

Previous Page | Next Page

१.२५.४ मागील पानावरील माहिती दुरुस्त (Edit) करण्यासाठी "**Previous Page**" या Tab वर क्लिक करावे किंवा या पानावरील माहिती सुरक्षित (Save) करुन पुढील पानावर जाण्यासाठी "**Next Page**" या Tab वर क्लिक करावे.

**१.२६ Step 8 – Instructions for Candidate (उमेदवारांसाठी सूचना):**

१.२६.१ उमेदवारांनी संपूर्ण सूचनांचे वाचन करावे.



CANDIDATE INSTRUCTIONS (उमेदवारांना सूचना)

Dear 201706A100118 .YOGESH you have completed application form for ITI Admission.

प्रिय 201706A100118 .YOGESH आपण औ.प्र.संस्थेच्या प्रवेशासाठी अर्जाचा फॉर्म पूर्ण केला आहे.

Your application is provisionally accepted.
आपला अर्ज तात्पुरता स्वीकारला आहे.

1. To CONFIRM your "APPLICATION FORM FOR ITI ADMISSION 2017"
आपला " औ.प्र.संस्था प्रवेश 2017 चा अर्ज" निश्चित करण्यासाठी

- Print Application Form and verify that all information is correct and complete.
अर्ज मुद्रित करा आणि सर्व माहिती योग्य आणि पूर्ण असल्याची खात्री करा

१.२७ उमेदवारास आपला अर्ज दुरुस्त (Edit) करावयाचा असल्यास "**Previous Page**" या Tab वर क्लिक करावे. प्रवेश अर्जाची छापील प्रत (**Print out**) घेण्यासाठी "**Generate PDF & Save**" या Tab वर क्लिक करावे.



6. Note: If the candidate does not already have an Aadhaar number, the candidate is requested to apply for Aadhaar, to be able to provide the same during admissions.
सूचना: जर प्रवेशादरम्यान उमेदवाराजवळ आधार क्रमांक उपलब्ध नसेल तर उमेदवारांस विनंती करण्यांत येते की, आधार क्रमांकाकरीता अर्ज सादर करण्यांत यावा व सदर अर्ज प्रवेशादरम्यान सादर करण्यांत यावा

Previous Page | Generate PDF & Save

१.२८ प्रवेश अर्जाची छापील प्रत खालील प्रमाणे तयार होईल.



**Directorate of Vocational Education and Training, Maharashtra State**
3, Mahapalika Marg, Post Box No. 10036, Mumbai 400 001,
www.admission.dvet.gov.in, Email: itiadmission@dvet.maharashtra.gov.in;
Phone No.: 022 – 22620603/4, Fax No.: 022 – 22659235

**PROVISIONAL APPLICATION FORM : ITI ADMISSION 2017**

**CANDIDATE PROFILE DETAILS**

| | | | |
|---|---|---|---|
| REGISTRATION NUMBER: | 201706A100118 | LAST NAME/ SURNAME: | PATIL |
| FIRST NAME : | YOGESH | MOTHER NAME: | SUREKHA |
| FATHER/ HUSBAND NAME: | SURESH | DATE OF BIRTH: | 02-Mar-1978 |
| GENDER: | Male | NATIONALITY: | Indian |
| CASTE CATEGORY: | OBC | RELIGION: | Hindu |
| BELONG TO NON CREAMY LAYER : | Yes | CASTE: | Kunabi |
| MOTHER TONGUE: | Marathi | E-MAIL ID: | patil_y_s2003@yahoo.com |

१.२९ प्रवेशअर्ज पूर्ण भरल्यानंतर वरील अर्ज तात्पुरत्या स्वरुपात स्विकारलेला आहे त्यामुळे सदर अर्जावर “Provisional Application Form” असे नमूद असेल.

१.३० सदर तात्पुरता प्रवेश अर्ज निश्चित (Confirm) केल्यावरच उमेदवार प्रवेश प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात. अनिश्चित प्रवेश अर्जांचा विचार प्रवेश प्रक्रियेसाठी करण्यात येणार नाही.

१.३१ प्रवेश अर्ज निश्चित (Confirm) करण्याआगोदर उमेदवार प्रवेश अर्ज दुरुस्त (Edit) करू शकतात तथापि निश्चित (Confirm) केलेल्या प्रवेश अर्जात हरकती नोंदविण्यासाठी (Grievance Redressal Round) देण्यात आलेल्या मुदतीतच विहीत पध्दतीव्दारे दुरुस्ती (Edit) करता येतील. हरकती नोंदविण्यासाठी खाली दिलेल्या प्रमाणित कार्यपध्दती नुसार कार्यवाही करावी.

१.३२ तात्पुरता प्रवेश अर्ज निश्चित (Confirm) करण्यासाठी:

१.३२.१ प्रवेश अर्जाची छापील प्रत घेऊन त्यामधील सर्व माहिती योग्य आणि पूर्ण भरलेली असल्याची खात्री करावी.

१.३२.२ उमेदवाराने प्रवेश अर्जाची छापील प्रत तसेच माहितीपुस्तिका भाग १ मधील प्रपत्र - ३ प्रमाणे सर्व आवश्यक मूळ कागदपत्रे नजीकच्या शासकीय किंवा खाजगी औ. प्र. संस्थेत सादर करावीत.

१.३२.३ उमेदवारांने माहितीपुस्तिका भाग १ मधील प्रपत्र - ३ प्रमाणे आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या स्वयंसत्यापित (Self-Attested) छायांकीत प्रती सादर कराव्यात आणि माहितीपुस्तिका भाग १ मधील मुद्दा क्र. १३.२.१५ प्रमाणे आवश्यक असलेले प्रवेश अर्ज शुल्क रोख भरावे.

१.३२.४ अर्ज स्विकृती केद्रांवर अर्ज निश्चितीसाठी व अर्जातील दाव्याच्या पुष्ठ्यर्थ उमेदवारांने सादर केलेल्या कागदपत्राच्या मूळ प्रतीवरुन ऑनलाईन भरलेल्या प्रवेश अर्जाची प्रिंट आऊट तपासून आणि छाननी करुन प्रवेश प्रक्रीया प्रमुखाने अर्ज निश्चित केल्याबाबतची उमेदवारास खालीलप्रमाणे पोहच – पावती “**Receipt-cum-Acknowledgement**” देतील.




१.३२.५ सदर पोहच-पावती “**Receipt-cum-Acknowledgement**” दोन भागात तयार होत असून “**Candidate Copy**” वर विहीत जागेत औ.प्र.संस्थेतील प्रवेश अर्ज निश्चित करणारे अधिकारी नाव, स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का देवून प्रत उमेदवारास देतील आणि दुसरा भाग “**ITI Copy** ” संस्थेत ठेवून घेतील.

१.३२.६ याच सोबत निश्चित प्रवेश अर्जाची प्रत (Confirmed Application Form : ITI Admission 2017) उमेदवारास देण्यात येईल



Directorate of Vocational Education and Training, Maharashtra State

CONFIRMED APPLICATION FORM : ITI ADMISSION 2017

CANDIDATE PROFILE DETAILS

| | | | |
|---|---|---|---|
| REGISTRATION NUMBER | 201706A100118 | | |
| FIRST NAME | YOGESH | LAST NAME/ SURNAME | PATIL |
| FATHER/ HUSBAND NAME | SURESH | MOTHER NAME | SUREKHA |
| GENDER | Male | DATE OF BIRTH | 02-Mar-1978 |
| NATIONALITY | Indian | MOTHER TONGUE | Marathi |
| RELIGION | Hindu | CASTE CATEGORY | OBC |
| CASTE | Kunabi | NON CREAMY LAYER | Yes |
| PRIMARY MOBILE NUMBER | 8088548427 | SECONDARY MOBILE NUMBER | 9422774719 |

१.३३ उमेदवाराने फक्त एकच ऑनलाइन प्रवेश अर्ज भरून निश्चित करावा. हा अर्ज केंद्रीय प्रवेश प्रक्रियेअंतर्गत शासकीय आणि खाजगी आय.टी.आय. मधील उपलब्ध जागा व खाजगी आय.टी.आय. मध्ये संस्थास्तरावरील जागांसाठी ग्राह्य धरण्यात येईल.

१.३४ उमेदवारांने एकापेक्षा अधिक अर्ज भरल्यास/ निश्चित केल्यास त्यास नक्कल अर्ज समजण्यात येईल आणि असे अर्ज उमेदवाराशी कुठल्याही प्रकारे संपर्क न साधता रद्द करण्यात येतील व अशा उमेदवारांना केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेमध्ये प्रवेश घेण्यास प्रतिबंध करण्यात येईल.

१.३५ संपूर्ण प्रवेश प्रक्रियेबाबत उमेदवारांना वेळोवेळी SMS व्दारे कळविण्यात येईल तथापि उमेदवारांनी आपला अद्ययावत भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile Number) ऑनलाइन प्रवेश अर्जात "**Primary Mobile Number**" म्हणून नोंदविणे आवश्यक आहे तसेच सदर भ्रमणध्वनी क्रमांक प्रवेश प्रक्रिये दरम्यान बदलू नये.

१.३६ प्रवेशअर्ज करतानाच उमेदवारांनी प्रथम प्रवेश फेरीसाठी औ.प्र.संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करणे आवश्यक आहे. यासाठी प्रवेशाच्या वेळापत्रकाचे काळजीपूर्वक अवलोकन करावे. सदर विकल्प व प्राधान्य प्रवेशअर्ज निश्चित केल्यानंतरच सादर करता येतील. तसेच प्रवेश फेरी क्र. दुसरी, तिसरी व चौथी साठी प्रवेश वेळापत्रकानुसार विहीत मुदतीत उमेदवार विकल्प व प्राधान्य सादर करु शकतात. यासाठी **विकल्प व प्राधान्य सादर करण्याची प्रमाणित कार्यपध्दती** अभ्यासावी.

१.३७ खाजगी औ.प्र.संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागा (माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. १.४ प्रमाणे एकूण प्रवेश क्षमतेच्या व्यवसाय निहाय २०% जागा) व पाचव्या प्रवेश फेरीनंतर (जिल्हास्तरीय समुपदेशन फेरी) खाजगी औ.प्र. संस्थांमध्ये रिक्त राहिलेल्या जागा संबंधित खाजगी औ.प्र.संस्थांना संस्थास्तरावर भरण्यासाठी उपलब्ध आहेत. खाजगी औ.प्र.संस्थाना संस्थास्तरावर भरण्यासाठी उपलब्ध जागांचा तपशील प्रवेश संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ज्या उमेदवारांची खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये संस्था स्तरावरील जागांवर प्रवेश घेण्याची इच्छा आहे त्यांनाही प्रवेश संकेत स्थळावर नोंदणी (Registration) करावी लागेल. नोंदणीकृत उमेदवारांनी ज्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घ्यावावयाचा आहे त्या संस्थेत व्यक्तीश: हजर राहून सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर प्रवेश प्रक्रीया पूर्ण करावी. केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पहिल्या फेरीपासून ते प्रवेशाच्या अंतिम दिनांकापर्यंत खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये संस्था स्तरावरील जागांवर उमेदवारांना प्रवेश घेता येतील.

१.३८ **कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन प्रवेश प्रणाली व्यतिरिक्त प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांचे प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाहीत याची सर्व उमेदवार, पालक व औ.प्र.संस्थांनी नोंद घ्यावी.**

## २.० औ.प्र.संस्थेतील प्रवेशासाठी औ.प्र. संस्थानिहाय व व्यवसाय निहाय विकल्प व प्राधान्य सादर करण्यांच्या कार्यवाहीसाठी प्रमाणित कार्यपध्दती

२.१ उमेदवाराने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज पूर्ण भरल्यानंतर सदर प्रवेश अर्जाची छापील प्रत घ्यावी. सदर प्रवेशअर्ज नजीकच्या औ.प्र.संस्थांमध्ये आवश्यक त्या कागदपत्रांच्या पडताळणीअंती प्रवेशअर्ज शुल्क भरुन वरील प्रमाणे प्रवेश अर्ज निश्चित करावा. प्रवेश अर्ज निश्चित केल्यानंतर उमेदवारांनी प्रथम प्रवेश फेरीसाठी औ.प्र.संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करणे आवश्यक आहे. यासाठी प्रवेश वेळापत्रकाचे काळजीपुर्वक अवलोकन करावे. सदर विकल्प व प्राधान्य प्रवेशअर्ज निश्चित करण्यापूर्वी अथवा प्रवेश अर्ज निश्चित केल्यानंतर सादर करता येतील. तथापि, प्रवेशअर्ज करण्याच्या अंतिम मुदतीनंतर प्रथम प्रवेश फेरीसाठी विकल्प व प्राधान्य सादर करता येणार नाहीत.

२.२ प्रवेश संकेतस्थळाच्या Home Page वर प्रादेशिक कार्यालयनिहाय प्रवेशासाठी पात्र असणाऱ्या शासकीय व खाजगी औ.प्र.संस्थांची प्राथमिक तसेच प्रवेशासाठी उपलब्ध व्यवसाय व जागांची माहिती प्रकाशित करण्यात आलेली आहे. तसेच उमेदवार "Search ITI and Trade" व्दारे देखिल औ.प्र.संस्था व/वा व्यवसाय शोधू शकतात. आवश्यक असल्यास उमेदवारांनी त्याची प्रिंट आऊट घ्यावी. तसेच सदर जिल्हानिहाय औ.प्र.संस्थांची माहिती आपल्या नजीकच्या औ.प्र.संस्थांतील सूचनाफलकावर देखील उपलब्ध आहेत.

२.३ उमेदवारांनी प्रवेश फेरीसाठी विकल्प व प्राधान्य सादर करताना औ.प्र.संस्था व उपलब्ध व्यवसायनिहाय जागांची सखोल माहिती करुन घ्यावी.

२.४ माहितीपुस्तिकेतील प्रपत्र १ प्रमाणे देण्यात आलेल्या व्यवसाय तपशीलाची यादी आणि पात्रता याचे अवलोकन करुन उमेदवाराने व्यवसायनिहाय विकल्प व प्राधान्य सादर करावेत.

२.५ ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर केल्यानंतर उमेदवारांना प्राप्त झालेला नोदणीक्रमांक (Registration Number) व Password चा वापर करुन प्रवेश संकेतस्थळावर Login करावे. अर्ज निश्चित केलेल्या नोंदणीकृत उमेदवारांनाच प्रथम व तद्नंतरच्या प्रवेशफेऱ्यांसाठी विकल्प व प्राधान्य सादर करता येतील.

२.६ विकल्प व प्राधान्य सादर करण्यासाठी "**Admission Activities**" या मथळयाखाली देण्यात आलेल्या "**Submit/ Change Options/ Preferences**" या Link वर क्लिक करावे.



२.७ खालील प्रमाणे वेब पेज प्रकट होईल




२.८ **Step 1— Option Selection (पर्याय निवड):**

२.८.१ उमेदवार औद्योगिक प्रशिक्षण संस्थानिहाय अथवा व्यवसायनिहाय आपल्या विकल्पांची निवड करु शकतात. यासाठी त्यांनी **Institute Wise (संस्थानिहाय)** अथवा **Trade Wise (व्यवसायनिहाय)** या दोन पर्यायांपैकी एकाची निवड करावी.

२.८.२ **Institute Wise (संस्थानिहाय)** चा पर्याय निवडल्यास उमेदवारास संस्थेचा प्रकार, जिल्हा व तालुका निवडणे आवश्यक आहे. सदर निवड केल्यानंतर “**Search**” या Tab वर क्लिक करावे.




२.८.३ **निवड निकषांच्या आधारे व संबंधित उमेदवाराच्या अर्हतेप्रमाणे** औ.प्र.संस्थेतील या वर्षी प्रवेशासाठी उपलब्ध सर्व व्यवसायांची यादी वरील प्रमाणे प्रकट होईल. उमेदवाराच्या पसंतीनुसार त्याने व्यवसायांची निवडीसाठी “**Add to Preference List**” या Tab वर क्लिक करावे. निवड केलेल्या विकल्पासमोरील “**Add to Preference List**” हा Tab “**Added to Preference List**” असा बदलेल व निवड केलेला विकल्प **Step 2 Preference Selection (पर्याय निवड)** ह्यात समाविष्ट होईल व त्याच्या **Counter** मध्ये त्या प्रमाणात वाढ होईल

**विकल्प निवडण्या आगोदर**



**विकल्प निवडल्या नंतर**




२.८.४ व्यवसाय निहाय पर्याय निवडीसाठी “**Trade wise**” पर्याय निवडुन त्याप्रमाणे प्रवेश घेण्यांस इच्छुक असलेला संस्थेचा प्रकार, जिल्हा, तालुका व व्यवसाय पर्याय निवडावा. निवड केलेला व्यवसाय त्या तालुक्यातील जेवढया औ.प्र.संस्थांमध्ये यावर्षी प्रवेशास उपलब्ध आहे त्याची यादी खालीलप्रमाणे प्रकट होईल. उमेदवाराच्या पसंतीनुसार विकल्पा समोर “**Add to Preference List**” या Tab वर क्लिक करावे.




२.८.५ उमेदवारास आवश्यकता भासल्यास त्याने निवड केलेला विकल्प रद्द (Remove) करण्यासाठी पुन:श्च “**Added to Preference List**” वर क्लिक करावे

## २.९ Step 2 Preference Selection (पर्याय निवड):

२.९.१ उमेदवारांनी निवड केलेले सर्व विकल्प ह्यात समाविष्ट होतात व त्याच्या **Counter** मध्ये निवड केलेल्या विकल्पांची संख्या दर्शविण्यात येते.

२.९.२ निवड केलेले सर्व विकल्प यात निवड केल्याच्या क्रमाने खालील प्रमाणे दर्शविण्यात येतात.



२.९.३ निवड केलेल्या व दर्शविण्यात आलेला प्राधान्य क्रम बदलण्यासाठी त्या पर्यायावर Mouse ची डावी की दाबुन विकल्प वर/ खाली करावेत (Drag and Drop).

२.९.४ विकल्पाच्या Table मधील स्थानानुसार त्यास प्राधान्य क्रम देण्यात येईल.

२.९.५ निवड केलेला विकल्प यादी मधुन काढावयाचा असल्यास त्या विकल्पा समोर च्या 🗑 वर क्लिक करावे.

२.१० उमेदवार **महत्तम १००** विकल्प व प्राधान्य निवडु शकतात.

२.११ पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (PPP) अंतर्गत राज्यात असलेल्या २५० औ.प्र.संस्थांमधील ठराविक अभ्यासक्रमातील २०% जागा या माहिती पुस्तिका भाग १ मध्ये दिलेले "**विशेष प्रशिक्षण शुल्क**" आकारुन गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. त्या जागांसाठी इच्छुकांना Online प्रवेश प्रक्रीयेत स्वतंत्र विकल्प (Option) देण्याची मुभा राहणार आहे. उदा. Fitter - IMC, Welder – IMC etc. उमेदवारांनी विकल्प सादर करण्यापूर्वी माहिती पुस्तिका भाग १ मध्ये देण्यात आलेल्या प्रशिक्षण शुल्काबाबत (मुद्दा क्र. १५.१) माहिती वाचावी

२.१२ उमेदवाराने "**Generate and Save Pdf**" या Tab वर क्लिक केल्यास **Option Form** ची प्रिंटआऊट घेवू शकतात.


Directorate of Vocational Education and Training, Maharashtra State

APPLICATION FORM : OPTION FORM

CANDIDATE PROFILE DETAILS

| | | | |
|---|---|---|---|
| REGISTRATION NUMBER | 201706A100118 | | |
| FIRST NAME | YOGESH | LAST NAME/ SURNAME | PATIL |
| FATHER/ HUSBAND NAME | SURESH | MOTHER NAME | SUREKHA |

२.१३ उमेदवार प्रत्येक प्रवेश फेरी अगोदर विहीत मुदतीत आवश्यक वाटल्यास सादर केलेले विकल्प व प्राधान्यक्रमांमध्ये बदल, पर्याय रद्द अथवा नवीन पर्याय नमूद करु शकतात.

२.१४ उमेदवाराने सादर केलेले विकल्प (Option Form) औ.प्र.संस्थेत जावून निश्तिच (Confirmation) करण्याची आवश्यकता नाही.

२.१५ प्रवेश अर्ज करतानाच प्रथम प्रवेश फेरीसाठी विकल्प सादर करणे आवश्यक आहे. तसेच प्रवेश फेरी क्र. दुसरी, तिसरी व चौथी साठी प्रवेश वेळापत्रकानुसार विहीत मुदतीत उमेदवार विकल्प व प्राधान्य सादर करु शकतात.

२.१६ जर उमेदवाराने प्रवेश फेरीत प्रवेश निश्चित केले नसतील व उमेदवार पुढील प्रवेश फेरीसाठी पात्र असल्यास त्याने पुर्वीच्या प्रवेश फेरीसाठी सादर केलेले विकल्प व प्राधान्य पुढील प्रवेश फेरीमध्ये विचारात घेण्यात येतील.

२.१७ पाचवी व सहावी प्रवेश फेरी म्हणजे समुपदेशन फेरीमध्ये उमेदवारांना त्यांच्या गुणवत्तेनुसार बोलाविण्यात येवून त्यांच्या मागणीनुसार व उपलब्धतेनुसार जागा देण्यात येत असल्याकारणाने या दोन्ही प्रवेश फेऱ्यांसाठी Online विकल्प नोंदविण्याची आवश्यकता नाही.

## ३.० प्रवेश अर्ज निश्चित केल्यानंतर अर्ज व/वा प्राथमिक गुणवत्ता यादी बाबत हरकती नोंदविण्यासाठी (Grievance Redressal) अनुसरावयाची प्रमाणित कार्यपध्दती

३.१ प्रवेश अर्ज निश्चित (Confirm) करण्याअगोदर उमेदवार प्रवेश अर्जात आवश्यक तितक्या वेळेस दुरुस्त (Edit) करु शकतात तथापी एकदा प्रवेश अर्ज निश्चित केल्यावर उमेदवार प्रवेश अर्जात कुठलीही दुरुस्ती (Edit) करु शकत नाही

३.२ तथापि निश्चित केलेल्या अर्जात कुठल्याही प्रकारची दुरूस्ती करावयाची असल्यास सदर दुरूस्ती हरकत नोंदविण्याच्या फेरीत (Grievance Redressal Round) खालीप्रमाणे कार्यपध्दती अवलंबवावी.

३.३ उमेदवारास प्रवेश अर्जात कोणत्याही प्रकारची दुरूस्ती करावयाची असल्यास प्रवेश संकेतस्थळाच्या मुखपृष्ठावर (Home Page) "**Grievance Redressal**" या Link वर देण्यात आलेला हरकतीचा अर्ज प्रवेश वेळापत्रकानुसार नजीकच्या औ.प्र.संस्थेत व्यक्तिश: सादर करावा.

३.४ सदर हरकतीचा अर्ज (**Grievance Form**) सर्व औ.प्र.संस्थेमध्ये देखील उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

३.५ हरकतीच्या अर्जात देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करुन उमेदवाराने तक्रार अर्जात फक्त करावयाचे बदल नोंदवावे.

३.६ प्रवेश अर्जात जी माहिती उमेदवाराने बरोबर नोंदविली आहे व त्यात उमेदवार बदल करु इच्छित नसेल अशी माहिती हरकतीच्या अर्जात पुन:श्च नमूद करु नये.

३.७ हरकतीच्या अर्जाबरोबर मूळ प्रवेश अर्जात करावयाच्या बदलांच्या पुष्ठ्यर्थ आवश्यक ते कागदपत्रे / दस्तऐजव औ.प्र.संस्थेत सादर करतील.

३.८ उमेदवाराने हरकतीचा अर्ज सादर केलेली ओ.प्र.संस्था सदर हरकतीचा अर्ज, उमेदवाराचा मूळ अर्ज व मूळ प्रवेश अर्जात करावयाच्या बदलांच्या पुष्ठ्यर्थ आवश्यक ते कागदपत्रे / दस्तऐजव तपासतील व औ.प्र.संस्थांना देण्यात आलेल्या ITI Login मधून उमेदवाराच्या प्रवेश अर्जात उमेदवारासमक्ष आवश्यक तेथे बदल करतील.

३.९ तथापि उमेदवाराने मूळ अर्जात उमेदवार मागासवर्गीय असल्याचा दावा केला असल्यास व त्याप्रमाणे मागासवर्गीय उमेदवारांना लागू असलेले प्रवेश अर्ज शुल्क भरले असेल व सद्यस्थितीत उमेदवार तक्रार अर्जात अराखीव उमेदवार असा बदल करत असल्यास उमेदवारास अराखीव उमेदवारासाठी राखीव असलेले प्रवेश अर्ज शुल्कातील वाढीव प्रवेश अर्ज शुल्क भरणे (Difference Application Form Fee) क्रमप्राप्त राहील.

३.१० उमेदवाराच्या प्रवेश अर्जात यानुसार बदल केल्यामुळे उमेदवाराचा मूळ तालुका (Home Taluka) बदलत असल्यास उमेदवाराने उपलब्ध मूळ तालुक्याच्या पर्यायापैकी एका मूळ तालुक्याची निवड करावी.

३.११ अशा प्रकारे हरकती नोंदविण्याच्या फेरीत मूळ प्रवेश अर्जात केलेल्या बदलांसाठी पुन:श्च प्रवेश अर्ज निश्चित करणे (Confirmation) वा प्रवेश अर्ज शुल्क भरणे आवश्यक नाही.

३.१२ औ.प्र.संस्था हरकती नोंदविण्याच्या फेरीत उमेदवाराच्या अर्जात केलेल्या बदलानंतर प्रवेश अर्जाची छापील प्रत (Printout) उमेदवारांना नि:शुल्क उपलब्ध करुन देईल.

## ४.० नोंदणीकृत व अर्ज निश्चित केलेल्या उमेदवारांसाठी गुणवत्ता क्रमांक व प्रवेशस्थिती तपासण्यासाठी प्रमाणित कार्यपध्दती

४.१ नोंदणीकृत उमेदवाराने आपला नोंदणी क्रमांक व पासवर्ड वापरुन आपल्या प्रवेश खात्यात (Admission Account) प्रवेश (Login) करावा.

४.२ "Admission Activities" या मथळयाखाली "**Application, Merit and Admission Status**" या link वर क्लिक करावे.

४.३ उमेदवाराचा गुणवत्ता क्रमांक, प्रवेश निश्चित केलेली औ.प्र.संस्था व व्यवसाय, प्रत्येक फेरीत उमेदवारास Allot केलेले व्यवसायनिहाय औ.प्र.संस्था व प्राधान्यक्रम, इ. प्रवेशप्रक्रीयेसंबंधी उमेदवाराची सर्व इत्यंभूत माहिती प्रकट होईल.

४.४ उमेदवारास प्रवेश प्रक्रीयेसाठी खालीलप्रमाणे गुणवत्ता क्रम देण्यात येतात:

४.४.१ राज्यस्तरीय सर्वसाधारण गुणवत्ताक्रमांक

४.४.२ राज्यस्तरीय प्रवर्गांतर्गत गुणवत्ता क्रमांक ( लागू असल्याप्रमाणे )

४.४.३ मूळ तालुका सर्वसाधारण गुणानुक्रमांक

४.४.४ मूळ तालुका प्रवर्गांतर्गत गुणानुक्रमांक (लागू असेल त्याप्रमाणे )

माहितीपुस्तिका भाग १ मधील मुद्दा क्र. ९.० चे अवलोकन करावे.

४.५ "**Print Status Report**" या Tab वर क्लिक करुन उमेदवार वरील सर्व माहितीची छापील प्रत (Printout) घेवू शकतात.

## ५.० प्रवेश फेरीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांसाठी Online निवडपत्र (Allotment Letter) प्राप्त करण्याची प्रमाणित कार्यपध्दती

५.१ प्रवेश फेरीमध्ये उपलब्ध जागा, उमेदवाराने सादर केलेले विकल्प व प्राधान्यक्रमानुसार आणि माहितीपुस्तिका भाग १ मधील मुद्दा क्र. ११.० - जागा वाटपाची तर्क पध्दती याप्रमाणे उमेदवाराची निवड झाल्यास उमेदवाराने प्रवेश अर्जात "**Primary Mobile Number**" म्हणून नोंदविलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर (Mobile Number) एसएमएस (SMS) व्दारे कळविण्यात येईल.

५.२ तसेच प्रवेश फेरीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांसाठी Online निवडपत्र (Allotment Letter) उमेदवारांच्या प्रवेश खात्यात (Admission Account) उपलब्ध करुन देण्यात येईल.

५.३ औ.प्र.संस्थानिहाय व्यवसायांमध्ये निवड झालेल्या उमेदवारांची यादी औ.प्र.संस्थांच्या Login मध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच सर्व औ.प्र.संस्था आपल्या सूचनाफलकावर त्या औ.प्र.संस्थेत व्यवसायनिहाय निवड झालेल्या उमेदवारांची यादी प्रदर्शित करतील.

५.४ उमेदवारास Online निवडपत्र (Allotment Letter) नजीकच्या औ.प्र.संस्थांमधून देखील प्राप्त करुन घेता येईल.

५.५ Online निवडपत्र (Allotment Letter) प्राप्त करण्यासाठी नोंदणीकृत उमेदवाराने आपला नोंदणी क्रमांक व पासवर्ड वापरुन आपल्या प्रवेश खात्यात (Admission Account) प्रवेश (Login) करावा.

५.६ प्रवेश खात्यात (Admission Account) "**Admission Activities**" या मथळयाखाली "**Allotment Letter**" या Link वर क्लिक करुन निवड पत्र (Allotment Letter) प्राप्त करुन घेणे.

५.७ उमेदवाराने "**Print Allotment Letter**" या Tab वर क्लिक करुन आपल्या निवडपत्राची (Allotment Letter) छापील प्रत प्राप्त करुन घ्यावी.

५.८ उमेदवाराने निवडपत्र (Allotment Letter) वर देण्यात आलेल्या सर्व सूचनांचे अवलोकन करावे.

५.९ उमेदवाराने प्रवेश फेरीत निवड झालेल्या औ.प्र.संस्थेत प्रवेश वेळापत्रकानुसार व्यक्तिश: उपस्थित राहून प्रवेश निश्चिती करण्यांची कार्यवाही करावी. अधिक माहितीसाठी प्रवेशनिश्चिती करण्याच्या प्रमाणित कार्यपध्दतीचे अवलोकन करावे.

## ६.० प्रवेशनिश्चिती करणाची प्रमाणित कार्यपध्दती

६.१ प्रवेश फेरीमध्ये निवड झालेल्या उमेदवाराने निवड झालेल्या औ.प्र.संस्थेमध्ये माहितीपुस्तिकेतील प्रपत्र-३ मध्ये दिल्यानुसार पात्रतेच्या व आरक्षणानुसार केलेल्या प्रवेश अर्जातील दाव्याच्या पुष्ठ्यर्थ सर्व मूळ कागदपत्रे, तसेच सोबत सर्व कागदपत्रांचा स्वयंसत्यापित (Self Attested) प्रतींचा १ संच, २ अलिकडील रंगीत छायाचित्रे (Passport Size) आणि प्रशिक्षण शुल्कासह स्वत: उपस्थित रहावे.

६.२ खाजगी औ.प्र.संस्थेकरिता जमा करावयाचे प्रशिक्षण शुल्क संबंधित औ.प्र.संस्थेने विहीत केलेल्या स्वरुपात (रोख, धनाकर्ष वा धनादेश) भरण्यात यावेत. संबंधित खाजगी औ.प्र.संस्थांच्या परवानगीने प्रशिक्षण शुल्क हप्ते निहाय जमा करता येईल. परंतु, प्रशिक्षण शुल्क हफ्ते निहाय जमा करण्याचा निर्णय हा संपूर्णत: संबंधित खाजगी औ.प्र.संस्थेचा असेल.

६.३ शासकीय औ.प्र.संस्थेकरिता भरावयाचे प्रशिक्षण शुल्क संबंधित शासकीय औ.प्र.संस्थेमध्ये रोखीने एकाच वेळेस जमा करावेत. शासकीय औ.प्र.संस्थांना लागू असणारे प्रशिक्षण शुल्क हे माहितीपुस्तिका भाग १ मधील मुद्दा क्र. १५.० प्रमाणे आहे.

६.४ उमेदवाराने प्रवेश अर्जामध्ये केलेल्या दाव्यांच्या पुष्ठ्यर्थ त्याने सादर केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची संबंधित औ.प्र.संस्था काळजीपूर्वक छाननी करतील. उमेदवाराचा प्रकार, प्रवर्ग, पात्रता इ. च्या दाव्यात अथवा दाव्याच्या पृष्टर्थ सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये काही त्रुटी आढळल्यास त्या संबंधित उमेदवाराच्या लक्षात आणून देण्यात येतील.

६.५ उमेदवार विहीत वेळापत्रकानुसार नियोजित प्रवेश फेरीकरिता उपलब्ध मुदतीत आवश्यक कागदपत्रे / दस्तऐवज सादर करु शकतील.

६.६ उमेदवाराने एखादया दुसऱ्या संस्थेत प्रवेश घेतल्यामुळे जर तो प्रवेशाच्या वेळेस मूळ कागदपत्रे सादर करु शकत नसेल तर त्याला अशा संस्थेत विशिष्ट दिनांकास विशिष्ट अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असल्यामुळे त्याचे मूळ कागदपत्रे संस्थेत ठेवण्यात आल्याबाबत त्या संस्थेच्या संस्थांप्रमुखांचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. उमेदवारास अशा संस्थेच्या संस्थाप्रमुखाने प्रमाणपत्राच्या सत्यापन केलेल्या सत्यप्रती सादर कराव्या लागतील. अशा उमेदवारांना प्रशिक्षण शुल्क प्रवेशाच्या वेळेसच तात्काळ भरावे लागेल आणि अशा उमेदवारांना शुल्क जमा केल्याच्या तारखेपासुन ४ कार्यालयीन कामकाजांच्या दिवसांच्या आत कागदपत्रे जमा करण्याची परवानगी देण्यात येईल.

६.७ उमेदवारास प्रवेश विहीत केल्यानंतर संबंधित उमेदवाराचा अंतिम शाळा/ महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला व माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा (SSC) गुणपत्रकाची मूळ प्रत संबंधित संस्थेत जमा करुन घेण्यात येईल. एखादया उमेदवाराने संस्थेत अभ्यासक्रमात जर एकदा प्रवेश घेतला तर अशा उमेदवाराने प्रवेश रद्द केल्याशिवाय वा प्रशिक्षण पूर्ण केल्याशिवाय त्याला हा शाळा सोडल्याचा मूळ दाखला व माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षेच्या गुणपत्रकाची मूळ प्रत परत करण्यात येणार नाही. इतर सर्व प्रमाणपत्रे/कागदपत्रे प्रवेशाच्या वेळीच मूळ प्रतीवरुन छाननी करुन उमेदवाराला परत करण्यात येतील.

६.८ जे उमेदवार सर्व बाबी पूर्ण करतील त्यांच्यासाठी संबंधित औ.प्र.संस्था दिलेल्या संकेतस्थळावर प्रवेश निश्चितीसाठी आवश्यक ती सर्व प्रक्रिया संस्थेच्या Login मधुन पूर्ण करतील.

६.९ प्रवेश निश्चित करण्याची Online प्रक्रिया झाल्यानंतर शेवटी प्रवेश निश्चित झाल्याचे पत्र पोचपावती (Admission Confirmation Slip) ऑनलाईन प्रवेश प्रणालीव्दारे दोन प्रतीत तयार केली जाईल.

६.१० Candidate Copy" या प्रतीवर विहीत जागेत संबंधित औ.प्र.संस्थेत प्रवेश प्रक्रीया राबविणारे अधिकारी आपले नाव, स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का छापुन उमेदवारास प्रवेश निश्चित झाल्याचे पत्र पोचपावती (Admission Confirmation Slip) देतील. तसेच औ.प्र.संस्था "ITI Copy" आपल्या कार्यालयात जमा करतील.

६.११ जर एखादा उमेदवार प्रवेश देवू केलेल्या औ.प्र.संस्थेत प्रवेशाकरिता दिलेल्या मुदतीमध्ये संबंधित औ.प्र.संस्थेमध्ये हजर राहून प्रवेशप्रक्रीया पूर्ण न करुन घेतल्यास अशा उमेदवाराचा त्याला वाटप झालेल्या जागेवरील प्रवेशाचा दावा रद्द होईल.

६.१२ अशा प्रकारे रिक्त राहिलेल्या जागा पुढील केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेशासाठी उपलब्ध केल्या जातील.

## ७.० खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील संस्था स्तरावरील प्रवेश निश्चितीकरणाची प्रमाणित कार्यपध्दती

७.१ खाजगी औ.प्र.संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागा (माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. १.४ प्रमाणे एकूण प्रवेश क्षमतेच्या व्यवसाय निहाय २०% जागा) व पाचव्या प्रवेश फेरीनंतर (जिल्हास्तरीय समुपदेशन फेरी) खाजगी औ.प्र. संस्थांमध्ये रिक्त राहिलेल्या जागा संबंधित खाजगी औ.प्र.संस्थाना संस्थास्तरावर भरण्यासाठी उपलब्ध आहेत.

७.२ खाजगी औ.प्र.संस्थाना संस्थास्तरावर भरण्यासाठी उपलब्ध जागांचा तपशील प्रवेश संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

७.३ ज्या उमेदवारांची खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये संस्था स्तरावरील जागांवर प्रवेश घेण्यांची इच्छा आहे त्यांनाही प्रवेश संकेत स्थळावर नोंदणी (Registration) करावी लागेल.

७.४ नोंदणीकृत उमेदवारांनी ज्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घ्यावयाचा आहे त्या संस्थेत व्यक्तीश: हजर राहून सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर प्रवेश प्रक्रीया पूर्ण करावी.केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पहिल्या दिवसापासून ते प्रवेशाच्या अंतिम दिनांकापर्यंत खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये संस्था स्तरावरील जागांवर उमेदवारांना प्रवेश घेता येतील.

## ८.० पाचवी प्रवेशफेरी - जिल्हास्तरीय समुपदेशन फेरीत प्रवेशाकरिता उमेदवारांनी अवलंबविण्याची प्रमाणित कार्यपध्दती

८.१ पाचव्या प्रवेश फेरीकरिता उपलब्ध जागांचा तपशील चौथ्या प्रवेश फेरीनंतर संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येईल.

८.२ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (SSC) पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण /अनुत्तीर्ण व अद्याप पर्यंत कोठेही प्रवेश न घेतलेल्या तसेच औ.प्र.संस्थेत प्रवेशासाठी अर्ज न केलेल्या उमेदवारांसाठी प्रवेशाची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी ५ व्या प्रवेश फेरीपूर्वी नव्याने अर्ज करण्याची व/ वा अर्जात बदल करणे व प्रवेश अर्ज निश्चित करणे (Confirmation) साठी संधी देण्यात येईल

८.३ पाचव्या केंद्रीय प्रवेश फेरीमध्ये सहभागी होण्यास महाराष्ट्र राज्यातील नोंदणीकृत उमेदवारांमधून ज्या उमेदवारांनी प्रवेशफेरी १ ते ४ मध्ये प्रवेश घेतलेला नाही, प्रवेश रद्द केलेला आहे, जागा मिळुन देखील प्रवेश निश्चित केलेले नाहीत अथवा नव्याने अर्ज केलेले सर्व उमेदवार पात्र असतील.

८.४ SSC पुरवणी परीक्षेचा निकाल या दरम्यान घोषित न झाल्यास उमेदवारांना सहाव्या प्रवेश फेरीपुर्वी नव्याने अर्ज करण्याची व/ वा अर्जात बदल करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येईल. प्रवेश संकेतस्थळावर अद्ययावत प्रवेश वेळाप्रत्रक प्रकाशित करण्यात येईल.

८.५ सर्व नोंदणीकृत, प्रवेश अर्ज निश्चित केलेले व अप्रवेशित उमेदवारांची गुणवत्ता यादी संकेतस्थळावर वेळापत्रकानुसार प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविण्यात येईल.

८.६ औ.प्र.संस्थांमध्ये प्रवेशोच्छुक व नोंदणीकृत उमेदवारांनी संबंधित जिल्हयाच्या ठिकाणी असणाऱ्या शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये (माहिती पुस्तिकेतील प्रपत्र - ५ प्रमाणे) व्यक्तीश: हजर राहून समुपदेशन फेरीकरिता सकाळी ८.०० वाजेपासून दुपारी ३.०० वाजेपर्यंत हजेरी नोंदवावी.

८.७ दुपारी ३.०० वाजेपर्यंत हजेरी नोंदविलेल्या उमेदवारांमधून गुणवत्ता यादी सायंकाळी ५.०० वाजता संस्थास्तरावर तयार करण्यात येईल. उमेदवारांना त्यांच्या गुणवत्ता क्रमांकानुसार समुपदेशनाकरिता दुसऱ्या दिवशी बोलाविण्यात येईल.

८.८ प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करण्यात येईल.

८.९ या फेरीमध्ये उपलब्ध सर्व जागा हया सर्वसाधारण जागा म्हणून समजल्या जातील.

८.१० उपस्थित उमेदवारांची संख्या अधिक असल्यास उमेदवारांना दुसऱ्या दिवशी बोलविण्यात येईल.

८.११ पाचव्या प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या संस्थेत उमेदवारांनी निवड पत्रावर (Allotment Letter) दिलेल्या मुदतीत सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी उपस्थित राहून प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे.

## ९.० सहावी प्रवेशफेरी - शासकीय औ.प्र. संस्थांसाठी संस्थास्तरीय समुपदेशन फेरीत प्रवेशाकरिता उमेदवारांनी अवलंबविण्यांची प्रमाणित कार्यपध्दती

९.१ फक्त शासकीय औ.प्र.संस्थातील पाचव्या प्रवेश फेरीच्या समाप्तीनंतर शिल्लक राहिलेल्या जागा संबंधित शासकीय औ.प्र.संस्थाना संस्थास्तरीय समुपदेशन फेरीव्दारे भरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील. सहाव्या प्रवेश फेरीकरिता उपलब्ध जागांचा तपशील संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येईल

९.२ औ.प्र.संस्थांमध्ये प्रवेशोच्छुक व नोंदणीकृत उमेदवारांनी संबंधित शासकीय औ.प्र.संस्थेत व्यक्तीश: हजर राहून समुपदेशन फेरीकरिता सकाळी ८.०० वाजेपासून दुपारी १.०० वाजेपर्यंत हजेरी नोंदवावी.

९.३ दुपारी १.०० वाजेपर्यंत हजेरी नोंदविलेल्या उमेदवारांमधून पहिली गुणवत्ता यादी दुपारी ३.०० वाजता संस्थास्तरावर तयार करण्यात येईल. उमेदवारांना त्यांच्या गुणवत्ता क्रमांकानुसार समुपदेशनाकरिता दुसऱ्या दिवशी बोलविण्यात येईल.

९.४ प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करण्यात येईल.

९.५ या फेरीमध्ये उपलब्ध सर्व जागा हया सर्वसाधारण जागा म्हणून समजल्या जातील.

९.६ उपस्थित उमेदवारांची संख्या अधिक असल्यास उमेदवारांना दुसऱ्या दिवशी बोलविण्यात येईल.

९.७ सहाव्या प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर संबंधित शासकीय औ.प्र.संस्थेत त्याच दिवशी प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करावी

९.८ उमेदवारांनी त्याच दिवशी प्रवेश निश्चित न केल्यास सदर जागा दुसऱ्या दिवशी रिक्त समजून प्रवेशासाठी खुली करण्यात येईल.

## १०.० प्रवेश रद्द करण्याकरिता उमेदवारांनी अवलंबविण्याची प्रमाणित कार्यपध्दती

१०.१ ज्या उमेदवारांनी प्रवेश निश्चित केलेला आहे अशा उमेदवारांना कोणत्याही प्रबळ कारणास्तव प्रवेश रद्द करावयाचा असल्यास त्या उमेदवाराने प्रवेश घेतलेल्या संस्थेत व्यक्तिश: उपस्थित राहून प्रवेश प्रक्रीया प्रमुख अधिकाऱ्याशी संपर्क साधावा.

१०.२ संबंधित औ.प्र.संस्था व प्रवेशित उमेदवार दोघांना आपल्या Login ID व Password वापरुन प्रवेश रद्द करावा लागेल.

१०.३ ऑनलाईन प्रवेश प्रणालीच्या माध्यमातूनच प्रवेश रद्द करणे अनिवार्य आहे.

१०.४ प्रवेश रद्द केल्यानंतर ऑनलाईन प्रणाली प्रवेश रद्द केल्याची पावती (Admission Cancellation Note) निर्माण करेल.

१०.५ औ.प्र.संस्था सदर पावतीच्या दोन प्रतीत प्रिंटआऊट घेतील. दोन्ही पावतीवर संबंधित औ.प्र.संस्थेचे प्राचार्य व उमेदवार सही करतील. प्रवेश रद्द केलेल्या पावतीची १ प्रत उमेदवाराला देण्यात येईल व दुसरी प्रत संबंधित औ.प्र. संस्थेकडे राखून ठेवण्यात येईल.

१०.६ शुल्क परतावा माहितीपुस्तिका भाग १ मधील मुद्दा क्र. १६.७ प्रमाणे असले.

## ११.० नोंदणीकृत उमेदवारांसाठी पासवर्ड बदलणे अथवा पुनर्स्थापित (Forgot/ Change/ Reset Password) करण्यांच्या कार्यवाहीसाठी प्रमाणित कार्यपध्दती

### उमेदवार पासवर्ड विसरल्यास (FORGOT PASSWORD)

११.१ नोंदणीकृत उमेदवार आपला पासवर्ड विसरल्यास "**Forgot Password**" या Tab वर क्लिक करावे.




११.२ नोंदणीकृत उमेदवाराने आपला नोंदणीक्रमांक (Registration Number) व आपली जन्म तारीख (Date of Birth) विहीत रकान्यात नोंदवावी.




११.३ उमेदवारास "Receive Password on" यात Password प्राप्त करुन घेण्यासाठी खालील पर्यायांपैकी एकाची निवड करता येईल:

Registered Primary Mobile Number
Registered Secondary Mobile Number
EMail

११.४ उमेदवाराने निवडलेल्या पर्यायानुसार त्यास Password तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येईल.




११.५ उमेदवाराने एसएमएसव्दारे (SMS) नव्याने प्राप्त झालेला पासवर्ड प्रवेश खात्यात प्रवेश करुन अधिक सुलभ व स्मरणात राहील याप्रकारचा पासवर्ड खालील दिलेल्या कार्यपध्दतीनुसार बदलुन घ्यावा (Change Password).

### पासवर्ड बदलणे (CHANGE PASSWORD)

११.६ पासवर्ड बदलण्यासाठी उमेदवाराच्या प्रवेश खात्यात Other या मथळयाखाली देण्यात आलेल्या "**Change Password**" या Link वर क्लिक करावे.




११.७ उमेदवारास बदल करावयाचा पासवर्ड **“Old Password”** या रकान्यात नोंदवुन नवीन पासवर्ड **“New Password”** आणि **“Confirm Password”** या रकान्यात नोंदवावा व **“Save”** या Tab वर क्लिक करावे.




बदल करावयाचा पासवर्ड हा ८ ते १५ अक्षरी असावा. त्यात कमीत कमी एक अक्षर इंग्रजी पहिल्या लिपीतील (Upper Case Alphabet), एक इंग्रजी दुसऱ्या लिपीतील (Lower Case Alphabet), एक अंक (Number) व एक विशिष्ट अक्षर (Special Character) जसे #, &, % असणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ: Password#१२३

११.८ पासवर्ड यशस्वीरित्या बदल झाल्याचा संदेश खालीलप्रमाणे प्रकट होईल.




११.९ उमेदवारास एसएमएसव्दारे (SMS) नव्याने पासवर्ड प्राप्त न झाल्यास अथवा प्रवेश अर्जात “Primary Mobile Number” साठी नोंदविलेला भ्रमणध्वनी क्रमांक बंद असल्यास वा अन्य कारणांमुळे उमेदवार आपला पासवर्ड पुनर्स्थापित करु न शकल्यास उमेदवाराने तात्काळ नजीकच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेशी संपर्क साधुन आपला पासवर्ड पुर्नस्थापित करुन घ्यावा.

## १२. प्रवेश प्रक्रियेतील टप्पे






**माहितीपुस्तिका:**

१. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत तसेच प्रवेश संकेत स्थळावर "माहितीपुस्तिका भाग १ - प्रवेश पध्दती व नियमावली" व "माहितीपुस्तिका भाग २ - प्रवेश प्रक्रीयेतील विविध स्तरावर करावयाच्या कार्यवाहीसाठी प्रमाणित कार्यपध्दती" उपलब्ध करुन देण्यात येत आहे

२. प्रवेशोच्छुक उमेदवारांनी व पालकांनी माहिती पुस्तिकेत देण्यात आलेली माहिती व प्रवेशाबाबतच्या पध्दती व नियमांचा अभ्यास करुनच ऑन लाईन प्रवेश अर्ज सादर करावा



**प्रवेश अर्ज:**

३. ऑन लाईन प्रवेश अर्जासाठी **http://admission.dvet.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्यावी. ऑन लाईन अर्जात प्राथमिक माहिती भरल्यानंतर उमेदवारांचे प्रवेश खाते (Admission Account) त्यांचा नोंदणी क्रमांक (Registration Number) हाच User ID म्हणून तयार होईल. नोंदणी क्रमांक व User ID चा वापर करुन संकेतस्थळावर संपूर्ण प्रवेश अर्ज भरल्यानंतर तात्पुरत्या प्रवेश अर्जाची छापील प्रत (Print Out) घ्यावी

**प्रवेश अर्ज निश्चितीकरण:**




४. सदर प्रवेश अर्जाची छापील प्रत, उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या पुष्ठ्यर्थ सर्व मूळ दस्तऐवज, कागदपत्रांचा स्वयं सत्यापित (Self Attested) प्रतींचा एक संच व लागू असलेले अर्जशुल्क राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत अर्ज निश्चितीसाठी सादर करावेत. अर्ज स्विकृती केंद्रामधील अधिकारी हे अर्जाची छापील प्रत व उमेदवारांने दिलेल्या मूळ दस्तऐवजावरुन काळजीपूर्वक छाननी करुन तपासणी करतील. तपासणीनंतर अर्जाचे निश्चितीकरण करुन उमेदवारास "अर्ज निश्चितीकरण पावती" Application Confirmation Slip देतील.



**पहिल्या प्रवेश फेरीसाठी विकल्प सादर करणे:**

५. प्रवेश अर्ज निश्चित केल्यावरच पहिल्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करण्यासाठी प्रवेश संकेतस्थळावर नोंदणी क्रमांक (Registration No.) व पासवर्ड (Password) व्दारे प्रवेश (Login) करुन सादर करावेत.





**प्राथमिक गुणवत्ता यादी तपासणे व हरकती नोंदविणे:**

६. प्राथमिक गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व उमेदवारांना SMS व्दारे कळविण्यात येईल.

७. उमेदवारास गुणवत्ता यादीबाबत हरकती असल्यास प्रवेश संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या प्रपत्रात लेखी स्वरुपात नजीकच्या शासकीय वा खाजगी औ.प्र.संस्थेत हरकत नोंदवावी.






**प्रवेश फेरीत निवड व प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही:**

८. प्रवेश फेरीसाठी संस्था व व्यवसायनिहाय निवडयादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व उमेदवारांना SMS व्दारे कळविण्यात येईल

९. पहिल्या प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या संस्थेत उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी उपस्थित राहून प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे.

**पुढील प्रवेश फेरीसाठी विकल्प सादर करणे:**



१०. निवड न झालेल्या वा प्रवेश न घेतलेल्या उमेदवारांनी पुढील प्रवेश फेरीसाठी Online पध्दतीने व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करणे. उमेदवाराने नव्याने विकल्प सादर न केल्यास उमेदवाराने पूर्वीच्या प्रवेश फेरीमध्ये सादर केलेले जुनेच विकल्प या प्रवेश फेरीमध्ये विचारात घेण्यात येतील. पुढील कार्यवाही ८ ते १० प्रमाणे.

**नव्याने अर्ज करणे:**

११. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (SSC) पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण /अनुत्तीर्ण व अद्याप पर्यंत कोठेही प्रवेश न घेतलेल्या तसेच औ.प्र.संस्थेत प्रवेशासाठी अर्ज न केलेल्या उमेदवारांसाठी प्रवेशाची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी ५ व्या प्रवेश फेरीपूर्वी नव्याने अर्ज करण्याची व/ वा अर्जात बदल करणे व प्रवेश अर्ज निश्चित करणे (Confirmation) साठी संधी

**पाचवी व सहावी प्रवेश फेरी**



**समुपदेशन फेरीसाठी नाव नोंदणी:**

१२. नोंदणीकृत उमेदवारांनी संबंधित पाचव्या प्रवेश फेरीसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी असणाऱ्या शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये व सहाव्या प्रवेश फेरीसाठी संबंधित शासकीय औ.प्र.संस्थेत व्यक्तीश: हजर राहून समुपदेशन फेरीकरिता सकाळी ८.०० वाजेपासून दुपारी ३.०० वाजेपर्यंत हजेरी नोंदवावी.

**समुपदेशन फेरी:**



१३. हजर असलेल्या उमेदवारांना राज्यस्तर गुणवत्ता क्रमांकानुसार समुपदेशनाकरिता बोलाविण्यात येईल. प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करण्यात येईल.
पुढील कार्यवाही ८ ते १० प्रमाणे.

**संस्था स्तरावरील प्रवेश:**







१४. खाजगी औ.प्र.संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागा व पाचव्या प्रवेश फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर ज्या उमेदवारांची प्रवेश घेण्याची इच्छा आहे त्यांनाही त्यांची तपशिलवार माहितीसह प्रवेश संकेत स्थळावर नोंदणी करावी लागेल. नोंदणीकृत उमेदवारांनी ज्या खाजगी औ.प्र. संस्थेत प्रवेश घ्यावयाचा आहे त्या संस्थेत व्यक्तीश: हजर राहून सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर प्रवेश प्रक्रीया पूर्ण करावी. केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या पहिल्या फेरीपासून ते प्रवेशाच्या अंतिम दिनांकापर्यंत खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये संस्था स्तरावरील जागांवर उमेदवारांना प्रवेश घेता येतील




## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विभागीय कार्यालयांची नावे, दूरध्वनी क्रमांक व ई- मेल

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव व पत्ता | दूरध्वनी क्रमांक | | जिल्हे |
|---|---|---|---|---|
| १ | संचालक (प्रशिक्षण),<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,<br>३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्र. १००३६, मुंबई | फोन: ०२२-२२६२०६०३<br>फॅक्स: ०२२-२२६५ ९२३५<br>ई-मेल: itiadmission@dvet.gov.in | | |
| २ | सहसंचालक,<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,<br>प्रादेशिक कार्यालय, मुंबई,<br>४९, अलियावर जंग मार्ग, खेरवाडी, वांद्रे (पूर्व ), मुंबई | फोन: ०२२-२६४७१३५४<br>फॅक्स: ०२२-२६४७०२१६ (फॅक्स)<br>ई-मेल: jtdir.mumbai@dvet.gov.in | मुंबई शहर<br>ठाणे<br>सिंधुदुर्ग<br>रत्नागिरी | मुंबई उपनगर<br>पालघर<br>रायगड |
| ३ | सहसंचालक,<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,<br>प्रादेशिक कार्यालय, पुणे, घोले रोड, पुणे | फोन: ०२०-२५५३५४१५<br>फॅक्स: ०२०-२५५३३५०२(फॅक्स)<br>ई-मेल: jtdir.pune@dvet.gov.in | पुणे<br>कोल्हापूर<br>सोलापूर | सातारा<br>सांगली |
| ४ | सहसंचालक,<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,<br>प्रादेशिक कार्यालय, नाशिक, जुना आग्रा रोड, नाशिक | फोन: ०२५३-२५७९४१०<br>फॅक्स: ०२५३-२५९७२१३ (फॅक्स)<br>ई-मेल: jtdir.nashik@dvet.gov.in | नाशिक<br>नंदुरबार<br>अहमदनगर | धुळे<br>जळगांव |
| ५ | सहसंचालक,<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,<br>प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद,<br>भडकल गेट जवळ, औरंगाबाद | फोन: ०२४०-२३३१५८३<br>फॅक्स: ०२४०-२३३७०७८(फॅक्स)<br>ई-मेल: jtdir.aurangabad@dvet.gov.in | औरंगाबाद<br>परभणी<br>हिंगोली<br>बीड | जालना<br>उस्मानाबाद<br>लातूर<br>नांदेड |
| ६ | सहसंचालक,<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,<br>प्रादेशिक कार्यालय, अमरावती, मोर्शी रोड, अमरावती | फोन: ०७२१-२६६०५८८<br>फॅक्स: ०७२१-२६६०५०६(फॅक्स)<br>ई-मेल: jtdir.amaravati@dvet.gov.in | अमरावती<br>बुलढाणा<br>यवतमाळ | अकोला<br>वाशीम |
| ७ | सहसंचालक,<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,<br>प्रादेशिक कार्यालय, नागपूर,<br>सिव्हिल लाईन, वेस्ट हायकोर्ट रोड, नागपूर | फोन: ०७१२-२५६१४०३<br>फॅक्स: ०७१२-२५६०८२३(फॅक्स)<br>ई-मेल: jtdir.nagpur@dvet.gov.in | नागपूर<br>भंडारा<br>गोंदिया | वर्धा<br>गडचिरोली<br>चंद्रपूर |

**http://admission.dvet.gov.in**

# Admission Helpline Number
# 1800 120 1696

**प्रवेशोच्छुक उमेदवारांनी व पालकांनी माहिती पुस्तिकेत देण्यांत आलेली माहिती व प्रवेश पध्दती व नियमांचा अभ्यास करुनच ऑन लाईन प्रवेश अर्ज सादर करावा.**